महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वीज निर्मिती - पिढ्यान् पिढ्यांसाठी

# ९ वा वार्षिक अहवाल
# २०१३-२०१४

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल

## २०१३–२०१४

# वार्षिक अहवाल २०१३-२०१४

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ०१ |
| संचालक मडंळाचा अहवाल | ०२ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | २५ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल | ३० |
| आर्थिक ताळेबंद | ३६ |
| नफा-तोटा विवरण | ३७ |
| वित्तीय विवरण पत्रांवर टिपा | ३८ |
| रोकड प्रवाह विवरण | ७१ |
| कंपनी कायदा १९५६ उपविभाग २१२ (३) प्रमाणे विवरण | ७३ |
| प्रकल्प वैशिष्ट्ये | ७५ |

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**संचालक मंडळ**

**(१-०४-२०१३ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** | श्री. आशिष शर्मा (०६.०७.२०१२ पासून ते ०५.०१.२०१५ पर्यंत)<br>श्री. बिपिन श्रीमाळी (०५.०१.२०१५ पासून) |
| **संचालक** | श्री. अजय मेहता (दि. ३०.११.२०१२ पासून ०४.०२.२०१५ पर्यंत)<br>श्री. मुकेश खुल्लर (दि. ०४.०२.२०१५ पासून) |
| **संचालक (वित्त)** | श्री. एस. ए. एम. नकवी (दि. २६.१२.२०१२ ते २६.०८.२०१३ पर्यंत)<br>श्री. जे. के. श्रीनिवासन (दि. २६.०५.२०१४ पासून) |
| **संचालक (प्रवर्तन)** | श्री. एम. जी. वाघमोडे (दि. ०३.०४.२०१३ पर्यंत)<br>श्री. विजय सिंह (दि. २८.०८.२०१३ पासून) |
| **संचालक (प्रकल्प)** | श्री. सी. एस. थोटवे (दि. २८.०८.२०१३ पासून) |
| **संचालक :** | श्री. पी. व्ही. पागे (दि. ०१.१२.२००८ पासून आजपावेतो)<br>श्रीमती इरावती दानी (दि. २६.०६.२०१४ पासून) |

# संचालकांचा अहवाल

प्रिय सदस्य,

आपल्या कंपनीचा दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ९वा वार्षिक अहवाल व लेखापरिक्षित केलेले वार्षिक लेखे आपले संचालक, सानद सादर करीत आहेत.

(₹ लाखात)

| वित्तीय निष्कर्ष | २०१३-१४ | २०१२-१३ |
|---|---|---|
| उत्पन्न | | |
| वीज विक्री पासूनचा महसूल (निव्वळ) | १,६५३,८२१.३४ | १,६४२,३८६.२० |
| इतर उत्पन्न | ८,३७३.९८ | २१,९१८.४४ |
| एकूण उत्पन्न | १,६६२,१९५.१४ | १,६६४,३०४.६४ |
| खर्च | | |
| वापरलेल्या सामग्रीचा खर्च | १,०८१,०८३.०० | १,०८२,२१२.०५ |
| इतर खर्च | १५०,०३३.८० | २०६,५०५.०७ |
| कर्मचारी खर्च | १११,६४१.२० | ९१,००३.६४ |
| घसारा/कर्जफेडीची तरतूद | ११६,३४३.०४ | ५५,६९६.८८ |
| वित्त खर्च | १७१,०९७.१९ | १३६,११०.७० |
| निव्वळ नफा - करपूर्व | ३१,९९६.८७ | ९२,७७६.३० |
| कर (निव्वळ) | २०,८९२.५५ | ४३,९७८.३७ |
| निव्वळ नफा करोत्तर | ११,१०४.३२ | ४८,७९७.९३ |

## वित्तीय कामगिरी

आढाव्याच्या वर्षात वीज विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात अल्प म्हणजे ०.६९ टक्कयांनी वाढ झाली ते ₹ १,६४२,३८६ लाखावरुन ₹ १,६५३,८२१ लाख असे वाढले याच काळात इतर उत्पन्नात ६२ टक्के घट होऊन ते ₹ ८,३७३ लाख झाले. त्यामुळे एकूण उत्पन्नात ०.१२ टक्के घट झाली. वापरलेल्या सामग्रीच्या खर्चात कोणतीही वाढ झाली नाही. वित्तिय खर्च २६ टक्कयांनी वाढले व ₹ १३६,११० लाखावरुन ₹ १७१,०९७ लाख असे झाले याचे कारण नव्याने कार्यन्वित झालेले भुसावळ येथील युनीट्स व सौर ऊर्जेचे प्रकल्प यामुळे व्याजाचा बोजा वाढला. कर्मचारी वेतनात दि. १ एप्रिल २०१३ पासून सुधारणा लागू झाल्याने कर्मचारी खर्च ₹ ९१०,००३ लाखावरुन ₹ १११,६४१ लाख असा (२३ टक्के) वाढला. भुसावळ येथील युनीट्स वाढल्याने तसेच धोरणात बदल केल्याने घसारा / कर्ज फेडीची तरतूद यात १०९ टक्के वाढ झाली. इतर खर्च मात्र ₹ २०६,५०५ लाखावरुन ₹ १५०,०३३ लाख असे कमी केले. यासर्व कारणांमुळे मागील वर्षीचा ₹ ४८,७९७ लाख नफा यावर्षी ₹ ११,१०४ लाख असा कमी झाला.

## लाभांश

राज्याला भेडसावणाऱ्या वीज टंचाईला तोंड देण्यासाठी कंपनीने वीज निर्मिती क्षमता वाढविण्याच्या मोठ्या योजना आखल्या असून भविष्यात त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची गरज आहे. यामुळे आपल्या संचालकांनी निर्णय घेतला आहे की, कंपनीने निर्माण केलेले आधिक्य सध्या चालू असणाऱ्या विस्तार प्रकल्पात पून: गुंतवावे. यामुळे आढावा वर्षासाठी कोणत्याही लाभांशाची शिफारस केलेली नाही.

## वीज निर्मिती क्षेत्रातील कामगिरी:

महानिर्मिती कंपनीची एकूण स्थापित वीज निर्मिती क्षमता दि. ३१.०३.२०१४ रोजी ११३६७ मे.वॅ. आहे. भुसावळ येथील युनीट क्र. ५ (५०० मे.वॅ.) वाणिज्यिक कार्यासाठी दि. ०३.०१.२०१४ रोजी तयार असल्याचे जाहीर झाले. मात्र दि. १८.१०.२०१३ रोजी तेथील डी-पास मधे इएसपी हॉपर्स अपघात होऊन कोसळले. यामुळे भुसावळ युनीट-५ ची संपूर्ण भार क्षमता ४०० मे.वॅ. पर्यंत मर्यादित ठेवावी लागली.

आढावा वर्षात कोळसा आणि वायू प्रज्वलनातून अनुक्रमे ३७०१८ द.ल.यू. आणि ३२७३ द.ल.यू. वीज निर्मिती झाली गेल्यावर्षी अनुक्रमे ३९०४८ द.ल.यू. आणि ३७४१ द.ल.यू. निर्मिती झाली होती. जल विद्युत निर्मिती ५०७४ द.ल.यू. आणि सौर वीज निर्मिती १८१ द.ल.यू. इतकी होती.

वर्ष २०१३-१४ मध्ये कोळसा आधारीत वीज निर्मिती केंद्रांचा सरासरी उपलब्धता अंक ८३.९२ टक्के होता. गेल्यावर्षी हा अंक ८४.३१ टक्के असा होता. संयंत्र भार अंक ६३.६४ टक्के असा होता. गतवर्षी तो ६५.२७ टक्के होता. वर्ष २०१३-१४ मधे ८ युनीट्सचे ओव्हरहॉलींग केले. २०१२-१३ मधे १४ युनीट्सचे केले होते. वर्ष २०१३-१४ मधे नियोजित बंद व सक्तीचे बंद अंक अनुक्रमे ७.२ टक्के आणि ७.४१ टक्के होते. गतवर्षी २०१२-१३ मधे ते अनुक्रमे ६.४ टक्के व ८.०२ टक्के असे होते वायू आधारीत वीज निर्मिती केंद्राची सरासरी उपलब्धता ९६.२३ टक्के आणि संयत्र भार अंक ५५.६१ टक्के होता. या वर्षात परळी युनीट ३ ते ७ ही पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे चालविता आली नाहीत.

## प्रवर्तनातील कामगिरी दर्शक इतर अंक खालीलप्रमाणे आहेत :

कोल रियलाझेशन फॅक्टर वर्ष २०१३-१४ मध्ये ६८.९० टक्के होता. गतवर्षी तो ७३.३१ टक्के होता. वर्ष २०१३-१४ मध्ये विनिदेर्शित कोळसा वापर ०.८८० केजी/केडब्ल्यूएच असा होता. मागील वर्षी तो ०.८५६ केजी/केडब्ल्यूएच होता. बॉयलर टयूब गळतीची टक्केवारी वर्ष २०१३-१४ मधे २.८९ टक्के होती. ती मागील वर्षी ३.४० टक्के होती. विनिदेर्शित तेलाचा वापर २०१३-१४ मधे ३.७१ एमएल/केडब्ल्यूएच होता. तो मागील वर्षी ३.६३ एमएल/केडब्ल्यूएच होता. सहायक वीज वापर वर्ष २०१३-१४ मधे १०.५८ टक्के होता. मागील वर्षी ती १०.६२ टक्के होता. जाळलेल्या कोळश्याचे सरासरी एकूण कॅलीरीफिक मूल्य वर्ष २०१३-१४ साली २९९१ के कॅल प्रती केजी असे होते. तर उष्णता दर २६६६ के कॅल/केजी होता तसेच २०१३-१४ या वर्षी वाहतूकीतील हानी १.०२ टक्के होती. ती मागील वर्षी ०.८७ टक्के होती.

## क्षमता वाढीचा कार्यक्रम :

महाराष्ट्र राज्यातील विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने विविध औष्णिक विद्युत केंद्रांची स्थापना करण्याच्या कार्यक्रम हाती घेतला आहे.

## अ) कार्यान्वित केलेले औष्णिक वीज प्रकल्प : ५०० मे.वॅ.

### भुसावळ औ.वि.केंद्र युनीट ५ (५०० मे.वॅ.)

या युनीटचे प्रायोगिक प्रवर्तन दि. ०१.०६.२०१३ रोजी पूर्ण होऊन वाणिज्यिक कार्य ०४.०१.२०१४ पासून सुरु झाले. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. वि.नि.के. २००५/प्र.क्र.२०४४/ऊर्जा दि. १२.०५.२००६ यानुसार या प्रकल्पास मंजुरी दिली आहे.

## ब) प्रगतीपथावरील प्रकल्प ३२३० मे.वॅ.

### १. चंद्रपुर औ.वि.केंद्र युनीट ८ व ९ (२×५०० मे.वॅ.)

कारखान्यातील महत्वांच्या साधनांसाठी मे.बी.एच.इ.एल यांचेकडे दि. २५.०७.२००८ रोजी मागणी नोंदविली. या कामाची झिरो डेट) ०९.०२.२००९ आहे. उर्वरित साहित्याची मागणी १२.०६.२००९ रोजी मे.बी.जी.आर एनर्जी सिस्टम लि. चेन्नाई यांना दिली आहे. या प्रकल्पातील महत्वाचे टप्पे यावर्षात खालीलप्रमाणे पूर्ण करण्यात आले.

| अनु. क्र. | युनीट-८ : महत्वाचे टप्पे | पूर्ण करण्यात आले |
|---|---|---|
| १. | टी.जी. बॉक्स अप | २३.११.२०१३ |
| २. | बॉयलर लाईट अप | ३०.०३.२०१४ |

| अनु. क्र. | युनीट-९ चे : महत्वाचे टप्पे | पूर्ण करण्यात आले |
|---|---|---|
| १. | कंडेसर इरेक्शन सुरु | १४.११.२०१३ |
| २. | टी.जी. इरेक्शन सुरु | १४.११.२०१३ |

प्रकल्पातील कामे प्रगतीपथावर आहेत. युनिट ८ व ९ चे पूर्ण भाराने चालू होण्याच्या अपेक्षित तारखा अनुक्रमे १५.०२.२०१५ आणि १५.०५.२०१५ अशा आहेत.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक प्रकल्प - २००७/प्र.क्र. ११०६/ऊर्जा-४ दि. ०५.०३.२००८ नुसार मंजूरी दिली.

### २. परळी औ.वि.केंद्र : युनीट-८ (२५० मे.वॅ.)

मे.बीएचइएल यांना २०.०१.२००९ (झिरो डेट) रोजी मुख्य सामग्रीसाठी मागणीचा आदेश दिला. नॅचरल ड्राफ्ट कुलींग टॉवर (एन डी सी टी) वगळून उर्वरित कारखान्यासाठी मे.सुनील हाय-टेक इंजिनियर्स लि. यांच्याकडे ०१.०१.२०१० रोजी मागणी नोंदविली. एन.डी.सी.टी. आणि फिल्म फिल्स याची मागणी मे.गॅमन इंडिया लि. यांचेकडे दि. ०५.०१.२०१० रोजी नोंदविली आहे.

प्रकल्पातील कामे प्रगतीपथावर असून ३० मार्च २०१५ पर्यंत कार्यान्वयत-अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक प्रकल्प - २००८/प्र.क्र.१४९१/ऊर्जा-४ दि. २६.०५.२००९ नुसार मंजुरी दिली आहे.

### ३. कोराडी औ.वि. केंद्र युनीट ८,९ व १० (३×६६० मे.वॅ.)

बॉयलर व टर्बो जनरेटर पॅकेजची मागणी मे.एल अँड टी ला, दि. २३.०९.२००९ (झिरो डेट) रोजी दिली. उर्वरित कामासाठी मे. लॅंको इन्फाटेक लि. हरयाना यांचेकडे २७.०७.२०१० रोजी मागणी केली. पुढील कामे प्रगतीपथावर आहेत. या वर्षात खालील महत्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.

| अनु. क्र. | युनीट-८ महत्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | हायड्रॉलिक परिक्षण | १५.०६.२०१३ |
| २. | टी.जी. बॉक्स अप | ३१.१०.२०१३ |
| ३. | ऑईल फ्लशिंग पूर्ण करणे | २८.०२.२०१४ |
| ४. | टर्बाइन ऑन बारींग गियर | ०३.०३.२०१४ |

| अनु. क्र. | युनीट-९ चा महत्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
| --- | --- | --- |
| १. | हायड्रॉलिक परिक्षण | ०६.०१.२०१४ |

| अनु. क्र. | युनीट-१० चा महत्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
| --- | --- | --- |
| १. | टी.जी. इरेक्शन प्रारंभ | ०६.०६.२०१३ |
| २. | कंडेसर इरेक्शन प्रारंभ | ०९.०७.२०१३ |

प्रकल्पाची इतर कामे प्रगतीपथावर आहेत. युनीट ८, ९ व १० चे पूर्ण भाराने चालू होण्याच्या अपेक्षित तारखा अनुक्रमे १५.०२.२०१५, १५.०७.२०१५ आणि ३०.११.२०१५ अश्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक प्रकल्प/२००८/प्र.क्र. ११८९/ऊर्जा-४ दि. १४.१०.२००८ नुसार मंजुरी दिली आहे.

## (क) भविष्यातील प्रकल्प (६०९० मे.वॅ.)

### १. भुसावळ औ.वि.केंद्र युनीट ६ (१×६६० मे.वॅ.)

- **जमीन** – प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यात आली आहे.
- **पाणी** – हातनूर धरण व सुधागाव बंधारा येथून दरवर्षी १३ घन एम एम पाणी उपलब्ध होईल आणि उर्वरित ७ घन एम एम पाणी दरवर्षी ओझर खेड धरण येथून मिळेल.
- **इंधन** – महागूज कोलायरीज यांचे पत्र दि. १८ मे २०११ नुसार त्यांच्या मच्छाकाटा कोळसा खाणीतून या प्रकल्पाला कोळसा देणार होते. **मात्र सर्वोच्च न्यायालयाने विनंती अर्ज क्र. १२० वर्ष २०१२ यासंबंधी दि. २४.०९.२०१४ रोजीच्या आदेशानुसार वर्ष १९९३ ते २०१२ या काळात दिलेले कोळसा खाणींचे वाटप रद्द केले आहे.**
- **पर्यावरण मंजूरी :** पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. २७.११.२०१२ रोजी या प्रकल्पाला पर्यावरणाची मंजूरी दिली आहे.
- **वीज खरेदी करार :** म.वि.नि. आयोगाने महानिर्मिती व महावितरण यांच्यातील वीज खरेदी करारास मान्यता आदेश दिला. इ.पी.सी. तत्वावरील निविदांच्या बोली सादर करण्याचे काम दि. १३.०१.२०१४ रोजी सुरु झाले. या बोलींची तांत्रिक व वाणिज्य अभ्यास केल्यानंतर यशस्वी बोली दरास आदेश दिला जाईल.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासन निर्णय क्र. प्रकल्प-२०१०/प्र.क्र.३/ऊर्जा-४ दि. ०५.१०.२०१० नुसार मंजुरी दिली आहे.

### २. नाशिक औ.वि.केंद्र युनीट ६ (१×६६० मे.वॅ.)

- **जमीन** – महानिर्मितीच्या कब्ज्यातील जमिनीचे योग्य प्रकारे पूनर्समायोजन करुन या प्रकल्पासाठी जमीन दिली जाणार आहे.
- **पाणी** – जल संधारण विभागाचे पत्र दि. १२ जानेवारी २०११ नुसार प्रतीवर्षी ६.५ घन एम एम जादा पाणी देण्यास मंजूरी दिली.
- **इंधन** – भारत सरकारने पत्र क्र. ०६.०९.२०१३ नुसार महाजनवाडी कोळसा साठा, नागपूर ह्या प्रकल्पासाठी दिला आहे.
- **पर्यावरण मंजूरी** – भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने पाठविलेल्या संदर्भाच्या शर्ती दि. १५.०६.२०११ रोजी मिळाल्या. दि. ०७.०५.२०१३ रोजी जाहीर सुनवणीचे आयोजन यशस्वीपणे पार पडले. एम.पी.सी.बी. कडून सार्वजनिक

बैठकीचा अहवाल मिळाला. अंतिम पर्यावरण मंजूरीसाठी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाला अर्ज सादर केला आहे.

- **इंधन खरेदी करार :** म.वि.नि. आयोगाने महानिर्मिती व महावितरण यांच्यातील वीज खरेदी कराराच्या मंजूरीचा आदेश दिला निविदा विनिर्देशित करण्याचा प्रक्रीया चालू आहे.
- महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पाच्या कार्यवाहीस मंजुरी शासन निर्णय क्र. प्रकल्प–२०११/प्र.क्र.३१३/ऊर्जा–४ दि. २९.१२.२०११ नुसार दिली आहे.

### ३. पारस औ.वि.केंद्र युनीट ५ (१×२५० मे.वॅ.)

पारस येथे २५० मे.वॅ. क्षमतेचे कोळशाचे सूपर क्रिटीकल युनीट स्थापन करण्याची योजना आहे.

- **जमीन** – या प्रकल्पास जमीन मिळविण्यात आली आहे.
- **पाणी** – या प्रकल्पास लोअर मून बॅरेज येथून पाणी मिळणार आहे.
- **इंधन** – भारत सरकारने दिनांक ०६.०९.२०१३ च्या पत्राद्वारे या प्रकल्पासाठी महाजनवाडी कोळसा साठा, नागपूर येथील कोळसा दिला आहे.
- **पर्यावरणाची मंजुरी** – भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून संदर्भाच्या शर्ती (टि ओ आर) २६.०९.२०१२ रोजी मिळाल्या. सुधारीत कोळसा जोडणीच्या कोळश्याचा पृथ:करण अहवाल करणे बाकी असल्याने इ.आय.ए चे अंतिमिकरण प्रलंबित होते. एम.पी.सी.बी. यांना जाहीर सुनवणीसाठी दि.२१.०६.२०१४ व ०२.०७.२०१४ रोजी अर्ज दिले. संदर्भाच्या शर्तीची वैधता वाढवून देण्यासाठी पर्यावरण व वन मंत्रालयाला अर्ज सादर केला.
- **वीज खरेदी करार :** महावितरण सोबत दि.०१.०४.२००९ रोजी केलेल्या वीज खरेदी करार दुरुस्ती करुन विद्यमान करारात या प्रकल्पाचा समावेश करण्यासाठी म.वि.नि. आयोगाने दि. २९.१०.२०१३ रोजीच्या आदेशानुसार मान्यता दिली.

### ४. दोंडायचा औ.वि.केंद्र युनीट १,२,३,४ व ५ (५×६६० मे.वॅ.)

शासनाच्या आदेशानुसार, या प्रकल्पाची अमलबजावणी एन.टी.पी.सी. सोबत एक संयुक्त कंपनी काढून किंवा त्यांच्यातर्फे केली जावी.

संयुक्त साहस कंपनीची रचना एन.टी.पी.सी. च्या सोबत करण्यासाठी सामजस्य कराराचा मसूदा तयार करुन तो मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाला सादर करण्यात आला.

- **जमीन** – जमीन संपादनाचे काम प्रगतीपथावर आहे. ऑगस्ट २०१४ पर्यंत ४६९.४४ हेक्टर जमीन (६७५.३२ हेक्टर पैकी) आणि सरकारी जमीन ४६.४२ हेक्टर (१४९.६२ हेक्टर पैकी) संपादन करण्यात आली.
- **पाणी** – जल संधारण विभागाने तापी नदीवरील निम्न तापी प्रकल्पातील ८०.५६ घन एम एम पाणी राखून ठेवण्यास मान्यात दिली आहे.
- **इंधन :** युनीट क्र. ४ व ५ साठी चेंदीपाडा, कोळसा ब्लॉक, ओरीसा येथून कोळसा मिळेल. युनीट क्र. १, २ आणि ३ (टप्पा–१) यासाठी ओरीसामधील मच्छीकाटा येथून कोळसा मिळणार आहे. **मात्र सर्वोच्च न्यायालयाने विनंती अर्ज क्र. १२० वर्ष २०१२ यासंबंधी दि. २४.०९.२०१४ रोजीच्या आदेशानुसार वर्ष १९९३ ते २०१२ या काळात दिलेले कोळसा खाणीचे वाटप रद्द केले.**

- **पर्यावरण मंजुरी :** भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून संदर्भाच्या शर्ती (टि ओ आर) दि. ०५.०५.२०११ रोजी मिळाल्या. या संदर्भाच्या शर्तीच्या वैधता इ.ए.सी.ने १३.०५.२०१४ पर्यंत वाढवून दिल्या. दोंडायचा येथे दि. २५.०३.२०१४ रोजी जाहीर सुनवणी झाली. पर्यावरण मंजुरीसाठी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाला दि. ०८.०५.२०१४ रोजी अर्ज सादर केला.
- **वीज खरेदी करार :** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांचे पत्र दि. २९.१०.२०१३ नुसार दि. ०१.०४.२००९ रोजी महावितरण सोबत केलेल्या करारात सुधारणा करुन त्यातच या प्रकल्पाच्या समावेशास मंजूरी दिली.

**५. उरण वायू आधारीत संमिश्र चक्रीय वीज प्रकल्प (१२२० मे.वॅ.) (ब्लॉक - १ : ४०६ मे.वॅ.) ब्लॉक-२ : ८१४ मे.वॅ.)**

- जमीन, पाणी तसेच इतर सर्व सांविधिक मंजूऱ्या मिळाल्या आहेत.
- महाराष्ट्र शासनाने उरण येथील १२२० मे.वॅ. क्षमतेच्या संमिश्र चक्रीय वीज प्रकल्पाच्या कार्यवाहीस शासन निर्णय क्र. प्रकल्प ०८/प्र.क्र. १२४६/ऊर्जा-४ दि. ०२.०३.२०१० नुसार मंजूरी दिली आहे.
- या १२२० मे.वॅ. च्या प्रकल्पासाठीच प्रगत श्रेणीतील वायू टर्बाईन आधारीत सी.सी.पी.पी. स्थापित करण्याच्या सर्वकष स्वरुपाचा कंत्राट रद्द करावा लागला. कारण केंद्रीय वीज प्राधिकरण यांचे परिपत्रक दि.१९.०३.२०१२ यात सूचना केली की, देशांतर्गत वायूचे उत्पादन कमी होत असल्याने विकासकांनी २०१५-१६ पर्यंत, देशांतर्गत वायूवर चालणारा कोणताही प्रकल्पाची योजना करु नये.

**कोराडी युनीट-६ चे नुतनीकरण व आधुनिकीरण :**

महानिर्मिती कंपनीने कोराडी येथील जुन्या युनीट-६ चे नुतनीकरण व आधुनिकीकरण करण्याचे काम सुरु केले असून ते सप्टेंबर २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. या कामास जागतीक बँक निधी पुरवित आहे.

## सौर वीज निर्मिती

भारत सरकारचे नव व पूनर्वापर योग्य ऊर्जा मंत्रालय आणि जेएनएनएसएम यांच्या मार्गदर्शक सूत्रांनुसार महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्रात विविध जागी सौर वीज निर्मितीचे प्रकल्प स्थापित करण्यास प्रारंभ केला आहे. यानुसार महानिर्मितीने दि. ३१.०३.२०१२ रोजी चंद्रपुर येथे ५ मे.वॅ. क्षमतेचा सौर वीज प्रकल्प (१+२ एमडब्ल्यू थिन फिल्म प्रॉजेक्ट आणि २ एमडब्ल्यू क्रिस्टलाईन प्रॉजेक्ट) कार्यान्वित केले. याशिवाय दि.३१.०३.२०१३ रोजी शिवाजीनगर, ता. साक्री, जि. धुळे येथे १२५ मे.वॅ. क्षमतेचा सौर वीज प्रकल्प कार्यान्वित केला. याशिवाय शिरशूफळ ता. बारामती, येथे ५० मे.वॅ. सौर वीज प्रकल्प महानिर्मिती कंपनीतर्फे उभारण्यात येत आहे. त्यातील ३६ मे.वॅ. यापूर्वीच कार्यान्वित झाली आहे. साक्री येथे २५ मे.वॅ. सोलर फोटोव्होल्टाईक प्रकल्प आणि कौडगांव, जि. उस्मानाबाद येथे ५० मे.वॅ. फोटोव्होल्टाईक प्रकल्प अनुक्रमे मार्च २०१५ व मार्च २०१६ मधे कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

## नव्या प्रकल्पांसाठी निधी

क्षमता वाढीच्या नियोजित सर्व प्रकल्पांना कर्ज व समभाग यांचे ८०:२० या गुणोत्तरात निधी पुरवठा होईल. आपली कंपनी विस्तार प्रकल्पातील समभागाच्या अंशदानासाठी महसूली संसाधनाचा काही भाग वापरणार आहे. एकूण प्रकल्पाच्या खर्चाच्या ८० टक्के पर्यंत निधी बँका व वित्तीय संस्थाकडून मिळविला जाईल. उर्वरित २० टक्के समभागासाठी प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाकडून निधी मिळेल.

## इंधन उपलब्धता

१. **महानिर्मितीची कोळशाची गरज** – महानिर्मितीची स्थापित औष्णिक वीज क्षमता २०१३–१४ मधे ७८९० मे.वॅ. इतकी आहे. त्यासाठी महानिर्मितीला वार्षिक ४६.५०४ एम एम टी इतक्या कोळश्याची गरज असते. महानिर्मितीने कोळसा देशांतर्गत, इ–लिलावाने आणि आयात करुन मिळविला.

२. **इंधन पुरवठयाचे करार :** महानिर्मितीने कोळसा कंपन्यासोबत वार्षिक पुरवठयाचे करार खालीलप्रमाणे केले आहेत.

| कोळसा कंपनी | कराराची तारीख | परीणामकारक कराराची तारीख | कराराचा काळ | वार्षिक कंत्राटाद्वारे माल (एम एम टी) |
|---|---|---|---|---|
| डब्ल्यू सी एल | २१.०९.२००९ | ०१.०४.२००९ | कार्यवाहीपासून २० वर्षे व दर ५ वर्षीनी आढावा घेतला जाईल. | २२.७०१ |
| एम सी एल | २६.०६.२००९ | ०१.०४.२००९ | | ६.०२७ |
| एस ई सी एल | २६.०६.२००९ | ०१.०४.२००९ | | ६.१७२ |
| एस सी सी एल | ०५.०३.२००९ | ०१.०४.२००९ | कार्यवाहीपासून ५ वर्षे व दर ३ वर्षांनी आढावा घेतला जाईल. | २.२६० |
| एम सी एल नविन करार | ३१.०१.२०१३ | | कार्यवाहीपासून २० वर्षे व दर ५ वर्षीनी आढावा घेतला जाईल (पारस–४, परळी–७, केपीकेडी–५ आणि भुसावळ ४ व ५ यासाठी इंधनपुरवठा करार) | ९.३४४ |
| **एकूण** | | | | **४६.५०४** |

**विविध कोळसा कंपन्यातील कोळश्याची कमतरता :**

महानिर्मितीला कोल इंडियाच्या उपकंपन्या म्हणजे डब्ल्यूसीएल, एम सी एल आणि एस इ सी एल यांच्याकडून सुमारे २५ टक्के कोळसा कमी मिळत आहे. आर्थिक वर्ष २०१३–१४ मधे एकूण कोळशाची कमतरता प्रत्यक्षात ३१.१० टक्के होती. २०१३–२०१४ मधील कोळशा पुरवठ्यातील कंपनी निहाय टंचाई खालील दिली आहे.

| कोळसा कंपनी | जोडणी (एमएमटी) | प्राप्ती (एमएमटी) | घट | तूटीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| डब्ल्यू सी एल | २२.६८९ | १७.४८४ | ५.२०५ | २२.९४ |
| एम सी एल | १४.२३६ | ६.२१७ | ८.०१९ | ५६.३२ |
| एस इ सी एल | ६.०२४ | ५.६१८ | ०.४०६ | ६.७३ |
| एस सी सी एल | २.२६२ | १.११५ | १.१४७ | ५०.७० |
| **एकूण** | **४५.२११** | **३०.४३४** | **१४.७७७** | **३२.६८** |

वर्ष २०१३–२०१४ एकूण ४५.२११ एम एम टी कोळसा महानिर्मितील मिळायला हवा होता. त्या ऐवजी ३०.४३४ एम एम टी मिळाला तो आपल्या एकूण गरजेच्या केवळ ६७.३२ टक्के होता. त्यामुळे ३२.६८ टक्के तूटीची (१४.७७७ एम एम टी) समस्या निर्माण झाली. कोळशाचा पुरवठा वाढावा यासाठी महानिर्मिती कंपनी कोळशाच्या कंपन्या व रेल्वे यांचेकडे सातत्याने पाठपूरावा करीत आहे.

कोळश्याचे प्रमाण आणि त्याचा दर्जा यातील फरक कमी करण्यासाठी, महानिर्मितीने कोळश्याची आयात केली. आयात कोळश्याचे प्रमाण हे केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांच्या निर्देशाप्रमाणे आहे.

## ३. आयात कोळसा

भुसावळ औ.वि केंद्र (युनिट ४ व ५), खापरखेडा (युनिट-५) व चंद्रपूर महा.औ.वि. केंद्र (युनिट ५ ते ७) करीता कंपनीने वर्ष २०१३-१४ या वर्षात २.४७१ दशलक्ष मेट्रीक टन नॉन कोकींग (स्टीम) आयात कोळसा ज्याची जीसीवी (एआरबी) ४४००-४८०० किलो कॅलरी/कि.ग्रॅं. आहे अश्या कोळश्याकरीता खरेदी आदेश दिले. वर्ष २०१३-१४ मध्ये केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने कंपनीसाठी ३.५ दशलक्ष मेट्रीक टन इतका कोळसा आयात करण्याचे उद्दीष्ट दिले होते तथापी कंपनीस २.५८७ दशलक्ष मेट्रीक टन इतका कोळसा प्राप्त झाला.

## ४. महानिर्मितीच्या प्रकल्पांचे इंधन पुरवठा / सांमजस्य करारांची स्थिती

परळी-७ (२५० मे.वॅ.), पारस-४ (२५० मे.वॅ.), खापरखेडा-५ (५०० मे.वॅ.) आणि भुसावळ-४ व ५ (२×५०० मे.वॅ.) या प्रकल्पांसाठी महानदी कोलफिल्ड लिमिटेड पासून दीर्घ मूदतीची कोळसा जोडण्यांना भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने मंजूरी दिली.

कोल इंडिया लिमिटेड, या संस्थेच्या सूचनेनुसार महानिर्मितीने परळी-७, पारस-४, खापरखेडा-५ व भुसावळ-४, ५ युनीट्स यांना ३१.०१.२०१३ रोजी ९.३४४ एमएमटीपीए एवढा कोळसा पुरवठ्यासाठी सामंजस्याचे करार एम सी एल सोबत खालीलप्रमाणे केले आहेत.

| प्रकल्प / युनीटचे नाव | क्षमता (मे.वॅ.) | करारातील संख्या (एम एम टी पी ए) |
|---|---|---|
| परळी-७ | २५० | १.२०४ |
| पारस-४ | २५० | १.२०४ |
| खापरखेडा-५ | ५०० | २.३१२ |
| भुसावळ-४ | ५०० | २.३१२ |
| भुसावळ-५ | ५०० | २.३१२ |

कोल इंडिया लि. यांनी १ एप्रिल २००९ आणि ३१ मार्च २०१५ दरम्यान कार्यान्वित झालेल्या वीज निर्मिती केंद्रासाठी सुधारीत इंधन पुरवठा करार दिले आहेत. त्यात एसीक्यूच्या ८० टक्के ट्रिगर लेव्हल ची तरतूद आहे. या एफ एस एच्या मसूद्यानुसार देशांतर्गत कोळश्याचा पुरवठा २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ यांच्या ए.सी.क्यू.च्या ६५ टक्के आणि २०१५-१६च्या एसीक्यूच्या ७० टक्के आणि २०१६-१७ च्या एसीक्यूच्या ७५ टक्के असा वाढू शकेल. मात्र देशांतर्गत कोळश्याच्या प्रत्यक्ष उपलब्धते वर अवलंबून असेल उर्वरित माल संख्या आयात केलेल्या कोळश्यातून पुरविली जाईल.

## ५. महानिर्मितीला दिलेल्या कोळसा खाणी :

### महाजनवाडी कोळसा खाण :

- कोळसा मंत्रालयाने महाजनवाडी कोळसा खाण, महानिर्मिती कंपनी आणि गुजरात राज्य विद्युत कंपनी लि. (GSECL) यांना ५०:५० या गुणोत्तरात वाटणी करण्यासाठी दिली आहे. कोळसा खाण नियम २०१२ या अंतर्गत नवीन कोळसा खाणी शासकीय कंपन्यांना इ-लिलावद्वारे स्पर्धात्मक बोली करुन देण्याच्या पद्धती नुसार ही वाटणी झाली. या खाणीतील कोळसा साठा ३४० एमएमटी इतका आहे. महानिर्मितीचे पारस-४ आणि नाशिक येथील बदल करण्याचे प्रकल्प महाजनवाडी कोळसा खाणीशी जोडण्यात आले आहेत.

६. **कोळसा मिळविण्यासाठी पर्याय :**

- महानिर्मिती कंपनीला कोळश्याची कमतरता पूर्ण करण्यासाठी खालील संभाव्य स्त्रोतांकडून कोळसा मिळविण्याची शक्यता अजमावून पहावी लागेल.
- मे. डब्ल्यू सी एल, एस इ सी एल, एस सी सी एल आणि एम सी एल यांचेकडून इ-लिलावाने किंवा त्यांच्याशी इ-बोली पद्धतीने कोळसा मिळविला जातो. महानिर्मितीने चंद्रपूर महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी ५ एल एम टी कोळसा मिळविण्याकरिता मे. एस सी सी एल यांचे सोबत दि. २२ डिसेंबर २०१४ रोजी सामंजस्याच्या करारावर सहया केल्या.

७. **उरण येथील विद्यमान जीटीपीएस साठी वायूचा पुरवठा**

- महानिर्मितीच्या उरण येथील वायू औष्णिक वीज निर्मिती केंद्राची स्थापित क्षमता ६७२ मे.वॅ. आहे. या केंद्राला ३.५ एम एम एस सी एम डी नैसर्गीक वायू शासन मान्य किमतीत विक्री व वाहतूकीचा संमती करार (जीएसटीए) महानिर्मितीने मे. गेल इंडिया लि. सोबत केला आहे. मात्र मे. गेल यांचेकडून नैसर्गिक वायूच्या पुरवठयात चढउतार होतात; कारण तो पुरवठा मे. ओ.एन.जी.सी. कडून अपस्ट्रीम गॅसच्या उपलब्धते वर आधारलेला असतो. आर्थिक वर्ष २०१३-१४ मधे नैसर्गिक वायू मिळण्याचे सरासरी प्रमाण २.१२५ एम एम एस सी एम डी असे होते.
- याशिवाय महानिर्मितीने उरण वीज निर्मिती केंद्राला १.२ एम एम एस सी एम डी एवढा नैसर्गिक वायूचा पुरवठा होण्यासाठी मे. आर आय एल (आणि इतर) यांचे सोबत पुरवठ्याची व्यवस्था केलेली आहे. मात्र मार्च २०१३ पासून वायूचे उत्पादन कमी झाल्यामुळे व अग्रक्रम असलेल्या क्षेत्रांना वायू दिली जात असल्याने आर आय एल केजी डी-६ यांचेकडू महानिर्मितीला नैसर्गिक वायू उपलब्ध झालेला नाही. के जी बेसीन गॅस आणि इतर यांचे सोबतचा वायू पुरवठा व खरेदीचा संमती करार (जीएसपीए) दि. ३१.०३.२०१४ रोजी संपूष्टात आला. दरम्यान काळात हंगामी व्यवस्था करण्यासाठी आर आय एल (विक्रेत्यांचे प्रतिनिधी) यासोबत वाटाघाटी चालू आहेत.
- अशाप्रकारे वायूची १.० एम एम एस सी एम डी या प्रमाणात कमतरता आहे. त्यामुळे उरणच्या वायू आधारीत औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील वीज निर्मितीमधे सरासरी २०० मे.वॅ. इतकी घट झाली आहे.

## मानव संसाधन व्यवस्थापन :

कर्मचारीवृंद ही संस्थेची सर्वात महत्वाची मालमत्ता आहे. त्यांचा सृजनशीलता, कल्पकता, नवे करण्याची उर्मी यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी अनुकूल वातावरण आवश्यक आहे. आपल्या कंपनीने कर्मचाऱ्यांची पात्रता वाढवून त्याद्वारे एक सक्षम, प्रशिक्षित व अष्टपैलू असे मानवी भांडवल म्हणून त्यांचा विकास करावा यावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामुळे आपले कर्मचारी कोणत्याही आव्हानांचा सामना करु शकतील. मानव संसाधनामार्फत संघटनात्मक नैपूण्य साध्य करणे यावर आपल्या कंपनीचा विश्वास आहे. म्हणून आपल्या व्यावसायिक नियोजन पूर्ण करताना सर्वप्रथम लोक हा दृष्टिकोन अनुसरला आहे.

## औद्योगिक संबंध

वर्षभरात कंपनीतील कर्मचाऱ्यांचे संबंध स्नेहाचे व सुंसवादाचे होते. कर्मचाऱ्यांचा त्यांची कामाची स्थिती, कल्याण इ. क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींसाठी कार्यशाळा आयोजित करुन त्यांना व्यवसायाचे बदलते चित्र, संधी, तसेच कंपनीपूढील धोके व आव्हाने या बद्दल जागरुक करण्यात आले. एकंदरीत औद्योगिक संबंध हे शांतेचे, सुसवादाचे व परस्परांवर विश्वासाचे होते.

या वर्षात कुठल्याही कर्मचाऱ्याचे वार्षिक परिश्रमिक ₹ ६०,००,०००/- किंवा दरमहा ₹ ५,००,०००/- याहून जास्त नव्हते. कंपनी

अधिनियम १९५६ चे कलम २१७ (२ए) ज्याचे सहवाचन कंपनी (कर्मचाऱ्यांची माहिती) नियमावली १९७५ सोबत केले जाते, त्यानुसार, ही माहिती देण्यात आली आहे.

## कंपनी अधिनियम २०१३ लागू करणे बाबत.

कंपनी अधिनियम २०१३ मधील महत्वाच्या तरतुदी दि. ०१.०४.२०१३ पासून लागू करण्यात आल्या आहेत. महानिर्मिती कंपनीने संचालक मंडळाची रचना, नेमणूक समित्या इ. बाबत आवश्यक ते बदल केले आहेत. मंडळात किमान २ स्वतंत्र संचालक असले पाहिजेत ही आवश्यकता पूर्ण करण्यासाठी श्रीमती इरावती दाणी यांची नियुक्ती करण्यात आली. मंडळाच्या लेखा परिक्षण समितीची पूनर्रचना केली. तसेच कंपनी अधिनियम २०१३च्या तरतुदींनुसार कंपन्याची सामाजिक जबाबदारी समिती, नामनिर्देशन व परिश्रमिक समिती यांचे गठन करण्यात आले.

## संचालक

श्री बिपिन श्रीमाळी यांची दि. ०५.०१.२०१५ पासून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक या पदावर नियुक्ती करण्यात आली.

श्री मुकेश खुल्लर यांची दि. ०४.०२.२०१५ पासून संचालक या पदावर नियुक्ती करण्यात आली.

श्री. जे. के. श्रीनिवासन् यांची दि. २६.०५.२०१४ पासून संचालक (वित्त) या पदावर आणि श्रीमती इरावती दाणी यांची स्वतंत्र संचालक या पदावर दि. २६.०६.२०१४ पासून नियुक्ती करण्यात आली.

## लेखापरिक्षण समिती

महानिर्मितीच्या लेखापरिक्षण समितीमधे सर्वश्री पी.व्ही.पागे, अध्यक्ष, श्री. व्ही.पी. सिंह आणि श्री. जे. के. श्रीनिवासन, सदस्य यांचा समावेश होता. या लेखा परिक्षण समितीच्या वर्ष २०१३-१४ मधे एकूण ८ बैठका झाल्यात.

महानिर्मितीच्या लेखा परिक्षण समितीची पूनर्रचना करण्यात आली. त्यामधे श्री. पी.व्ही. पागे, अध्यक्ष (स्वतंत्र संचालक) असून श्रीमती इरावती दाणी आणि श्री. विजय सिंह, संचालक (प्रवर्तन) यांचा सदस्यांचा समावेश आहे.

## संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन :

कंपनी अधिनियम १९५६ चे कलम २१७ (२ एए) यातील आवश्यकतेनुसार, संचालकाच्या जबाबदारी संबंधिचे निवेदन खालील प्रमाणे आहे.

१) कंपनीचे वार्षिक लेखे तयार करताना लागू असणाऱ्या लेखा मानकाचे अनुसरण करण्यात आले आहे व जर कोठे प्रत्यक्ष विचलन झाले असेल तर त्यासाठी योग्य असे स्पष्टीकरण जोडले आहे.

२) निवडलेल्या लेखा विषयक धोरणांचा वापर सातत्याने करण्यात आला. तसेच दि. ३१ मार्च २०१४ रोजी कंपनीच्या स्थितीचे सत्य व रास्त चित्र दिसावे यासाठी योग्य व सूज्ञ असे न्याय्य निर्णय व अंदाज करण्यात आले.

३) संचालकांनी कंपनीच्या मत्ता यांच्या रक्षणासाठी तसेच लबाडी व अन्य अनिमितता यांना आळा घालणे व त्या शोधून काढणे याासाठी कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतूदीनुसार आवश्यक लेखांचे दस्तऐवज जतन करण्यासाठी योग्य व पुरेशी काळजी घेतली आहे.

४) ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखा एका कार्यरत संस्थेच्या तत्वानुसार तयार करण्यात आले.

## ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञानाचा अंगिकार व परकीय चलनातील मिळकत आणि खर्च :

कंपनीअधिनियम १९५६ च्या कलम २१७ (१) (इ) ज्याचे वाचन कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालात विशेष माहितीचे प्रकटन) नियम १९८८ सोबत केले जाते, यातील आवश्यकतानुसार ऊर्जेचे संवर्धन करणे, तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे व परकीय चलनातील मिळकत व खर्च याची माहिती, या अहवालाचा भाग असलेल्या **जोडपत्र 'अ'** येथे दिली आहे.

## सांविधिक लेखा परिक्षण यांची निरीक्षणे / अभिप्राय यांना उत्तरे

सांविधिक लेखा परिक्षक यांची निरिक्षणे व अभिप्राय यांना कंपनी व्यवस्थापनाची उत्तरे **जोडपत्र 'ब'** येथे दिली आहेत.

## मुदतीच्या ठेवी :

कंपनीने या अहवालाच्या वर्षात जनतेकडून कोणत्याही मुदतीच्या ठेवी मागविल्या नाहीत / प्राप्त झालेल्या नाहीत.

## खर्च लेखा परिक्षक :

कंपनीचे ३१ मार्च २०१५ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी खर्च लेखा परिक्षक म्हणून मे. व्ही. जे. तलाठी अँड कंपनी, आणि मे. आर. नानाबॉय अँड कंपनी, संयुक्त खर्च लेखापाल यांची नियुक्ती, कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांच्या मंजूरीच्या अधीन राहून केली आहे.

## लेखा परिक्षक :

भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक हे कंपनीचे सांविधिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करतात. आर्थिक वर्ष २०१४–१५ साठी मे. बोरकर अँड मुझूमदार, मुंबई, मे. एम. पी. चितळे अँड कं. मुंबई आणि मे. उम्मेद जैन अँड कं. मुंबई यांची संयुक्त सांविधिक लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती केली.

## ऋणनिर्देश

कंपनीला मदत व सहकार्य करणारी केंद्र व राज्य शासनाची विविध मंत्रालये, विभाग, संस्था, वित्तीय संस्था व बँका, सांविधिक लेखापरिक्षक, खर्च लेखा परिक्षक, भारताचे लेखा नियंत्रक व महा लेखापरिक्षक नवी दिल्ली, महालेखापाल (वाणिज्य) मुंबई, केंद्रीय व राज्य विद्युत नियामक प्राधिकारी, अपील न्यायाधिकरण आणि कंपनीचे भागधारक यांना त्यांच्या सहकार्याबद्दल संचालक प्रशंसापूर्ण कृतज्ञता व्यक्त करीत आहेत. कंपनीचे कर्मचारी यांनी दिलेल्या तळमळीच्या व समर्पित वृत्तीच्या सेवेबद्दल त्यांना धन्यवाद देत आहे.

संचालक मंडळाच्या वतीने

**बिपिन श्रीमाळी**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २५.०३.२०१५
स्थळ : मुंबई.

# संचालक अहवालाचे जोडपत्र 'अ'

**कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालात तपशीलाचे प्रकटन करणे) नियमावली १९८८ नुसार आवश्यक असणारे तपशील :**

## अ) ऊर्जा संवर्धन

वर्ष २०१३-१४ मधे ऊर्जा संवर्धनाची खालील कामे करण्यात आली.

- कंपनीमध्ये ऊर्जेचे अंतर्गत अंकेक्षण संबंधी क्षेत्रात म्हणजे कॉम्प्रेस्ड एअर, फीड वॉटर, कुलींग वॉटर सिस्टम, हिटर्स इ. ठिकाणी करण्यात आले.
- वीज निर्मिती केंद्रातील कर्मचाऱ्यांची जागरूकता वाढावी म्हणून कर्मचारी सतर्कता / प्रशिक्षणाचे कार्यक्रमाचे आयोजन केले.
- ऊर्जा संवर्धनाची जाणीव, भित्तीपत्रके, निबंध स्पर्धा आदि प्रकारे निर्माण करण्यात आली.
- महानिर्मिती कंपनीकडे ऊर्जा अंकेक्षण करणारे व प्रमाणित ऊर्जा व्यवस्थापक आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग केंद्राच्या संचालन व सुव्यवस्थेच्या दैनंदिन कामात केला जातो.

**साह्यकारी विजेचा वापर :**

- साह्यकारी वीजेच्या वापराचे अचूक मूल्यमापन करण्यासाठी ०.२ वर्गातील ऊर्जा मापन यंत्रे (मीटर्स) वापरले जातात.
- दिवसा सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त उपयोग केला जातो.
- ऊर्जेचे कार्यक्षम वापर करणारे दिवे वापरून प्रकाश योजनेत सुधारणा
- कॉम्प्रेस्ड एअर, स्टीम पाईप, कुलींग पॉवर व विजेच्या यंत्रणेतील वीज गळतीला प्रतिबंध केला जातो.
- डी. एम. वॉटर फ्लो मिटर्स स्थापित केले.
- उरण येथील जी. टी. युनीटसाठी नैसर्गिकरित्या थंड करण्याची व्यवस्था
- सहाय्यक वीज वापराचे रक्षण करणारे देखभालीचे वेळापत्रक व स्थीतीवर लक्ष ठेवणे.

**प्रकाश योजना**

- एच पी एम व्ही दिवे बदलून एच पी एस व्ही दिव्याचा वापर
- इलेक्ट्रॉनिक बलास्ट व सी एफ एल प्रकाश साधनांचा वापर
- इमारतींचे जीने, टर्बाइन बेसमेन्ट एरिया या जागेत वाापरापुरते चालू / बंद करता येईल असे प्रकाशाचे वेगवेगळे स्वीचेस पुरविण्यात येतात.

**उष्णता ऊर्जा**

- ऑनलाईन कंडेसर ट्यूब क्लिनिंग सिस्टमवर योग्य लक्ष देणे
- उष्णता रोधकांची वेळेवर दुरुस्ती

- एअर प्री हिटर्स व भट्ट्या यांची शक्य तेवढी स्वच्छता
- बॉयलर एक्सेस एअरचा जास्तीत जास्त वापर
- उष्णता दराचे एस ई / जी एम / सी जी एम स्तरावर अनुक्रमे साप्ताहिक / पंधरवड्याला / मासिक अनुबोधन करणे.

**वंगण**

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना सुरु केली
- गळणारे इंधन तेल पुन: मिळविण्यासाठी ऑइल स्कीमर्सची रचना व विकास
- भुसावळ व नाशिक केंद्रात टर्बाइन व बी एफ पी तेलाचे केंद्रवर्ती पद्धतीने गाळून घेणे

**डी एम वॉटर**

- डी एम वॉटर फीड लाईन व स्टीम यांची गळती रोखण्यास प्राधान्य दिले.
- खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात सोनिक बॉयलर डिटेक्शन सिस्टीमची स्थापना

**संकीर्ण पाणी वापर**

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर या केंद्रातील कोळशाच्या राखेच्या पाण्याचा पुनर्वापर केला जातो
- आग विझविण्यासाठी लावलेले पाण्याचे नळ पूर्वी जमीनीच्या आत असत. त्यातील गळती वेळेवर दुरुस्त करता यावे म्हणून जमीनीच्या वर लावण्यात आले.

### ब. तंत्रज्ञान समाविष्ट करणे

अ) फॉर्म 'बी' नुसार तंत्रज्ञान समाविष्ट करण्याचे प्रयत्न केले जातात.

## फॉर्म 'बी'

समावेशना संबंधीच्या माहितीचे प्रकटन

- अमोनिया इंजक्शन फल्यू गॅस कंडिशनींग सिस्टीम (ए एफ जी सी) स्थापन केली.
- परळी युनीट-३ येथील संचालक प्रणाली दर्जा उंचावला.
- महानिर्मिती मुख्यालय व वीज केंद्रात 'इ' निविदा संकल्पना राबविली.

### संशोधन व विकास

**१. कंपनीने संशोधन व विकासाचे कार्य सुरू केलले विनिर्देशित क्षेत्र**

कुलींग वॉटरचे आझोनायझेशन, ए एफ जी सी सिस्टम, उरण येथे आयलॅडींग व ब्लॅक स्टार्ट सुविधा, निरॅफॉन ॲकॉस्टिक क्लिनींग सिस्टम ट्यूब गळती शोधण्याची यंत्रणा, कोळसा गिरण्यांसाठी एम पी एस पी प्रणाली अंगीकारणे, तेल गाळणे व तेल कमी वापरणारी यंत्रे वापरणे, सांडलेले तेल पूनर्वापरासाठी गोळा करणे इ.

**२. वरील संशोधन व सुव्यवस्थेचे लाभ :**

**ओझोनायझेशन :** कार्य परंपरागत पद्धतीपेक्षा कमी खर्चात होते. धातूंची झीज कमी होते, हाताळणे सुरक्षित असते. कुलींग वॉटर सिस्टम मध्ये लिजीओनेला जंतूचा स्तर नष्ट केला जातो.

**ए एफ जी सी :** प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणकांच्या आवश्यकतेनुसार औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील एस पी एम चा स्तर १५० एम जी / घन एन एम पेक्षा कमी राखण्यात येतो.

**आयलँडिग सिस्टम :** जर प्रणालीत अथडळे आले / बंद पडली तर ती वेगळी करण्याची योजना लवकरच कार्यरत होईल. त्यामुळे जी टी पी एस ची स्थानिक व वीज जाळ्यापासून वेगळे केले जाते.

**ब्लॅक स्टार्ट सुविधा :** जर वीज जाळ्याला काही धक्का बसला अथवा ते अलग होऊ शकले नाही तर ब्लॅक स्टार सुविधेमुळे युनिट्स पुन्हा पुर्वस्थितीत आणून वीज पुरवठा पूर्ववत करण्याचे काम लवकर होते.

**३. भविष्यातील योजना :**

ऑनलाईन ऊर्जा व्यवस्थापन स्थापन करण्यासाठी. ए एफ जी सी प्रणाली इतर औष्णिक केंद्रातही लावण्यात येईल.

**४. संशोधन व सुव्यवस्था खर्च :**

'निरंक'

## तंत्रज्ञान समाविष्ट करणे, अंगीकारणे व नवीन संशोधन

१. तंत्रज्ञानाचा समावेश, अंगीकार व नवीन संशोधनाचे प्रयत्न

२. वरील प्रयत्नामुळे मिळालेले लाभ

कंपनीने कोणत्याही आयात केलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग केलेला नाही.

## क) परकीय चलनातील मिळकत व खर्च :

अ) निर्यात संबंधी कार्य तसेच निर्यात वाढीसाठी प्रयत्न, उत्पादनात व सेवेस नवीन निर्यात बाजारपेठ विकसीत करणे व निर्यात योजना.

ब) वापरलेले / कमवलेले एकूण परकीय चलन.

| वापरलेले / कमवलेले एकूण परकीय चलन | | ₹ |
|---|---|---|
| १. | परकीय चलनातील खर्च | |
| | सी. आय. एफ. तत्वांवर मोजणी केलेल्या भांडवली मालाचे | ₹ ६,४३३,८८८,८२६/- |
| | मालाचे मूल्य, घटक व सुट्टे भाग | ₹ ३,९८६,७४१/- |
| २. | कमवलेले परकीय चलन | निरंक |

# जोडपत्र 'ब१'

## आर्थिक वर्ष २०१३-१४ च सांविधिक लेखापरिक्षक यांचा अहवाल व त्यास व्यवस्थापनाने दिलेली उत्तरे

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| **कंपनीच्या आर्थिक/वित्तीय विवरण पत्रावर अहवाल**<br>१. आम्ही, **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, मर्यादित (महानिर्मिती/कंपनी)ची** सोबत जोडलेल्या वित्तीय विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केले. या विवरणपत्रात दि. ३१ मार्च २०१४ रोजीचा ताळेबंद आणि त्या दिवशी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक, रोकडता प्रवाह विवरणपत्रक आणि महत्वाची लेखाधोरणांचा सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे. | कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतूदी आणि त्यात दिलेली व कंपनीला लागू होणारी लेखा मानके यानुसार सदर वित्तीय विवरणपत्रे तयार केली आहेत. यामधे दि. ३१.०३.२०१४ रोजी असलेला ताळेबंद आणि रोकडता प्रवाह पत्रक तसेच आ. वर्ष २०१३-१४ याचे नफा व तोटा विवरण पत्रक यांचा समावेश आहे. |
| **वित्तीय विवरणपत्रांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी**<br>२. कंपनी अधिनियम १९५६ (सदर कायदा) यातील, कलम २११ याचे उपकलम (३सी), ज्याचे सहवाचन कंपनी व्यवहार मंत्रालयाने कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १३३ यासंबंधी काढलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. १५/२०१३ दि. १३ सप्टेंबर २०१३ या सोबत होते. यात ज्यांचा संदर्भ दिला आहे, ती लेखांची मानके यानुसार कंपनीची आर्थिक स्थिती, वित्तीय कामगिरी आणि रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य दर्शन घडविणारी आणि भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखांच्या तत्वांशी अनुदाय अशी विवरणपत्र तयार करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. | |
| **लेखापरिक्षकांची जबाबदारी**<br>३. या वित्तीय विवरण पत्रावर आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारेले मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षणाचे काम इन्स्टियूट ऑफ चार्टर्ड अकौटंट्स ऑफ इंडिया या संस्थेने जारी केलेल्या लेखापरिक्षणांच्या मानकानुसार पार पाडले. वित्तीय लेखा विवरणपत्रे प्रत्यक्षात चुकीची माहिती देत नाहीत याबद्दल प्रमाणशीर हमी मिळविणे या हेतूसाठी नैतिक आवश्यकतांची आम्ही पूर्ती करणे व त्यादृष्टीने लेखापरिक्षणाचे नियोजन करुन ते पूर्ण करणे असा या लेखामानकांचा कटाक्ष असतो. | लेखा परिक्षकांनी मागणी केल्यानुसार त्यांना माहिती व त्यास पुष्टी देणारी कागदपत्रे कंपनीने दिलेली आहेत. |
| ४. वित्तीय विवरण पत्रांमधील रकमा आणि प्रकटने याविषयी लेखापरिक्षणातून पुरावे मिळविण्यासाठीच्या कार्यपद्धतीचा समावेश लेखा परिक्षणाच्या कार्यात केला जातो. या कार्यपद्धतीची निवड लेखापरिक्षकांची न्यायबुद्दिवर अवलंबून असते त्यात वित्तीय विवरणपत्रात लबाडीने किंवा नजरचूकीने प्रत्यक्ष गैर माहिती नोंदलेली गेली नाही किंवा आहे या धोक्यांचा मूल्यमापनाचा अंतर्भाव असतो. | |

| | सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|---|
| | अशा धोक्यांचे मूल्यमापन करण्यासाठी, विवरण पत्रे तयार करणे आणि ती सादर करणे यासाठी त्यासंबंधी कंपनीच्या अंतर्गत नियंत्रणांचा विचार लेखा परिक्षक करतात. मात्र कंपनीची अंतर्गत लेखा नियंत्रणाच्या परिणामकारकतेवर आमचे मत व्यक्त करण्याच्या हेतूसाठी त्याचा विचार करीत नाही. तसेच कंपनीने वापरलेली लेखा विषयक धोरणांच्या योग्यते विषयी मूल्यमापन करणे आणि व्यवस्थापनाने केलेल्या लेखाविषयक अंदाजाची व्यवहार्यता यांचाही समावेश लेखापरिक्षणात केला जातो. तसेच वित्तीय विवरणपत्रांचे सर्वांगिण मूल्यांकन केले जाते. | |
| ५. | आमची पात्र असलेली लेखा परिक्षण विषयक मताकंरित आम्ही पुरेसे व योग्य असे लेखा परिक्षण विषयक पुरावे मिळविले आहेत असा आमचा विश्वास आहे. | |
| | **पात्र अभिप्रायांचा आधार :** | |
| ६. | आम्ही खालील मुद्यांकडे लक्ष वेधतो. | |
| | *१. महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५, अनुसार दि. ६ जून २००५ रोजी हस्तांतरीत झालेल्या कंपनीच्या मत्ता व दायित्वे यात काही शिल्लक बाबी समाविष्ट आहेत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार या शिलकी बाबी, स्थिर मत्ता, चालू नसणाऱ्या मत्ता, चालू मत्ता, चालू नसलेली दायित्वे आणि चालू दायित्वे यांच्या आहेत आणि त्या म.रा.वि.मं. सूत्रधार कंपनी लि. ने मान्य केल्या असून त्या महानिर्मिती कंपनीच्या लेखा पुस्तकात गठीत केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाकडून अंतीम हस्तांतरण योजना अद्याप अधिसूचित व्हायची आहे. जर या आकडेवारीत अंतिम अधिसूचनेच्या वेळी काही बदल झाला तर ताळेबंद तसेच नफा व तोटा पत्रकावर त्याच्या प्रभाव पडू शकेल. तसेच आम्ही टिपा क्र. २ याचा संदर्भ देतो, यात सदर योजनेत अंशत: सुधारणा करुन महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनीकडून यापूर्वी घेतलेल्या कर्जाचे दायित्व त्यावरील व्याजासह, हस्तांतरण कंपनीकडे झाले आहे. व त्याला मराविमं. सूत्रधारी कंपनी लि. यांनी मंजूरी दिली आहे.* | अंतिम हस्तांतरण योजनेची अंतिमीकरण करण्याबाबत महाराष्ट्र शासन सक्रीय विचार करीत आहे. महाराष्ट्र शासनाकडून अंतिम अधिसूचना निघाल्यानंतर आरंभीच्या शिलकी वर होणाऱ्या प्रभावामुळे जे बदल होतील त्याबाबत आवश्यक त्या मंजूरी घेऊन त्यांच्या नोंदी लेखांच्या पुस्तकात करुन त्यांचे परिणाम दाखविण्यात येतील. |
| | *२. टिपा क्र. ३१ यात नमूद केल्याप्रमाणे, किरकोळ, ऋणको, कर्जे व अग्रीमे, अनामती, पुरवठयाच्या साहित्याचे दायित्व, कोळसा कंपन्याच्या शिलकी या संबंधितांकडून निश्चित होण्याच्या आणि/किंवा उपकंपन्याचे अहवाल यांच्याशी मेळ करणे, याच्या प्रकरणाशी अधीन आहेत. अशी निश्चिती प्रलंबित असल्यामुळे तसेच मेळ पूर्ण करणे प्रलंबित असल्यामुळे, त्यांचे संबंधिताशी समायोजन करणे शक्य झाले नाही. या शिलकीच्या स्थितीवर आणि कंपनीच्या नफ्यावर काय परिणाम होऊ शकतो यावर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.* | कंपनीने 'सॅप इंटिग्रेटेड सिस्टम' ही प्रणाली अमलात आणलेली आहे. त्याद्वारे विक्रेते-निहाय, ग्राहक-निहाय, कर्मचारी निहाय देय असलेल्या व प्राप्त करावयाच्या शिलकींची माहिती उपलब्ध होईल. या प्रणालीच्या प्रवर्तनातून, लेखांकनाच्या प्रणालीमधील दुय्यम अभिलेख स्वंयचलितरित्या निर्माण केले जातात. यापूर्वी वापरात असलेल्या प्रणाली (लेजसी सिस्टम) यामधे याची कमतरता असे. त्यामुळे वेगळे अभिलेख तयार करुन त्यांचे जतन |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| | करावे लागत असे व त्यांचा मेळ घाळतांना समस्या उद्भवत. आता आगामी वर्षांपासून दुय्यम स्वरुपांचे अभिलेख आणि त्यासोबत नियंत्रण लेजर याची मेळ खात्रीने उपलब्ध होईल. ज्या खूप जुन्या प्रकरणी शिलकी खूप जुन्या असल्यामुळे त्यांची सांगड घालता येत नसल्यास, त्या निर्लेखित करणे / त्यांचे पूनर्लेखत करणे याविषयी योग्य ते समर्थन करुन योग्य ती कार्यवाही केली जाईल, जेणेकरुन वरील संदर्भात नियंत्रक लेखावहीसोबत जुळणाऱ्या स्पष्ट शिलकी मिळतील. |
| ३. *टिपा क्र. ३२ यात नमूद केल्याप्रमाणे, कोळसा पुरवठा करणाऱ्यांना दिलेली अग्रीम रक्कम ₹ १,१०७.७७ कोटी, ही कर्जे व अग्रीमे यात समाविष्ट आहे. या अग्रीमाच्या आधारे कंपनीने कोळसाचा पुरवठा यात ₹ १,०३३.८६ कोटीचे दायित्वाची तरतूद केली आहे. अंतीम देयक मंजूर होणे प्रलंबित असल्याने कंपनीने सदर दायित्वाचे दिलेल्या अग्रीमासोबत निर्लेखन केलेले नाही. यामुळे संबंधित मत्ता व दायित्वे यात जादा विवरण झाले आहे. त्याचा कंपनीच्या नफ्यावर होऊ शकणाऱ्या प्रभावाचे मूल्यामापन केलेले नाही.* | कोळसा कंपन्यांना अग्रीमे देणे व त्यांचा निपटारा करणे ही सतत चालणारी प्रक्रीया आहे. कोळशांचा प्राप्तींच्या टिपण्यांचा निपटारा करणे या कार्यवाहीमध्ये आ. वर्ष २०१३-१४ मध्ये आणखी सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे कोळशांची अग्रीमे व कोळशांची दायित्वे ही रु. १९०० कोटीवरुन रु. ११०० कोटी इतकी कमी करण्यात आली. आगामी वर्षात 'सॅप प्रणालीमुळे' ही अग्रीमे व दायित्वे यांचा नियमीत मुदतीमधे निपटारा करण्याची खातरजमा केली जाईल. या संदर्भात कोळशाच्या नमुन्यांचे निष्कर्ष मिळणे व संबंधित अग्रीमाचा व दायित्वांचा निपटारा यासाठी लागणारा वेळ विचारात घेतल्यास, कोळसा कंपन्याकडे रु. ७०० कोटी एवढा अग्रीम दायित्व असणे पर्याप्त असेल म्हणून या योग्य मानलेल्या मर्यादे पर्यंत निपटारा केला जावा. यासाठी कंपनी प्रयात्नशील राहील. |
| ४. *कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) सोबत केलेल्या वीज खरेदी कराराच्या अटीनुसार (महानिर्मिती) कंपनीने वर्षभरात विलंबाने भरणा केल्याबद्दल त्याचा अधिभाराचा रक्कम ₹ ७८७.३५ कोटी एवढे उत्पन्न ग्राहकाकडील अधिभाराचे उत्पन्न या लेखाशीर्षीतंर्गत मान्य केले आहे. महावितरणने ३१ मार्च २०१४ रोजी असलेली या अधिभाराची रक्कम ₹ १,६५०.३५ कोटी भरली नाही. एकूण ₹ १९६.२४ कोटी एवढया निव्वळ फरकाचा मेळ घालण्याच्या प्रकीयेत आहे. महावितरण कडून देयके स्वीकारली न जाणे व लेखांचा मेळ न लागणे, या बाबीचा विचार* | महानिर्मिती कंपनीने वीज खरेदी कराराच्या संमत अटीनुसार महावितरण कंपनीला अधिभाराची देयके दिली असून ती महावितरण कंपनीला बंधनकारक आहेत. ही सर्व वैध, अस्सल व प्राप्ती योग्य देयके आहेत. या उलट या देयकांची लेखा नोंद केली नाही म्हणून महावितरणकडून खर्च व दायित्वे यांची त्याप्रमाणात कमी नोंदणी झाली आहे. कंपनीने महावितरण सोबत मेळ घाळण्याची एक फेरी पूर्ण |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| *केल्यानंतर, आम्ही अशा उत्पन्नांची विश्वसनीयता आणि त्याचा (अ) या वर्षाच्या कंपनीचा नफा, (ब) व्यापारातून प्राप्त होऊ शकणारे मूल्य आणि (क) विनादेयकाचा महसूल आणि (ड) राखीव व अधिक्य या बाबींवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास असमर्थ आहोत.* | केली. आगामी वर्षात त्याची माहिती लेखापरिक्षकांना दिली जाईल. |
| **७. पात्र असणारा अभिप्राय :-**<br>*आमचे मत तसेच आमची सर्वोतपरी माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे, यानुसार सदर वित्तीय विवरणपत्रके कायद्यानुसार आवश्यक असणारी माहिती त्यात आवश्यक असलेल्या पद्धतीनुसार देतात आणि वरील परिच्छेद (६) यातील मुद्दे क्र. (१) ते (४) यात दिलेली आमची निरिक्षणे ज्यांचा दि. ३१ मार्च २०१४ रोजीच्या निव्वळ मत्ता व कंपनीचा वर्षाचा नफा, यावर होऊ शकणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन करता येत नाही. यांच्या अधीन राहून भारतात सर्वसाधारणपणे स्विकारल्या जाणाऱ्या लेखा तत्वांशी सुसंगत राहून, ही कागदपत्रे सत्य व योग्य दर्शन घडवितात.*<br>*(अ) ताळेबंदासंबंधी : कंपनीच्या व्यवहाराची स्थिती दि.३१ मार्च २०१४ रोजी असलेल्या स्थितीनुसार आहेत.*<br>*(ब) नफा व तोटा पत्रकासंबंधी : वरील तारखेला संपलेल्या वर्षाच्या नफ्यानुसार आहेत, आणि*<br>*(क) रोकडता प्रकट विवरणपत्राबाबत : या तारखेला संपलेल्या वर्षी रोकडता प्रवाह नुसार आहे.* | कंपनीने, सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखा तत्वे आणि त्यानुसार लागू होणारी नियामवली व नियमत, यानुसार उचित अशी लेखा पुस्तके जतन केली आहेत. |
| **लक्षवेधी प्रकरणे :**<br>८. आमच्या अहवालाच्या पात्रतेला बाधा न पोहचविता, आम्ही खालील मुद्यांकडे लक्ष वेधतो :<br>(अ) टिपा क्र ३७ (डी) : लेखा मानक १९ अंतर्गत आवश्यक असणारे माहितीचे प्रकटन न केल्या संबंधी आहे. कंपनी नियमावली (लेखामानक), २००६ यातील भाडेपट्टी या अंतर्गत विविध जलविद्युत प्रकल्पातील वीज निर्मितीच्या सुविधा यासाठी महाराष्ट्र शासनासोबत करावयाच्या भाडेपट्ट्याच्या करारांची कार्यवाही प्रलंबित असणे. | महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जलविद्युत केंद्राचे भाडे निश्चित करण्यासाठी म.वि.नि. आयोगाच्या आदेशाच्या आधारे, महानिर्मिती कंपनीने, भाडेपट्टीचा लेखा केला आहे. |
| (ब) टिपा क्र. ३७ (ए)(दोन) : सी पी एफ ची हंगामी स्वरुपाच्या लेखामुळे व्याजास होणाऱ्या तुटी संबंधी आवश्यक तपशील व माहिती उपलब्ध नाही. | भविष्य निर्वाह निधी (CPF) गुंतवणूकींचे विमागणित शास्त्रानुसार मूल्यांकन करता येणे शक्य झालेले नाही; कारण या भ.नि.निधीचे विश्वस्त यांनी मूल्यांकनाच्या हेतुसाठी आवश्यक असणारे तपशील निश्चित कालमर्यादेनुसार दिले नाहीत. मात्र आगामी वर्षात हा विषय पून्हा या भ.नि.निधीच्या विश्वस्तांकडे नेण्यात येईल. |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
| --- | --- |
| (क) टिपा क्र. ३७(एच) : कर्जाच्या दायित्वाच्या मान्यते संबंधी आहे. १५० मे.वॅ. क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पासंबंधी भारत सरकार मार्ाफत महाराष्ट्र शासनाला के.एफ.डब्ल्यू यांनी वितरीत केलेले कर्ज प्रत्यक्ष मिळणे प्रलंबित आहे. या ₹ ९.५१ कोटीचे कर्ज व त्यावरील व्याज ₹ ०.१७ कोटी यांच्या दायित्वास मान्यता मिळणे. | के.एफ.डब्ल्यू यांच्याकडून कर्जेची प्राप्ती भारत-सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या मार्गे महानिर्मितीकडे होते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या अर्थसंकल्पित तरतुदीनंतर ती कंपनीला मिळते. प्रत्यक्ष प्राप्ती प्रलंबित असल्यामुळे, कंपनीने यासाठीचा लेखा उपार्जन तत्वानुसार केला आहे. |
| ९. **इतर कायदेविषयक व नियमनाविषयीच्या आवश्यकते संबंधी अहवाल**<br>भारत सरकारने कंपनी अधिनियम १९५६चे कलम २२७ यातील उपकलम (४ए) यातील तरतूदीनुसार काढलेला कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) आदेश २००३ आणि त्यामधे दुरुस्ती करणारा कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) (दुरुस्ती) आदेश २००४ यातील आवश्यकता नुसार तसेच आमच्या मत्ते योग्य असणाऱ्या तपासण्या यांच्या आधारे व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आम्ही एका जोडपत्रात सदर आदेशातील परिच्छेद ४ व ५ हे ज्या मर्यादित कंपनीला लागू होतात; त्याबाबत एक निवेदन जोडले आहे. | |
| १०. कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ (३) यातील आवश्यकते नुसार आम्ही अहवाल देतो की,<br>अ) आम्ही आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणाकरिता आवश्यक असणारी सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळविली आहेत.<br>ब) आमच्या मत्ते, कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असणारी लेखांची नोंदपुस्तके योग्य प्रकारे केली आहेत; असे आम्ही या लेखा नोंद पुस्तकांचे परिक्षण केल्यानंतर दिसून आले आहे.<br>क) या अहवालाशी संबंधीत ताळेबंद, नफा व तोटा यांचे पत्रक व रोकडता प्रवाह विवरणपत्र ही लेखा नोंद पुस्तकाशी सुसंगत आहेत.<br>ड) आमच्या मते सदर ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह ही विवरणपत्रे, ज्या लेखा मानकांचा उल्लेख कंपनी अधिनियम १९५६ याचे कलम २११, उपकलम ३(सी) आणि ज्याचे सहवाचन कंपनी व्यवहार मंत्रालयाने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३३ च्या संदर्भात काढलेले सर्वसाधारण परिपत्रक १५/२०१३ दि. १३ सप्टेंबर २०१३ या सोबत केले जाते. त्याची पूर्तता करतात.<br>इ) ही एक सरकारी कंपनी असल्यामुळे, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्रमांक जी एस आर ८२९(इ) दि. २१ ऑक्टोबर २००३, यानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २७४ याचे उपकलम १ अंतर्गत खंड (जी) यातील तरतूदी या कंपनीला लागू होत नाहीत. | कंपनी अधिनियम १९५६च्या तरतुदी आणि त्याप्रमाणे कंपनीला लागू होणारी लेखा मानके, यानुसार सदर वित्तीय विवरणपत्रके तयार केली आहेत. यामधे दि. ३१.०३.२०१४ रोजीचे ताळेबंद पत्रक आणि रोकडता प्रवाह पत्रक तसेच आर्थिक वर्ष २०१३-१४ चे नफा व तोटा विवरण पत्रक कंपनीने तयार केले आहे. |

# जोडपत्र 'ब२'

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षासाठी सांविधिक लेखापरिक्षक यांच्या अहवालाचे जोडपत्रातील अभिप्रायवर कंपनीची उत्तरे:

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| १. अ) *या कंपनीने स्थिर मत्तांची संपूर्ण माहिती दर्शविणारे योग्य अभिलेख जतन केले आहेत. त्यात संख्यात्मक तपशील आणि स्थिर मत्तांची जागा यांचा समावेश आहे. ज्या काही जागांवरील थोड्या स्थिर मत्तांची बाब निहाय माहिती व संहिताकरण या स्थिर मत्तांच्या नोंदणी वहीशी अनुरुप करण्याचे काम चालू आहे; त्यांचा अपवाद वगळता अभिलेख योग्य आहेत.*<br>ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षातून एकदा करावी असे कंपनीचे धोरण आहे. आमच्या मते, कंपनीचे एकूण आकारमान व व्यवसायाचे स्वरुप याच्याशी हे धोरण प्रमाणशीर व सुरुंगत आहे. अशा पडताळणीत आढळून आलेल्या विसंगती फार मोठ्या नाहीत.<br>क) कंपनीच्या चालू व्यवहारावर ज्यामुळे परिणाम करील अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात स्थिर मत्तांची विल्हेवाट लावण्यात आलेली नाही. | लेखांचे परिणाम नोंदणी यापूर्वीच पूर्ण झालेली असून स्थिर मत्ता नोंदवही अद्यावत करण्याचे काम त्यांच्या संबंधित ठिकाणी प्रगतीपथावर आहे. मत्तांची माहिती (ॲसेट डेटा) सॅप प्रणालीत अपलोड करण्यात आली आहे. |
| २. अ) व्यवस्थापनाने यावर्षात नेमलेल्या सनदी लेखापालांच्या बाहय संस्थाकडून वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. *मात्र कोळसा कारखान्यांनी नाकारलेल्या मालाच्या वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आलेली नाही.*<br>ब) *कोळसा कारखान्यांनी नाकारलेल्या मालाच्या वस्तूसूचीचा अपवाद वगळता,* व्यवस्थापनाने अनुसरलेली वस्तूसूचीच्या प्रत्यक्ष पडताळणीची कार्यपद्धती ही कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरुप याच्याशी सुसंगात आहे. असे आमचे मत असून ते आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरण यानुसार आहे.<br>क) वस्तूसूचीच्या अभिलेखांचे आम्ही परिक्षण केले. त्याच्या आधारे आमचे मत असे आहे की, कंपनीने वस्तूसूचीच्या अभिलेखांचे योग्य प्रकारे जतन केलेले आहे. वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी केल्यानंतर अभिलेखाच्या नोंदीशी तूलना करताना ज्या विसंगती आढळल्या, त्याचे लेखांमधे योग्य ते समायोजन करण्यात आले. | लेखा मानक २ नुसार भंगार / रद्दी सामान यांची नोंद नियमीत संचालन व देखभाल यांच्या वस्तूसूचीत केली जात नाही. कोळसा गिरण्यांनी नाकारलेला माल यामधे अ-प्रमाणित आकार व रद्दी माल यामुळे कोळसा-गिरण्यांनी नाकारलेल्या मालाचा समावेश असतो. तो नेहेमींच्या वस्तूसूचीचा भाग नसतो. तर तो भंगाराच्या स्वरुपातील असतो. त्यामुळे कंपनीने त्याची नेहेमीच्या वस्तूसूचीतील बाबींप्रमाणे प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. मात्र आगामी वर्षापासून अंतर्गत नियंत्रणाचा एक भाग म्हणून कंपनी नाकारलेल्या कोळशाची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहे. |
| ३. आम्हास पुरविलेल्या माहितीनुसार महानिर्मिती कंपनीने कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत ज्याची नोंद | कलम ३०१ मधे नोंदलेल्या फर्म्सकडून कंपनीने कोणतेही कर्जे घेतली नाहीत किंवा त्यांना कर्जे |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| झाली आहे अशा कंपन्या, फर्म्स किंवा इतर व्यक्ती/संस्था यांना कोणतीही कर्जे दिली नाहीत / किंवा त्यांचेकडून कर्जे स्वीकारली नाहीत. म्हणून त्यासंबंधीच्या आदेशातील खंड (३)(ए)ते(जी) यानुसार अहवाल देणे, ही बाब महानिर्मिती कंपनीस लागू होत नाही. | घेतलेली नाहीत म्हणून या संबंधीच्या व्यक्ती-संस्था याबाबतचे प्रकटन करणे कंपनीला लागू होत नाही. |
| ४. आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार वस्तूसूचीनुसार मालाची व स्थिर मत्तांची खरेदी करणे व वीज विक्री करणे या करिता व कंपनीचे एकूण आकारमान व व्यवहाराचे स्वरुप याच्याशी सुसंगत अशी अंतर्गत नियंत्रणांची कार्यपद्धती कंपनीमधे पुरेशा प्रमाणात आहे. ***मात्र रद्दी मालाची हाताळणी करणे यासाठीच्या अंतर्गत नियंत्रणात आणखी सुधारणा करण्याची गरज आहे.*** | भंगार माल हा लेखा मानक-२ प्रमाणे वस्तू सूचीचा भाग नसल्यामुळे कंपनी वार्षिक वस्तूसूची पडताळणी करणे या अंतर्गत भंगार मालाची पडताळणी करीत नाही. मात्र जेव्हा संबंधित विद्युत निर्मिती केंद्रे जेव्हा त्यांच्या नियत मुदतीनंतर लिलावाची प्रक्रीया सुरु करतात, तेव्हा त्यावेळेला भंगाराची पडताळणी करणे त्यांच्या गटानिहाय सांख्यिकी करण करणे केले जाते. |
| ५. आम्ही केलेले लेखांच्या वह्या/पुस्तकांचे परिक्षण आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे, यानुसार ज्याची नोंदणी कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत करण्याची गरज आहे, असा कोणताही व्यवहार केलेली नाही. | कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ३०१ नुसार तयार केलेल्या नोंदवहीमधे कंपनीने कोणतीही माहिती नोंदली नाही; कारण ज्याची त्यात नोंदणी करणे आवश्यक ठरेल असा कोणताही व्यवहार कंपनीने केलेली नाही. |
| ६. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कंपनी अधिनियम १९५६ आणि कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियामवली १९७५ जनते यातील कलम ५८ए यातील तरतूदींच्या अभिप्रेत असणाऱ्या अर्थानुसार जनतेकडून ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. | या अहवाल वर्षात कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्विकारलेल्या नाहीत. |
| ७. कंपनीने आपले मुख्यालय व अन्य जागी अंतर्गत लेखा परिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांच्या बाहय संस्थांची नियुक्ती केली. ***मात्र काही प्रकरणी त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.*** याच्या अधीन राहून. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीत सध्या असलेली अंतर्गत लेखा परिक्षणाची प्रणाली ही पूरेशी व कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवहाराचे स्वरुप याच्याशी सुसंगत आहे. ***मात्र त्याची पूर्तता करण्याची यंत्रणा सुधारण्याची गरज आहे.*** | कंपनीने अंतर्गत लेखा परिक्षण अहवालाची वारंवारता ही दरमहा करण्याऐवजी दर तीन महिन्यांनी करावी असा बदल केला आहे. तसेच आगामी वर्षात अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल वेळेवर सादर करण्याबद्दल खात्री केली जाईल. तसेच लेखापरिक्षणातील मुद्यांची पूर्तता, सर्व स्तरांवर त्वरेते पूर्ण करण्यात येईल. |
| ८. केंद्र सरकारने विजेच्या वितरणासाठी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९(१)(डी) नुसार खर्च अभिलेख जतन करण्याचे विहित केले आहे. आम्ही, कंपनीच्या संबंधित अभिलेखांचा स्थूलमानाने आढावा घेतला व आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने विहित स्वरुपात अभिलेख तयार करणे व त्यांचे जतन करणे ही कामे केली आहेत; असे प्रथम दर्शनी दिसून येते. मात्र, कंपनी (खर्च लेखा अभिलेख) नियमावली २०११ अंतर्गत खर्च लेखा आवश्यक आहेत, ते अचूक व परिपूर्ण आहेत किंवा कसे हे निश्चित करण्यासाठी सदर खर्च लेखांचे कोणतेही परिक्षण केलेले नाही. | कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०१ (१)(डी) नुसार आवश्यक असलेले खर्चाचे अभिलेख कंपनीकडून जतन केले जातात. आणि अशा अभिलेखांचे लेखा परिक्षण कंपनीने नेमलेल्या खर्च लेखापरिक्षकांकडून केले जाते. |

<table>
<tr><th>सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल</th><th>व्यवस्थापनाची उत्तरे</th></tr>
<tr><td>
९ (अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तसेच लेखा-पुस्तके व अभिलेख यानुसार, कंपनी सर्वसाधारणपणे सांविधिक देणी नियमीतपणे जमा करीत आहे. यात भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, गुंतवणूक दारांचे शिक्षण व रक्षण निधी, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, उपकर आणि अन्य कोणतेही सांविधिक देणी यांचा भरणा योग्य प्राधिकाऱ्यांकडे केला जातो.<br><br>
आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ताळेबंदाच्या तारखेला आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, उपकर यांच्या निर्विवाद रक्कम त्या देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ प्रलंबित नव्हत्या.<br><br>
(ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार खालील अपवाद वगळता अन्य कोणत्याही करांची – म्हणजे आयकर, संपत्ती कर, विक्री कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क आणि उपकरांचा भरणा करण्याचे राहिलेले नव्हते.
<table>
<tr><th>सांविधकाचे नांव</th><th>थकबाकीचे स्वरुप</th><th>रक्कम (₹)</th><th>रक्कम संबंधीचा कालावधी</th><th>ज्या मंत्राकडे प्रलंबित आहे</th></tr>
<tr><td>केंद्रीय उत्पादन शूल्क</td><td>जोडणी केलेल्या मालावरील शूल्क</td><td>२,६७०,३७५</td><td>२००५-०६ (कंपनीचा प्रारंभ झाल्यापासून)</td><td>केंद्रीय उत्पादन शूल्क-आयुक्त</td></tr>
<tr><td>आयकर अधिनियम</td><td>सेवा कराची स्त्रोंतापाशी कपात करणे</td><td>८९५,०००</td><td>२००९-१०</td><td>आय टी ए टी पुणे (खंडपीठ)</td></tr>
</table>
</td><td>कंपनी योग्य सांविधिक देणी व कर भरणे याबाबत तत्पर आहे. फक्त वादग्रस्त देण्यांचा अपवाद केला जातो.</td></tr>
<tr><td>१०. वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीच्या कोणताही संचित तोटा नाही. कंपनीच्या लेखा-पुस्तकांनुसार कंपनी सदर वित्तीय वर्षात किंवा त्या पूर्वीच्या वर्षात कोणताही रोख तोटा झालेला नाही.</td><td>चालू वर्षी व मागील वर्षात कंपनीला कोणताही रोख स्वरुपात तोटा झालेला नाही. तसेच कोणतेही संचित तोटे सुद्धा नाहीत.</td></tr>
<tr><td>११. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने सर्वसाधारणपणे, पुढील तीन अपवाद वगळता, कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था यांच्या देण्याची परतफेड करण्यात कुचराई केलेली नाही. के.एफ.डब्ल्यू. – ₹ ९९.०१ कोटी दि. ३०.१२.२०१४ रोजी मुद्दलाचे आणि ₹ १५.३३ कोटी व्याजाचे, वीज वित्तीय महामंडळाचे दि. १५.०१.२०१४ रोजी मुद्दलाचे ₹ १४८.७४ कोटी आणि व्याजाचे ₹ ३३.८४ कोटी ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाचे व्याजाचे ₹ ०.८६ कोटी कंपनीने ऋणपत्राद्वारे कोणत्याही रकमेची उसनवारी केली नाही.</td><td>सी ए आर ओ अहवालाच्या भागानुसार, कंपनीकडून कर्जाच्या सेवेबाबत काही कसूर झाली तर त्यांच्या अहवाल लेखापरिक्षकांना द्यावा लागतो. के एफ डब्ल्यू, पी एफ सी आणि आर इ सी यांच्या प्रकरणात वेळेवर कर्जाची वेळेवर परतफेड करण्यात कसूर होण्याचे प्रकार काहीवेळा होतात. असे घडणे हे कंपनीच्या व्यापारी धनकोना पैसे देण्यात विलंब होण्याच्या प्रकारा सारखेच आहे. महावितरण कंपनीकडून मोठया प्रमाणातील येणे प्राप्त होण्यात वेळ लागल्यामुळे रोकडतेच्या समस्या उद्भवतात व त्यामुळे कर्ज परतफेडीस विलंब होऊ शकतो.</td></tr>
</table>

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| १२. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने शेअर्स डिबेंचर्स किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून कोणतीही कर्जे मंजूर केलेली नाहीत. | कंपनीने कुणाच्याही प्रतिभूती गहाण ठेवून त्यांवर अग्रीम मंजूर केलेला नाही. |
| १३. ही कंपनी चिटफंड कंपनी नाही किंवा निधी / म्युचूअल फंड बेनिफिट फंड / सोसायटी नाही, त्यामुळे संबंधित आदेशाचे कलम (१३) कंपनीला लागू होत नाही. | कंपनी वीज निर्मितीच्या उद्योगात कार्यरत आहे. त्याशिवाय अन्य कोणतेही अन्य उद्योग-व्यवसाय ही कंपनी करीत नाही. |
| १४. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार कंपनी शेअर्स, सिक्यूरिटीज, डिबेंचर्स किंवा अन्य गुंतवणूकी यात देणीघेणीचे व्यवहार करीत नाही. | |
| १५. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार इतरांनी, बँका किंवा वित्तीय संस्था यांच्याकडून घेतलेल्या कर्जास कंपनीने कोणताही जामीन दिलेली नाही. | संबंधित व्यक्ती शिवाय अस्तित्वात असलेल्या अन्य कोणत्याही संस्थांच्या कुठल्याही कर्जासाठी या कंपनीने हमी दिलेली नाही. |
| १६. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, तसेच कंपनीच्या ताळेबंदाचे सर्वांगीण परिक्षण केल्यानंतर या काळात उभारलेली मुदतीची कर्जे ती ज्या कारणास्तव घेतली त्याचसाठी वापरल्याचे प्रथम दर्शनी दिसते, किंवा प्रत्यक्ष वापरण्याचे प्रलंबित असल्यास, त्याचा वापर खेळता भांडवलीच्या हेतूसाठी करण्यात आला आहे. | कंपनीने मुख्यते आपली क्षमता वाढविण्याच्यासाठी पैसा उभा करावा या हेतूने दीर्घ मुदतीची कर्जे वापरली आहेत. |
| १७. आम्हास, दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तसेच कंपनीच्या ताळेबंदांचे सर्वांगिण परिक्षण केल्यानंतर, आमच्या मते, वर्षाच्या अखेरीस अल्प मुदतीची एकूण ₹ ४१५.०६ कोटी एवढा दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी वापरल्याचे दिसते. | कंपनी सर्वसामान्यत: ज्या हेतूसाठी गरज असते त्यासाठीच निधी वापरते. मात्र काही वेळा महाराष्ट्र शासनाकडून समभागाची रक्कम वेळेवर मिळण्यास काही कारणामुळे विलंब झाला. त्यामुळे दीर्घ मुदतीच्या कर्जाची रक्कम वेळेवर मिळाली नाहीत, अशावेळी अल्प मुदतीच्या निधीचा वापर करणे भाग पडते. |
| १८. कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत करण्यात आलेल्या नोंदवहीत ज्यांचा समावेश होतो अशा व्यक्ती, संस्था किंवा कंपन्यांना या वर्षात कंपनीने शेअर्सचे वाटप केलेले नाही. | कंपनीचे फक्त एकमेव श्रेणीचे समभाग आहेत. आणि अशा समभागाची कोणतीही पसंतीनुसार वाटणी कंपनीने केलेली नाही. |
| १९. कंपनीने या वर्षी कोणतीही ऋण विमोचन पत्र (डिबेंचर्स) दिलेली नाहीत; त्यामुळे ऋण विमोचन पत्रांसाठी प्रतिभूतींची निर्मिती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. | कंपनीने ऋणपत्रांचे वितरण केलेले नाही. म्हणून त्यांच्या संबंधी प्रतिभूती निर्माण करण्याची कोणतीही आवश्यकता भासली नाही. |
| २०. कंपनीने आमच्या अहवालाच्या कालावधीत जनतेकडून कोणत्याही सार्वजनिक निधीद्वारे पैसा उभारलेला नाही. | कंपनीला समभाग संपूर्णपणे महाराष्ट्र शासनाकडून मिळतात. म्हणून कंपनीने कोणतेही सार्वजनिकरित्या समभागाचे वितरण केलेले नाही. |
| २१. आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार यावर्षात कंपनीकडून कोणतीही लबाडी झाली नाही किंवा कंपनीची फसवणूक / लबाडी केल्याचे आढळले नाही. | कंपनीची दक्षता व सुरक्षेची स्वतंत्र शाखा आहे. आणि कोणत्याही लबाडीचे प्रकरण कंपनीच्या निदर्शनास आलेले नाही. |

# भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापाल यांचा अभिप्राय

## भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ६१९(४) नुसार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या लेख्यांवर दिलेले अभिप्राय :

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि, मुंबई** या कंपनीचे दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाची विवरण पत्रे, कंपनी अधिनियम १९५६ यात दिलेल्या विहित आकृती बंधाप्रमाणे तयार करणे; ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ६१९ (२) नुसार सांविधिक लेखा परिक्षकांची नियुक्ती केली आहे. कंपनी अधिनियम १९५६च्या कलम २२७ नुसार, सदर लेखापरिक्षकांनी या वित्तीय विवरण पत्रांवर, त्यांची व्यवसायिक संस्था दि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्स ऑफ इंडिया यांनी विहित केलेल्या लेखा परिक्षणाच्या आणि विश्वास देणाऱ्या मानकांच्या आधारे स्वतंत्र लेखा परिक्षण करुन त्यावर अभिप्राय देणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्याचे त्यांनी पालन केल्याचे त्यांच्या दि. **२७ ऑगस्ट २०१४** रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे वतीने, **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मुंबई** या कंपनीच्या, दि. **३१ मार्च २०१४** रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(३) (बी) नुसार पूरक लेखा परिक्षण पूर्ण केले. हे पूरक लेखा परिक्षण स्वतंत्रपणे व सांविधिक लेखापाल यांचेकडील कामाची कागदपत्रे न मिळविता केले आहे. मुख्यत्त्वे सांविधिक लेखा परिक्षक यांचेकडे आणि कंपनीचे कर्मचारीवृंद यांचेकडे विचारणा करणे आणि काही निवडक लेखा विषयक कागदपत्रांची तपासणी करणे या मर्यादेत करण्यात आले आहे. या माझ्या लेखापरिक्षणाच्या आधारे, कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ६१९(४) अंतर्गत काही महत्वपूर्ण बाबी माझ्या लक्षात आल्या आहेत व माझ्या मते वित्तीय विवरणपत्रे व संबंधित लेखा परिक्षणांचे अहवाल अधिक चांगल्याप्रकारे समजण्यासाठी त्याची मदत होईल. या बाबी खालीलप्रमाणे आहेत:-

१. **ताळेबंदावर अभिप्राय**

**ताळेबंद - समभाग व दायित्वे**

**चालू मत्ता - वस्तूसूची (टिपा क्र.११) ₹ १,७४०.११ कोटी**

या मधे वर्ष २०१४-१५ मधे आयात करुन मिळविलेल्या कोळश्याचे मूल्य ₹ २.१७ कोटी समाविष्ट आहे. यामुळे वस्तूमाल व इतर चालू दायित्वे यांचे ₹ २.१७ कोटीने ज्यादा विवरण झालेले आहे.

२. **नफ्याबाबत अभिप्राय**

**नफा व तोटा पत्रक**

**इतर उत्पन्न (टिपा क्र. १६) - ₹ ८३.७४ कोटी**

खापरखेडा औ.वि. केंद्राने लिलावातून मिळालेले भंगार विक्रीच्या उत्पन्नाचा लेखा इतर उत्पन्नात ₹ ३.७० कोटी ऐवजी ₹ ३.३५ कोटी असा नोंदवून टिपा क्र. (एच) यामध्ये प्रकट केलेले कंपनीचे लेखाविषयक धोरण "भंगार जेव्हा व जसा लिलावात विकला जाईल त्याप्रमाणे त्या उत्पनाची नोंद इतर उत्पन्न यात केली जाईल" याचे उल्लंघन केले आहे. यामुळे किरकोळ ऋणको व नफा यांचे ₹ ०.३५ कोटीने कमी विवरण झाले आहे.

३. यामधे फेब्रुवारी व मार्च २०१४ यामधे फ्लायअॅशच्या विक्रीचे ₹ २०.१३ लाखाचा समावेश नाही. यामुळे किरकोळ ऋणको आणि नफा यांचे ₹ २०.१३ लाखाने कमी विवरण झाले आहे.

४. इतर खर्च (टिपा क्र. २०)
पाणी आकार ₹ ५०.४४ कोटी

चंद्रपुर महा.औ.वि.केंद्राने वर्ष २०११-१२ ते २०१३-१४ या कालवधीतील स्वामित्व धना पोटी हंगामातील सवलत ₹ ९०.२० लाख पाटबंधारे विभागाकडून एप्रिल २०१४ मधे वसूल केली. अशा प्रकारे जादा पाणी आकार नंतर वसूल केल्याने, तो चालू दायित्वांमधे सातत्याने दर्शविणे योग्य नाही. यामुळे चालू दायित्वाचे ₹ ९०.२० लाखाने जादा विवरण झाले आहे व पूर्व काळातील खर्चाचे ₹ ६५.३७ लाखाने कमी विवरण तसेच नफ्याचे ₹ २४.८३ लाखाने कमी विवरण झाले आहे.

**प्रकटनासंबंधी अभिप्राय वित्तीय विवरणा सोबतच्या टिपा.**

५. कंपनीने कर्मचाऱ्यांना द्यावयाचे बोनस / सानुग्रह अनुदान यांचे खर्च रोकड तत्वावर नोंदले आहेत. मात्र त्यांचे पूरेसे प्रकटन नाही.

६. आयकर विभागाने (मार्च २०१३ मधे) ₹ ९.७२ कोटी ची मागणी केली होती (कर ₹ ७.१५ कोटी अधिक कलम २०१(आय ए) अंतर्गत व्याज ₹ २.५७ कोटी) कंपनीने स्त्रोतापाशी कपात (टीडीएस) न केल्यामुळे ही मागणी झाली होती त्यावर कंपनीने जॉईंट कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स (टीडीएस) यांचेकडे अपिल दाखल केले (ऑगस्ट २०१३) याबाबतचा निर्णय अजून प्रलंबित असल्याचे प्रत्यक्ष वस्तूस्थिती आकस्मिक दायित्वे या लेखाशीर्षाखाली योग्य प्रकारे प्रकट करावयास हवे होते.

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक**
**यांचेकरिता व त्यांच्यावतीने,**
**सही/ -**
**प्रधान महालेखापाल**
**(लेखा परिक्षण - ३)**

स्थळ : मुंबई
दिनांक : ०९ जानेवारी २०१५

## भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या महानिर्मिती कंपनीच्या वर्ष २०१३-१४ च्या अहवालावरील अभिप्रायास महानिर्मिती कंपनीचे व्यवस्थापन व सांविधिक लेखा परिक्षक यांची दिलेली उत्तरे खालील प्रमाणे आहेत :-

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| १. | **ताळेबंदावर अभिप्राय**<br>**ताळेबंद - समभाग व दायित्वे**<br>**चालू मत्ता - वस्तूसूची (टिपा क्र. ११)**<br>**₹ १,७४०.११ कोटी**<br>या मधे वर्ष २०१४-१५ मधे आयात करुन मिळविलेल्या कोळश्याचे मूल्य ₹ २.१७ कोटी समाविष्ट आहे. यामुळे वस्तूमाल व इतर चालू दायित्वे यांचे ₹ २.१७ कोटीने जादा विवरण झालेले आहे. (औ.वि.केंद्र भुसावळ) | १. सामान्यत: कंपनी आयात केलेल्या कोळशाच्या खरेदीचा लेखा प्राप्तीच्या आधारे करते मात्र वर्षाच्या अखेरीस आयात केलेल्या कोळशाची लेखानोंद नजरचुकीने प्रवासातील माल या प्रकारे अंतर्देशी कोळश्याप्रमाणे करण्यात आली. मात्र कंपनीत इंधनाच्या खरेदीवर केलेला एकूण खर्च ₹ १०,८१०.८३ कोटी एवढा आहे. तुलनेने आयात कोळश्याची लेखानोंद ₹ २.१६ कोटी (०.०२ टक्के) ही खूप मोठी नाही. | आम्ही कंपनीच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| २. | **नफ्याबाबत अभिप्राय**<br>**नफा व तोटा पत्रक**<br>**इतर उत्पन्न (टिपा क्र. १६) - ₹ ८३.७४ कोटी**<br>खापरखेडा औ.वि. केंद्राने लिलावातून मिळालेले भंगार विक्रीच्या उत्पन्नाचा लेखा इतर उत्पन्नात ₹ ३.७० कोटी ऐवजी ₹ ३.३५ कोटी असा नोंदवून टिपा क्र. (एच) यामध्ये प्रकट केलेले कंपनीचे लेखाविषयक धोरण "भंगार जेव्हा व जसा लिलावात विकला जाईल त्याप्रमाणे त्या उत्पनाची नोंद इतर उत्पन्न यात केली जाईल", याचे उल्लंघन केले आहे. यामुळे किरकोळ ऋणको व नफा यांचे ₹ ०.३५ कोटीने कमी विवरण झाले आहे. | कंपनीने खापरखेडा औ.वि.केंद्रात यावर्षी लिलाव आयोजिला होता. कंपनीने जुलै, आक्टोबर व डिसेंबर २०१३ या महिन्यात विक्रीच्या व्यवहाराचा लेखा केला होता. चौथा लिलाव मार्च २०१४ मधे झाला व त्याच्या विक्रीचा आदेश वर्ष २०१४-१५ मधे देण्यात आला. खापरखेडा केंद्राने या लिलावातील विक्रीला आ.वर्ष २०१४-१५ लेखा नोंदवहीत मान्यता दिली. | आम्ही कंपनीच्या उत्तराशी सहमत आहोत. |

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| | | कंपनीचे एकूण विक्री व्यवहार ₹ १६,६२१.९५ कोटीचे आहेत. त्या तुलनेत सदर विक्रीची रक्कम ₹ ०.३५ कोटी फार मोठी नाही. | |
| ३. | यामधे फेब्रुवारी व मार्च २०१४ यामधे फ्लायॲशच्या विक्रीचे ₹ २०.१३ लाखाचा समावेश नाही. यामुळे किरकोळ ऋणको आणि नफा यांचे ₹ २०.१३ लाखाने कमी विवरण झाले आहे. (चंद्रपुर औ.वि.केंद्र) | ३. कंपनी, सामान्यत: फ्लाय ॲशची विक्री सिमेंट कंपन्याना ज्यावेळी करते तेव्हा लेखा नोंदवते. मात्र, नजरचुकीने आ.वर्ष २०१३-१४ मधे विक्रीची ₹ २,०१२,६०६ याचा लेखा करणे शिल्लक राहिले. ही रक्कम अल्प आहे (०.७९%) वर्षाचे विक्रीचा एकूण उत्पन्न ₹ २५.७३ कोटीचे असून तुलनेने ही रक्कम अल्प (०.७९ टक्के) आहे. | आम्ही कंपनीच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| ४. | इतर खर्च (टिपा क्र. २०)<br>पाणी आकार ₹ ५०.४४ कोटी<br>चंद्रपुर महा.औ.वि.केंद्राने वर्ष २०११-१२ ते २०१३-१४ या कालवधीतील स्वामित्व धना पोटी हंगामातील सवलत ₹ ९०.२० लाख पाटबंधार विभागाकडून एप्रिल २०१४ मधे वसूल केली. अशा प्रकारे जादा पाणी आकार नंतर वसूल केल्याने, तो चालू दायित्वांमधे सातत्याने दर्शविणे योग्य नाही. यामुळे चालू दायित्वाचे ₹ ९०.२० लाखाने जादा विवरण झाले आहे व पूर्व काळातील खर्चाचे ₹ ६५.३७ लाखाने कमी विवरण तसेच नफ्याचे ₹ २४.८३ लाखाने कमी विवरण झाले आहे. | या संदर्भात हंगामी सवलत व सवलतीची रक्कम लागू करण्याच्या पद्धतीबाबत पाटबंधारे प्राधिकारी यांचेकडे प्रकरण नेले आहे. पाटबंधारे प्राधिकारी यांचेकडून स्पष्टीकरण मिळाल्यानंतर, आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे लेखा प्रक्रीया पुढील आर्थिक वर्षात केली जाईल. मात्र पाटबंधारे विभागस जादा रक्कम भरणा होऊ नये यासाठी कंपनीने ₹ ९,०१९,८५५/- एवढी रक्कम जानेवारी व फेब्रुवारी २०१४ च्या विक्रीतून काढून घेतली आहे. | आम्ही कंपनीच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| ५. | प्रकटनासंबधी अभिप्राय वित्तीय विवरणासोबतच्या टिपा. कंपनीने कर्मचाऱ्यांना द्यावयाचे बोनस / सानुग्रह अनुदान यांचे खर्च रोकड तत्वावर नोंदले आहेत. मात्र त्यांचे पूरेसे प्रकटन नाही. | सानुग्रह अनुदान देणे हा व्यवस्थापनाचा स्वेच्छाधिकार आहे. कोणतेही सांविधिक बंधन नसताना कर्मचाऱ्यांना ते निशूल्क दिले जाते. त्यामुळे पुढील वर्षी व्यवस्थापन सानुग्रह | आम्ही कंपनीच्या उत्तराशी सहमत आहोत. |

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| | | अनुदान देण्याचा निर्णय होईल किंवा नाही. आणि देण्याचा निर्णय झाल्यास त्यासाठी किती रक्कम लागेल हे अज्ञात असते. याशिवाय जर एखादे बंधन असेल तर ते पाळण्याचे कर्तव्य किंवा जबाबदारी असते कारण तो एक कायदेशीर बंधनकारक करार असतो. परंतु सानुग्रह अनुदान देणे स्वेच्छा निर्णयावर अवलंबून असते त्यामुळे त्यासाठी कंपनीने कोणतेही प्रकटन केले नाही. सानुग्रह अनुदान जाहीर झाल्यास प्रत्यक्ष देणे केले नाही तरी, त्याचा लेखा उपार्जन तात्वावर केला जातो. | |
| ६. | आयकर विभागाने (मार्च २०१३ मधे) ₹ ९.७२ कोटी ची मागणी केली होती (कर ₹ ७.१५ कोटी अधिक कलम २०१(आय ए) अंतर्गत व्याज ₹ २.५७ कोटी) कंपनीने स्त्रोतापाशी कपात (टीडीएस) न केल्यामुळे ही मागणी झाली होती त्यावर कंपनीने जॉईंट कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स (टीडीएस) यांचेकडे अपिल दाखल केले (ऑगस्ट २०१३) याबाबतचा निर्णय अजून प्रलंबित असल्याचे प्रत्यक्ष वस्तूस्थिती आकस्मिक दायित्वे या लेखाशीर्षाखाली योग्य प्रकारे प्रकट करावयास हवे होती. | लेखापरिक्षकाच्या अहवालतील परिच्छेद ९(ब) नुसार वादग्रस्त असल्यामुळे ज्या करांचा भरणा शासनाकडे केलेली नाही त्या करांच्या देण्याचे प्रकटन करणे आवश्यक असते. सध्याच्या प्रकरणी आयकर विभागाने ₹ ९.७२ कोटीची मागणी केली आहे. त्यात स्त्रोतापाशी न कापलेली कराची रक्कम ₹ ७.१५ कोटी आणि कलम २०१(१ए) नुसार व्याज ₹ २.५७ कोटी समाविष्ट आहेत. जरी टीडीएस कापली नसली तरी संबंधित करदात्यांनी सदर कर त्यांच्या कर दायित्वापोटी भरली आहे. म्हणजेच दुसऱ्या शब्दात करापोटीचा महसूल सरकारकडे टीडीएस म्हणून नाही तर नियमीत कर रुपाने जमा झाली आहे. त्यामुळे महानिर्मितीचे मत असे आहे की कंपनीने सदर कराची रक्कम जमा करण्याची आवश्यकता नव्हती. कराच्या रकमेवरील व्याजाच्या बाबतीत प्रकटन लेखापरिक्षकाच्या येत्या वर्षाच्या अहवालाच्या परिच्छेद क्र. ९(बी) मधे केले जाईल. | आम्ही कंपनीच्या उत्तराशी सहमत आहोत. |

# स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवाल

**प्रति,**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, मर्यादित यांचे सर्व सदस्य,**
**मुंबई**

**कंपनीच्या आर्थिक/वित्तीय विवरण पत्रावर अहवाल**

१. आम्ही, **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, मर्यादित (महानिर्मिती/कंपनी)ची** सोबत जोडलेल्या वित्तीय विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केले. या विवरणपत्रात दि. ३१ मार्च २०१४ रोजीचा ताळेबंद आणि त्या दिवशी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक, रोकडता प्रवाह विवरणपत्रक आणि महत्वाची लेखाधोरणांचा सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे.

**वित्तीय विवरणपत्रांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी**

२. कंपनी अधिनियम १९५६ (सदर कायदा) यातील, कलम २११ याचे उपकलम (३सी), ज्याचे सहवाचन कंपनी व्यवहार मंत्रालयाने कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १३३ यासंबंधी काढलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. १५/२०१३ दि. १३ सप्टेंबर २०१३ या सोबत होते. यात ज्यांचा संदर्भ दिला आहे. ती लेखांची मानके यानुसार कंपनीची आर्थिक स्थिती, वित्तीय कामगिरी आणि रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य दर्शन घडविणारी आणि भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखांच्या तत्वांशी अनुदाय अशी विवरणपत्र तयार करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

३. या वित्तीय विवरण पत्रावर आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारेले मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षणाचे काम इन्स्टियूट ऑफ चार्टर्ड अकौटंट्स ऑफ इंडिया या संस्थेने जारी केलेल्या लेखापरिक्षणांच्या मानकानुसार पार पाडले. वित्तीय लेखा विवरणपत्रे प्रत्यक्षात चुकीची माहिती देत नाहीत याबद्दल प्रमाणशीर हमी मिळविणे या हेतूसाठी नैतिक आवश्यकतांची आम्ही पूर्ती करणे व त्यादृष्टीने लेखापरिक्षणाचे नियोजन करुन ते पूर्ण करणे असा या लेखामानकांचा कटाक्ष असतो.

४. वित्तीय विवरण पत्रांमधील रकमा आणि प्रकटने याविषयी लेखापरिक्षणातून पुरावे मिळविण्यासाठीच्या कार्यपद्धतीचा समावेश लेखा परिक्षणाच्या कार्यात केला जातो. या कार्यपद्धतीची निवड लेखापरिक्षकांची न्यायबुद्विवर अवलंबून असते त्यात वित्तीय विवरणपत्रात लबाडीने किंवा नजरचूकीने प्रत्यक्ष गैर माहिती नोंदलेली गेली नाही किंवा आहे या धोक्यांचा मूल्यमापनाचा अंतर्भाव असतो.

अशा धोक्यांचे मूल्यमापन करण्यासाठी, विवरण पत्रे तयार करणे आणि ती सादर करणे यासाठी त्यासंबंधी कंपनीच्या अंतर्गत नियंत्रणांचा विचार लेखा परिक्षक करतात. मात्र कंपनीची अंतर्गत लेखा नियंत्रणाच्या परिणामकारकतेवर आमचे मत व्यक्त करण्याच्या हेतूसाठी त्याचा विचार करीत नाही. तसेच कंपनीने वापरलेली लेखा विषयक धोरणांच्या योग्यते विषयी मूल्यमापन करणे आणि व्यवस्थापनाने केलेल्या लेखाविषयक अंदाजाची व्यवहार्यता यांचाही समावेश लेखापरिक्षणात केला जातो. तसेच वित्तीय विवरणपत्रांचे सर्वांगिण मूल्यांकन केले जाते.

५. आमची पात्र असलेली लेखा परिक्षण विषयक मताकंरिता आम्ही पुरेसे व योग्य असे लेखा परिक्षण विषयक पुरावे मिळविले आहेत असा आमचा विश्वास आहे.

**पात्र अभिप्रायांचा आधार :**

६. आम्ही खालील मुद्यांकडे लक्ष वेधतो.

*१. महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५, अनुसार दि. ६ जून २००५ रोजी हस्तांतरीत झालेल्या कंपनीच्या मत्ता व दायित्वे यात काही शिल्लक बाबी समाविष्ट आहेत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार या शिलकी बाबी, स्थिर मत्ता, चालू नसणाऱ्या मत्ता, चालू मत्ता, चालू नसलेली दायित्वे आणि चालू दायित्वे यांच्या आहेत आणि त्या म.रा.वि.मं. सूत्रधार कंपनी*

*लि. ने मान्य केल्या असून त्या महानिर्मिती कंपनीच्या लेखा पुस्तकात गठीत केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाकडून अंतीम हस्तांतरण योजना अद्याप अधिसूचित व्हायची आहे. जर या आकडेवारीत अंतिम अधिसूचनेच्या वेळी काही बदल झाला तर ताळेबंद तसेच नफा व तोटा पत्रकावर त्याच्या प्रभाव पडू शकेल. तसेच आम्ही टिपा क्र. २ याचा संदर्भ देतो, यात सदर योजनेत अंशत: सुधारणा करुन महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनीकडून यापूर्वी घेतलेल्या कर्जाचे दायित्व त्यावरील व्याजासह, हस्तांतरण कंपनीकडे झाले आहे. व त्याला मराविमं. सूत्रधारी कंपनी लि. यांनी मंजूरी दिली आहे.*

२. *टिपा क्र. ३१ यात नमूद केल्याप्रमाणे, किरकोळ, ऋणको, कर्जे व अग्रीमे, अनामती, पुरवठयाच्या साहित्याचे दायित्व, कोळसा कंपन्याच्या शिलकी या संबंधितांकडून निश्चित होण्याच्या आणि/किंवा उपकंपन्याचे अहवाल यांच्याशी मेळ करणे, याच्या प्रकरणाशी अधीन आहेत. अशी निश्चिती प्रलंबित असल्यामुळे तसेच मेळ पूर्ण करणे प्रलंबित असल्यामुळे, त्यांचे संबंधिताशी समायोजन करणे शक्य झाले नाही. या शिलकीच्या स्थितीवर आणि कंपनीच्या नफ्यावर काय परिणाम होऊ शकतो यावर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

३. *टिपा क्र. ३२ यात नमूद केल्याप्रमाणे, कोळसा पुरवठा करणाऱ्यांना दिलेली अग्रीम रक्कम ₹ १,१०७.७७ कोटी, ही कर्जे व अग्रीमे यात समाविष्ट आहे. या अग्रीमाच्या आधारे कंपनीने कोळसाचा पुरवठा यात ₹ १,०३३.८६ कोटीचे दायित्वाची तरतूद केली आहे. अंतीम देयक मंजूर होणे प्रलंबित असल्याने कंपनीने सदर दायित्वाचे दिलेल्या अग्रीमासोबत निर्लेखन केलेले नाही. यामुळे संबंधित मत्ता व दायित्वे यात जादा विवरण झाले आहे. त्याचा कंपनीच्या नफ्यावर होऊ शकणाऱ्या प्रभावाचे मूल्यामापन केलेले नाही.*

४. *कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) सोबत केलेल्या वीज खरेदी कराराच्या अटीनुसार (महानिर्मिती) कंपनीने वर्षभरात विलंबाने भरणा केल्याबद्दल त्याचा अधिभाराचा रक्कम ₹ ७८७.३५ कोटी एवढे उत्पन्न ग्राहकाकडील अधिभाराचे उत्पन्न या लेखाशीर्षा अंतर्गत मान्य केले आहे. महावितरणने ३१ मार्च २०१४ रोजी असलेली या अधिभाराची रक्कम ₹ १,६५०.३५ कोटी भरली नाही. एकूण ₹ १९६.२४ कोटी एवढया निव्वळ फरकाचा मेळ घालण्याच्या प्रकीयेत आहे. महावितरण कडून देयके स्वीकारली न जाणे व लेखांचा मेळ न लागणे, या बाबीचा विचार केल्यानंतर, आम्ही अशा उत्पन्नांची विश्वसनीयता आणि त्याचा (अ) या वर्षाच्या कंपनीचा नफा, (ब) व्यापारातून प्राप्त होऊ शकणारे मूल्य आणि (क) विनादेयकाचा महसूल आणि (ड) राखीव व अधिक्य या बाबींवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास असमर्थ आहोत.*

**पात्र असणारा अभिप्राय :-**

७. *आमचे मत तसेच आमची सर्वोतपरी माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे, यानुसार सदर वित्तीय विवरणपत्रके कायद्यानुसार आवश्यक असणारी माहिती त्यात आवश्यक असलेल्या पद्धतीनुसार देतात आणि वरील परिच्छेद (६) यातील मुद्दे क्र. (१) ते (४) यात दिलेली आमची निरिक्षणे ज्यांचा दि. ३१ मार्च २०१४ रोजीच्या निव्वळ मत्ता व कंपनीचा वर्षाचा नफा, यावर होऊ शकणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन करता येत नाही. यांच्या अधीन राहून भारतात सर्वसाधारणपणे स्विकारल्या जाणाऱ्या लेखा तत्वांशी सुसंगत राखून, ही कागदपत्रे सत्य व योग्य दर्शन घडवितात.*

*(अ) ताळेबंदासंबंधी : कंपनीच्या व्यवहाराची स्थिती दि.३१ मार्च २०१४ रोजी असलेल्या स्थितीनुसार आहेत.*

*(ब) नफा व तोटा पत्रकासंबंधी : वरील तारखेला संपलेल्या वर्षाच्या नफ्यानुसार आहेत, आणि*

*(क) रोकडता प्रकट विवरणपत्राबाबत : या तारखेला संपलेल्या वर्षी रोकडता प्रवाह नुसार आहे.*

**लक्षवेधी प्रकरणे :**

८. आमच्या अहवालाच्या पात्रतेला बाधा न पोहचविता, आम्ही खालील मुद्यांकडे लक्ष वेधतो :

(अ) टिपा क्र ३७ (डी) : लेखा मानक १९ अंतर्गत आवश्यक असणारे माहितीचे प्रकटन न केल्या संबंधी आहे. कंपनी नियमावली (लेखामानक), २००६ यातील भाडेपट्टी या अंतर्गत विविध जलविद्युत प्रकल्पातील वीज निर्मितीच्या सुविधा यासाठी महाराष्ट्र शासनासोबत करावयाच्या भाडेपट्टयाच्या करारांची कार्यवाही प्रलंबित असणे.

(ब) टिपा क्र. ३७ (ए)(दोन) : सी पी एफ ची हंगामी स्वरुपाच्या लेखामुळे व्याजास होणाऱ्या तुटी संबंधी आवश्यक तपशील व माहिती उपलब्ध नाही.

(क) टिपा क्र. ३७(एच) : कर्जाच्या दायित्वाच्या मान्यते संबंधी आहे. १५० मे.वॅ. क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पासंबंधी भारत सरकार मार्फत महाराष्ट्र शासनाला क्रेडीटास्टाष्ट फ्यूर वायडरयूफ यांनी वितरीत केलेले कर्ज प्रत्यक्ष मिळणे प्रलंबित आहे. या ₹ ९.५१ कोटीचे कर्ज व त्यावरील व्याज ₹ ०.१७ कोटी यांच्या दायित्वास मान्यता मिळणे.

**इतर कायदेविषयक व नियमनाविषयीच्या आवश्यकते संबंधी अहवाल**

९. भारत सरकारने कंपनी अधिनियम १९५६चे कलम २२७ यातील उपकलम (४ए) यातील तरतूदीनुसार काढलेला कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) आदेश २००३ आणि त्यामधे दुरुस्ती करणारा कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) (दुरुस्ती) आदेश २००४ यातील आवश्यकता नुसार तसेच आमच्या मत्ते योग्य असणाऱ्या तपासण्या यांच्या आधारे व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आम्ही एका जोडपत्रात सदर आदेशातील परिच्छेद ४ व ५ हे ज्या मर्यादित कंपनीला लागू होतात; त्याबाबत एक निवेदन जोडले आहे.

१०. कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ (३) यातील आवश्यकते नुसार आम्ही अहवाल देतो की,

अ) आम्ही आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणाकरिता आवश्यक असणारी सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळविली आहेत.

ब) आमच्या मत्ते, कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असणारी लेखांची नोंदपुस्तके योग्य प्रकारे केली आहेत; असे आम्ही या लेखा नोंद पुस्तकांचे परिक्षण केल्यानंतर दिसून आले आहे.

क) या अहवालाशी संबंधीत ताळेबंद, नफा व तोटा यांचे पत्रक व रोकडता प्रवाह विवरणपत्र ही लेखा नोंद पुस्तकाशी सुसंगत आहेत.

ड) आमच्या मते सदर ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह ही विवरणपत्रे, ज्या लेखा मानकांचा उल्लेख कंपनी अधिनियम १९५६ याचे कलम २११, उपकलम ३(सी) यात केला आहे, आणि ज्याचे सहवाचन कंपनी व्यवहार मंत्रालयाने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३३ च्या संदर्भात काढलेले सर्वसाधारण परिपत्रक १५/२०१३ दि. १३ सप्टेंबर २०१३ या सोबत केले जाते. त्याची पूर्तता करतात.

इ) ही एक सरकारी कंपनी असल्यामुळे, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्रमांक जी एस आर ८२९(इ) दि. २१ ऑक्टोबर २००३, यानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २७४ याचे उपकलम १ अंतर्गत खंड (जी) यातील तरतूदी या कंपनीला लागू होत नाहीत.

**बोरकर अँड मुझूमदार**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१५६९ डब्ल्यू

**देवांग वाघानी**
भागीदार
आय् सी ए आय एम नं. १०९३८६

**उम्मेद जैन अँड कंपनी**
सनदी लेखापाल करिता
एफ आर एन ११९२५० डब्ल्यू

**अखिल जैन**
भागीदार
आय सी ए आय
एम नं. १३७९७०

**एम पी चितळे अँड कंपनी**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१८५१ डब्ल्यू

**आशुतोष पेडणेकर**
भागीदार
आय सी ए आय
नं. ०४१०३७

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ ऑगस्ट २०१४

## जोडपत्र : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित च्या दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आमच्या समान तारखेच्या लेखा परिक्षणाच्या अहवालातील परिच्छेद ९ मधे दिलेले संदर्भ .

१. *अ) या कंपनीने स्थिर मत्तांची संपूर्ण माहिती दर्शविणारे योग्य अभिलेख जतन केले आहेत. त्यात संख्यात्मक तपशील आणि स्थिर मत्तांची जागा यांचा समावेश आहे. ज्या काही जागांवरील थोड्या स्थिर मत्तांची बाब निहाय माहिती व संहिताकरण या स्थिर मत्तांच्या नोंदणी वहीशी अनुरुप करण्याचे काम चालू आहे; त्यांचा अपवाद वगळता अभिलेख योग्य आहेत.*

ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षातून एकदा करावी असे कंपनीचे धोरण आहे. आमच्या मते, कंपनीचे एकूण आकारमान व व्यवसायाचे स्वरुप याच्याशी हे धोरण प्रमाणशीर व सुरुंगत आहे. अशा पडताळणीत आढळून आलेल्या विसंगती फार मोठ्या नाहीत.

क) कंपनीच्या चालू व्यवहारावर ज्यामुळे परिणाम करील अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात स्थिर मत्तांची विल्हेवाट लावण्यात आलेली नाही.

२. अ) व्यवस्थापनाने यावर्षात नेमलेल्या सनदी लेखापालांच्या बाहय संस्थाकडून वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. ***मात्र कोळसा कारखान्यांनी नाकारलेल्या मालाच्या वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आलेली नाही.***

ब) ***कोळसा कारखान्यांनी नाकारलेल्या मालाच्या वस्तूसूचीचा अपवाद वगळता,*** व्यवस्थापनाने अनुसरलेली वस्तूसूचीच्या प्रत्यक्ष पडताळणीची कार्यपद्धती ही कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरुप याच्याशी सुसंगत आहे, असे आमचे मत असून ते आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरण यानुसार आहे.

क) वस्तूसूचीच्या अभिलेखांचे आम्ही परिक्षण केले. त्याच्या आधारे आमचे मत असे आहे की, कंपनीने वस्तूसूचीच्या अभिलेखांचे योग्य प्रकारे जतन केलेले आहे. वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी केल्यानंतर अभिलेखाच्या नोंदीशी तूलना करताना ज्या विसंगती आढळल्या, त्याचे लेखांमधे योग्य ते समायोजन करण्यात आले.

३. आम्हास पुरविलेल्या माहितीनुसार महानिर्मिती कंपनीने कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत ज्याची नोंद झाली आहे अशा कंपन्या, फर्म्स किंवा इतर व्यक्ती/संस्था यांना कोणतीही कर्जे दिली नाहीत / किंवा त्यांचेकडून कर्जे स्वीकारली नाहीत. म्हणून त्यासंबंधीच्या आदेशातील खंड (३)(ए)ते(जी) यानुसार अहवाल देणे, ही बाब महानिर्मिती कंपनीस लागू होत नाही.

४. आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार वस्तूसूचीनुसार मालाची व स्थिर मत्तांची खरेदी करणे व वीज विक्री करणे या करिता व कंपनीचे एकूण आकारमान व व्यवहाराचे स्वरुप याच्याशी सुसंगत अशी अंतर्गत नियंत्रणांची कार्यपद्धती कंपनीमधे पुरेशा प्रमाणात आहे. ***मात्र रद्दी मालाची हाताळणी करणे यासाठीच्या अंतर्गत नियंत्रणात आणखी सुधारणा करण्याची गरज आहे.***

५. आम्ही केलेले लेखांच्या वह्या/पुस्तकांचे परिक्षण आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे, यानुसार ज्याची नोंदणी कंपनी अधिनियम १९५६च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत करण्याची गरज आहे, असा कोणताही व्यवहार केलेली नाही.

६. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कंपनी अधिनियम १९५६ आणि कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियामवली १९७५ यातील कलम ५८ए यातील तरतूदींच्या अभिप्रेत असणाऱ्या अर्थानुसार जनतेकडून ठेवी स्वीकारलेल्या नाहीत.

७. कंपनीने आपले मुख्यालय व अन्य जागी अंतर्गत लेखा परिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांच्या बाहय संस्थांची नियुक्ती केली. ***मात्र काही प्रकरणी त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.*** याच्या अधीन राहून, आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीत सध्या असलेली अंतर्गत लेखा परिक्षणाची प्रणाली ही पूरेशी व कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवहाराचे स्वरुप याच्याशी सुसंगत आहे. ***मात्र त्याची पूर्तता करण्याची यंत्रणा सुधारण्याची गरज आहे.***

८. केंद्र सरकारने विजेच्या वितरणासाठी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९(१)(डी) नुसार खर्च अभिलेख जतन करण्याचे विहित केले आहे. आम्ही, कंपनीच्या संबंधित अभिलेखांचा स्थूलमानाने आढावा घेतला व आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने विहित स्वरुपात अभिलेख तयार करणे व त्यांचे जतन करणे ही कामे केली आहेत; असे प्रथम दर्शनी दिसून येते. मात्र, कंपनी (खर्च लेखा अभिलेख) नियमावली २०११ अंतर्गत खर्च लेखा आवश्यक आहेत, ते अचूक व परिपूर्ण आहेत किंवा कसे हे निश्चित करण्यासाठी सदर खर्च लेखांचे कोणतेही परिक्षण केलेले नाही.

९ (अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तसेच लेखा-पुस्तके व अभिलेख यानुसार, कंपनी सर्वसाधारणपणे सांविधिक देणी नियमीतपणे जमा करीत आहे. यात भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, गुंतवणूक दारांचे शिक्षण व रक्षण निधी, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, उपकर आणि अन्य कोणतेही सांविधिक देणी यांचा भरणा योग्य प्राधिकाऱ्यांकडे केला जातो.

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ताळेबंदाच्या तारखेला आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, उपकर यांच्या निर्विवाद रक्कम त्या देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ प्रलंबित नव्हत्या.

(ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार खालील अपवाद वगळता अन्य कोणत्याही करांची - म्हणजे आयकर, संपत्ती कर, विक्री कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क आणि उपकरांचा भरणा करण्याचे राहिलेले नव्हते.

| सांविधकाचे नाव | थकबाकीचे स्वरुप | रक्कम (₹) | रक्कम संबंधीचा कालावधी | ज्या मंचाकडे प्रलंबित आहे |
|---|---|---|---|---|
| केंद्रीय उत्पादन शूल्क | जोडणी केलेल्या मालावरील शूल्क | २,६७०,३७५ | २००५-०६ (कंपनीचा प्रारंभ झाल्यापासून) | केंद्रीय उत्पादन शूल्क - आयुक्त |
| आयकर अधिनियम | सेवा कराची स्त्रोतापाशी कपात करणे | ८९५,००० | २००९-१० | आय टी ए टी पुणे खंडपीठ |

१०. वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीच्या कोणताही संचित तोटा नाही. कंपनीच्या लेखा-पुस्तकांनुसार कंपनीला सदर वित्तीय वर्षात किंवा त्या पूर्वीच्या वर्षात कोणताही रोख तोटा झालेला नाही.

११. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने सर्वसाधारणपणे, पुढील *तीन अपवाद* वगळता, कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था यांच्या देण्याची परतफेड करण्यात कुचराई केलेली नाही. के.एफ.डब्ल्यू. - *₹ ९९.०१ कोटी दि. ३०.१२.२०१४ रोजी मुद्दलाचे आणि ₹ १५.३३ कोटी व्याजाचे, वीज वित्तीय महामंडळाचे दि. १५.०१.२०१४ रोजी मुद्दलाचे ₹ १४८.७४ कोटी आणि व्याजाचे ₹ ३३.८४ कोटी ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाचे व्याजाचे ₹ ०.८६ कोटी* कंपनीने ऋणपत्राद्वारे कोणत्याही रकमेची उसनवारी केली नाही.

१२. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने शेअर्स, डिबेंचर्स किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून कोणतीही कर्जे मंजूर केलेली नाहीत.

१३. ही कंपनी चिटफंड कंपनी नाही किंवा निधी / म्युचूअल फंड बेनिफिट फंड / सोसायटी नाही, त्यामुळे संबंधित आदेशाचे कलम (१३) कंपनीला लागू होत नाही.

१४. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार कंपनी शेअर्स, सिक्यूरिटीज, डिबेंचर्स किंवा अन्य गुंतवणूकी यात देणीघेणीचे व्यवहार करीत नाही.

१५. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार इतरांनी, बँका किंवा वित्तीय संस्था यांच्याकडून घेतलेल्या कर्जास कंपनीने कोणताही जामीन दिलेला नाही.

१६. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, तसेच कंपनीच्या ताळेबंदाचे सर्वांगीण परिक्षण केल्यानंतर या काळात उभारलेली मुदतीची कर्जे ती ज्या कारणास्तव घेतली त्याचसाठी वापरल्याचे प्रथम दर्शनी दिसते किंवा प्रत्यक्ष वापरण्याचे प्रलंबित असल्यास, त्याचा वापर खेळता भांडवलीच्या हेतूसाठी करण्यात आला आहे.

१७. आम्हास, दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तसेच कंपनीच्या ताळेबंदांचे सर्वांगिण परिक्षण केल्यानंतर, आमच्या मते, वर्षाच्या अखेरीस अल्प मुदतीच्या निधीतील एकूण ₹ ४१५.०६ कोटी एवढी रक्कम दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी वापरल्याचे दिसते.

१८. कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत करण्यात आलेल्या नोंदवहीत ज्यांचा समावेश होतो अशा व्यक्ती, संस्था किंवा कंपन्यांना या वर्षात कंपनीने शेअर्सचे वाटप केलेले नाही.

१९. कंपनीने या वर्षी कोणतीही ऋण विमोचन पत्र (डिबेंचर्स) दिलेली नाहीत; त्यामुळे ऋण विमोचन पत्रांसाठी प्रतिभूतींची निर्मिती करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२०. कंपनीने आमच्या अहवालाच्या कालावधीत जनतेकडून कोणत्याही सार्वजनिक निधीद्वारे पैसा उभारलेला नाही.

२१. आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार यावर्षात कंपनीकडून कोणतीही लबाडी झाली नाही किंवा कंपनीची फसवणूक / लबाडी केल्याचे आढळले नाही.

**बोरकर अँड मुझूमदार**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१५६९ डब्ल्यू

**देवांग वाघानी**
भागीदार
आय् सी ए आय एम नं. १०९३८६

**उम्मेद जैन अँड कंपनी**
सनदी लेखापाल करिता
एफ आर एन ११९२५० डब्ल्यू

**अखिल जैन**
भागीदार
आय सी ए आय
एम नं. १३७९७०

**एम पी चितळे अँड कंपनी**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१८५१ डब्ल्यू

**आशुतोष पेडणेकर**
भागीदार
आय सी ए आय
नं. ०४१०३७

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ ऑगस्ट २०१४

# दि. ३१ मार्च २०१४ रोजीचा ताळेबंद

(रक्कम ₹ मध्ये)

| | | | टिपा क्र. | ३१-०३-२०१४ रोजी | ३१-०३-२०१३ रोजी |
|---|---|---|---|---|---|
| १. | **समभाग आणि दायित्वे** | | | | |
| | (१) | भाग धारकांचा निधी :- | | | |
| | | अ)भाग भांडवल | १ | ६८,०८३,७०१,६४० | ५५,३४६,४४५,६४० |
| | | ब)राखीव आणि अधिक्य | २ | १७,७६५,८५५,०८३ | १६,६०४,८७५,०५२ |
| | (२) | शेअर ॲप्लीकेशन मनी, वाटप प्रलंबित असलेला | | १४,३२९,०९८,८९७ | १४,०२३,३२४,८९७ |
| | | (संदर्भ टिपा क्र. २४) | | | |
| | (३) | चालू नसलेली दायित्वे | | | |
| | | अ)दीर्घ मुदतीची कर्जे | ३ | २२६,४७१,९८२,४६५ | १८९,२६३,७९३,२५३ |
| | | ब)स्थगित कर दायित्व (निव्वळ) | ४ | ११,४०९,१७६,५५४ | १०,०४२,९२१,३०१ |
| | | क)इतर दीर्घ मुदतीची दायित्वे | ५ | २२,२७६,८२०,०२७ | २३,४३८,५१८,२२९ |
| | | ड)दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ६ | ६,३३१,८५९,१६२ | ६,५९२,४०३,०६३ |
| | (४) | चालू दायित्वे | | | |
| | | अ)अल्प मुदतीची कर्जे | ३(ए) | ५५,३३९,८३९,११९ | ५५,४८९,४९०,३३६ |
| | | ब)व्यापारी देणी | ७ | १९,३५७,३८९,४९० | ३४,०११,१८७,७०८ |
| | | क)इतर चालू दायित्वे | ६ | ५७,०५२,१३०,९४७ | ५२,०१३,७१३,४१५ |
| | | ड)अल्प मुदतीच्या तरतुदी | | २,०१९,६०९,३३८ | ३,२१०,१८४,५९२ |
| | | **एकूण** | | **५००,४३७,४६२,७२२** | **४६०,०३६,८५७,४८६** |
| २. | **मत्ता** | | | | |
| | **चालू नसलेल्या मत्ता** | | | | |
| | अ) | स्थिर मत्ता | | | |
| | | १)मूर्त मत्ता | ८ | १८७,४१९,२०६,१३१ | १६१,४५७,९५८,३६५ |
| | | २)अमूर्त मत्ता | ८ | १८७,९६९,९३९ | २४९,५५५,१५० |
| | | ३)प्रगतीपथावरील भांडवल कामे (निव्वळ) | ८(ए) | १७७,३६७,१४३,०४५ | १५७,४७५,१८८,०१३ |
| | | वजा : निकामी साठी तरतूद | | ७८,३०४,९४६ | ७८,३०४,९४६ |
| | | | | १७७,२८८,८३८,०९९ | १५७,३९६,८८३,०६७ |
| | | ४)विकसित होणाऱ्या अमूर्त मत्ता | | - | - |
| | ब) | चालू नसलेल्या गुंतवणुकी | ९ | २६,६००,००० | २६,६००,००० |
| | क) | दीर्घ मुदतीची कर्जे व अग्रीमे | १० | ४,०६३,९८७,८०० | ६,५३३,१८३,२९६ |
| | **चालू मत्ता** | | | | |
| | अ) | वस्तू सूची | ११ | १७,४०१,११९,१३० | १७,१५८,७५०,४७६ |
| | ब) | व्यापारी प्राप्य | १२ | ८६,६४०,५६८,८१२ | ७१,३३०,०८३,६७१ |
| | क) | रोख व रोख समतूल्य | १३ | ४४०,५१७,५०४ | १,२०८,३११,९८१ |
| | ड) | अल्प मुदतीची कर्जे व अग्रीमे | १० | २२,५७३,४८५,५५९ | २९,३८८,२३१,३१६ |
| | इ) | इतर चालू मत्ता | १४ | ४,३९५,१६९,७४८ | १५,२८७,३००,१६४ |
| | | **एकूण** | | **५००,४३७,४६२,७२२** | **४६०,०३६,८५७,४८६** |
| | | वित्तीय विवरणपत्र सोबतच्या टिपा पहाव्यात | | | |

आमच्या जोडलेल्या अहवालानुसार
**एम पी चितळे अँड कंपनी**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१८५१ डब्ल्यू

**आशुतोष पेडणेकर**
भागीदार
आय सी ए आय
नं. ०४१०३७

**बोरकर अँड मुझूमदार**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१५६९ डब्ल्यू

**देवांग वाघानी**
भागीदार
आय् सी ए आय एम नं. १०९३८६

**उम्मेद जैन अँड कंपनी**
सनदी लेखापाल करिता
एफ आर एन ११९२५० डब्ल्यू

**अखिल जैन**
भागीदार
आय सी ए आय
एम नं. १३७९७०

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी करिता**

**जे के श्रीनिवासन**
संचालक(वित्त)

**आशिष शर्मा**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**एस. के. लाबडे**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

# दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक

(रक्कम ₹ मध्ये)

| | | | टिपा क्र. | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तनापासूनचा महसूल | | १५ | १६५,३८२,१३४,४०३ | १६४,२३८,६२०,९६६ |
| २. | इतर उत्पन्न | | १६ | ८३७,३७९,७५२ | २,१९१,८४३,६७७ |
| **३.** | **एकूण महसूल (१+२)** | | | **१६६,२१९,५१४,१५५** | **१६६,४३०,४६४,६४३** |
| ४ | खर्च | | | | |
| | अ) | वापरलेल्या साहित्याची किंमत | १७ | १०८,१०८,३००,९७२ | १०८,२२१,२०५,०६९ |
| | ब) | कर्मचारी लाभ खर्च | १८ | ११,१६४,१२०,९५६ | ९,१००,३६४,२८० |
| | क) | वित्त खर्च | १९ | १७,१०९,७१९,३२९ | १३,६११,०७०,१४५ |
| | ड) | घसारा/कर्ज फेडीची तरतूद | ८ | ११,६३४,३०४,९३२ | ५,५६९,६८८,९८६ |
| | इ) | इतर खर्च | २० | १५,००३,३८०,१४४ | २०,६५०,५०६,४४५ |
| | **फ)** | **एकूण खर्च** | | **१६३,०१९,८२६,३३३** | **१५७,१५२,८३४,९२५** |
| ५. | नफा - करपूर्व (३-४) | | | ३,१९९,६८७,८२२ | ९,२७७,६२९,७१८ |
| ६. | कर खर्च | | | | |
| | अ) | चालू कर | | ७२३,०००,००० | २,१३४,०००,००० |
| | ब) | स्थगित कर | | १,३६६,२५५,२५७ | २,२६३,८३७,३६१ |
| | | | | | |
| **७.** | **कालावधीसाठी नफा/ (तोटा)** | | | **१,११०,४३२,५६५** | **४,८७९,७९२,३५७** |
| ८. | प्रति समभाग मिळकत | | | | |
| | | (१) मूळ | | ०.१५ | ०.७९ |
| | | (२) सौम्य कृत | | ०.१५ | ०.७९ |
| | | वित्तीय विवरण पत्रांसोबतच्या टिपा पहाव्यात | | | |

आमच्या जोडलेल्या अहवालानुसार
**एम पी चितळे अँड कंपनी**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१८५१ डब्ल्यू

**आशुतोष पेडणेकर**
भागीदार
आय सी ए आय
नं. ०४१०३७

**बोरकर अँड मुझूमदार**
सनदी लेखापाल, करिता
एफ आर एन १०१५६९ डब्ल्यू

**देवांग वाघानी**
भागीदार
आय् सी ए आय एम नं. १०९३८६

**उम्मेद जैन अँड कंपनी**
सनदी लेखापाल करिता
एफ आर एन ११९२५० डब्ल्यू

**अखिल जैन**
भागीदार
आय सी ए आय
एम नं. १३७९७०

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ ऑगस्ट २०१४

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी करिता**

**जे के श्रीनिवासन**
संचालक(वित्त)

**आशिष शर्मा**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**एस. के. लाबडे**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

# वित्तीय विवरणपत्र टिपा

**१. दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रांचा भाग असलेल्या लेखांवरील टिपा व महत्वाची लेखा धोरणे.**

**अ) वित्तीय विवरणपत्र तयार करण्याचे आधारतत्व**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ही, कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतूदीनुसार नोंदणी झालेली कंपनी आहे. ती विद्युत अधिनियम २००३ या कायद्याने शासीत आहे. जेव्हा कंपनी अधिनियम १९५६ आणि कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतूदी विद्युत अधिनियम २००३ व त्या अंतर्गत केलेले नियम यांच्या सहवाचनाशी विसंगत असतील; तेव्हा विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७४ च्या अटीनुसार, विद्युत अधिनियम २००३ मधील तरतूदी अभिभावी होतील.

सदर कंपनी ही सतत चालू असणारी संस्था आहे या संकल्पनेच्या आधारे हे लेखा तयार केले आहेत. या कंपनीने लेखा तयार करण्यासाठी उपार्जन तत्वाचा अंगिकार केला आहे. त्यातून सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात येणारी लेखांची तत्वे (जीएएपी) आणि कंपनी (लेखा मानके) नियम २००६ (कंपनी व्यवहार मंत्रालयाने केलेल्या स्पष्टीकरणा नुसार हे नियम कंपनी अधिनियम २०१३च्या कलम १३३ नुसार लागू राहणारे आहेत), याची पूर्तता करण्यात येते. अधिसूचना क. जी. एस. आर ७३९ (इ) दि. ०७ डिसेंबर २००६ नुसार वरील तरतूद केलेली आहे.

**ब) अंदाज वापरणे :**

वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना ती सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखा तत्वांशी सुसंगत असावी यासाठी काही अंदाज व गृहीते करणे आवश्यक असते. या अंदाजांचा परिणाम वित्तीय विवरणपत्रांच्या तारखेला, मत्ता व दायित्वे यांच्या आणि अहवाल वर्षातील महसूल व खर्च यांच्या रकमावर होतो. प्रत्यक्ष निष्कर्ष आणि अंदाज यांच्यात जो फरक या कालावधीत पडतो, त्याला त्या कालावधीसाठी मान्यता दिली जाते.

**क) मूर्त स्थिर मत्ता :**

१ कंपनीच्या स्थिर मत्तांची, लेखा पुस्तकात, त्यांच्या ऐतिहासिक किमतीनुसार नोंदणी केली जाते. स्थिर मत्ता त्याच्या संपादनाचा किंवा बांधकामाचा खर्च वजा संचित घसारा व निकामी / नादुरुस्ती यासाठीची तरतूद या पद्धतीने नमूद केल्या जातात.

२. संपादनाच्या खर्चात वाहतूक आकार, शूल्क व कर (कर्जाचे प्राधिकारी यांचेकडून पून:प्राप्त होऊ शकणारे खर्च वगळून), वसूली, कर्जाचा खर्च व सदर मत्ता उद्देशित वापरास योग्य होण्यासाठी केलेले प्रासंगिक खर्च, यांचा समावेश होतो.

३. कंपनीने स्वत:च्या मालकीचा नसणाऱ्या स्थिर मत्तांच्या निर्मितीसाठी केलेला भांडवली खर्च. हा सदर मत्तांची रचना जोपर्यंत चालू आहे तो "प्रगतीपथावरील भांडवली कामे" यात दर्शविला जातो. आणि त्यानंतर कंपनीच्या "मालकीच्या नसणाऱ्या मत्तांच्या निर्मितीचा भांडवली खर्च" या लेखाशीषीतंर्गत स्थिर मत्तांच्या अनुसूचीमधे नोंदला जातो. कंपनीची मालकी नसणाऱ्या मत्तांच्या खर्चासाठी केलेला खर्च आणि कंपनीच्या सामाजिक जबाबदारीची कार्ये याचा खर्च नफा व तोटा पत्रकात आकारला जातो.

४. प्रगतीपथावरील भांडवली कामे यांच्या देयकांचे संबंधित कंत्राटदारांसोबत अंतीमत: चुकती होणे शिल्लक आहे, अशा कामाचे भांडवलीकरण अंतीम चुकतीकरण्याच्या वर्षातील करावयाच्या समायोजनाच्या अधीन राहून केले जाते.

५. भांडवली कामांच्या किमतीत फरक झाल्याच्या दाव्यांचा लेखा, ते कंपनीने स्विकारल्यास केली जाते.

६. ज्या प्रकल्पांची मंजूरी मिळवयाची आहे, त्यासाठी तो प्रकल्प शोधणे, त्याचे सर्वेक्षण व शक्यतेचा अभ्यास करणे यासाठी केलेला खर्च, सदर प्रकल्प नाकारला जाणे किंवा तीन वर्षे यापैकी जो कालावधी आधी असेल तोपर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यात समाविष्ट केला जातो. जर तो नाकारला तर सदर खर्च, नाकारण्याच्या निर्णयाच्या वर्षासाठी महसूलात आकारला जातो.

७. ज्या स्थिर मत्तांचा शासकीय अनुदान मिळते त्या निव्वळ अनुदानानुसार लेखा पुस्तकांत दर्शविल्या जातात.

८. ज्या स्थिर मत्तांची किमंत प्रत्येकी ₹ ५,०००/- पर्यंत आहे, त्याचा पूर्ण घसारा, खरेदी वर्षात केला जातो. मोबाईल फोनची किंमत खरेदी वर्षात महसूलामधे आकारली जाते.

९. विक्रीसाठी काढलेल्या निवृत्ती मत्तांचे मूल्यांकन निव्वळ पुस्तकी मूल्य किंवा वसूली मूल्य यापैकी जे कमी असेल तसे करुन चालू मत्तांमधे प्रकट केले जाते.

१०. अमूर्त मत्ता - अमूर्त मत्तांचे भविष्यातील संभाव्य लाभ कंपनीकडे प्रवाहीत होणार असतील तर खर्चातून कर्ज फेडीची संचित तरतूद आणि कमी करण्यातील तोटे वजा करुन त्यांचे भांडवलीकरण केले जाते.

**प्रगतीपथावरील भांडवली कामे :**

११. नवे प्रकल्प / विस्तार याद्वारे होणाऱ्या स्थिर मत्तांच्या प्रकरणी, असे प्रकल्प / विस्तार कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंतच संबंधित खर्च व व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते.

१२. कंपनीचे प्रकल्प व नियोजनाचे युनीट्स यांचेवर कालावधीमधे केलेल्या एकूण खर्च, हा संबंधित प्रगतीपथावरील भांडवली कामाच्या लेखात एकूण अर्थवृद्धीच्या आधारे संविभाजित केला जातो.

१३. प्रकल्प/वीज निर्मिती केंद्रे यांच्या प्रायोगिक तत्वावरील कामावर केलेला खर्च व त्यातून निर्माण झालेला महसूल याचे भांडवलीकरण केले जाते.

**ड) कर्ज खर्च :**

पात्र मत्तांचे संपादन किंवा उभारणी करण्यासाठी कर्जावरील खर्च, यांचे भांडवलीकरण मत्ताच्या खर्चाच्या भाग म्हणून केले जाते. पात्र झालेली मत्ता म्हणजे अशी मत्ता जी तिच्या उद्देशित वापरासाठी तयार होण्यास बराच अवधी घेते. कोणत्याही भांडवली मत्ता संपादन करणे किंवा त्यांची उभारणी करण्यासाठी जो कर्ज खर्च वापरला जात नाही; त्याला तो ज्या काळात खर्च केला, त्या काळातील खर्च म्हणून मान्यता दिली जाते.

**इ) मत्ता कमी करणे :**

कंपनी ताळेबंदाच्या तारखेला प्रत्येक स्थिर मत्तांचे तसेच रोकड निर्मितीचे घटक (सी.जी.यू.) कमी करण्याची शक्यता किंवा खात्री वाटण्यासारखी परिस्थिती असेल तर, त्यांचे मूल्यांकन करते जर अशा मत्ता किंवा रोकड निर्मितीचे घटक (सी.जी.यू.) चालू ठेवण्याचा खर्च वसूल होणाऱ्या खर्चापेक्षा जास्त असेल तर मालमत्ता कमी करण्यासाठी तरतूद केली जाते.

**एफ) महत्वाचे / विमा असलेली यंत्र सामुग्रीचे सुटेभाग**

१. कारखाना व यंत्रे यासोबत त्यांचे सुटेभागही मिळविले जातात. ज्यांचा उपयोग अनियमित होण्याचा अंदाज असेल आणि त्यांचा खर्च माहिती असेल तर त्याचे वेगळे भांडवलीकरण केले जाते. जर अशा सुटयाभागांचा खर्च/किंमत माहीत नसेल तर त्यांचे संबधित कारखान्यासोबत भांडवलीकरण केले जाते.

२) नंतर प्रापण केलेल्या यंत्रे याचे भांडवलीकरण सुध्दा त्यांच्या खरेदीच्या वर्षात केले जाते.

३) संबंधित कारखाना व यंत्रे यांच्या शिल्लक उर्वरित आयुष्यासाठी त्यांचा संपूर्ण घसारा केला जातो.

४) सुटया भागाचे कमी झालेले मूल्य, हे ज्या वर्षात असे भाग बदलण्यात आले आणि त्यांचे संबंधित सुटे भाग निरुपयोगी ठरविण्यात आले, त्या नुसार आकारले जाते. मात्र जर असे जुने संबंधित भाग दुरुस्त करुन पून: वापरण्यात आले तर त्या दोन्हींचा घसारा उर्वरित उपयुक्त आयुष्यानुसार पूर्णपणे केला जातो. संबंधित जुन्या सुटया भागाच्या दुरुस्तीचे आकार नफा व तोटा पत्रकात आकारले जातात.

५) जर बदललेल्या मत्तेचा भाग/भांडवली सुटे भाग यासाठी (त्यांच्या मूळमत्तांच्या भागाच्या / सुट्या भागाच्या कमी केलेल्या किमती माहिती नसतील तर नवीन मत्तांचा भाग/नवीन भांडवली सुटे भाग यांचा खर्च/निव्वळ पुस्तकी मूल्य याचे निर्लेखन केले जाते.

**यंत्रांचे सुटे भाग/ विमा काढलेली यंत्राची सामग्री**

६) इतर सुटया भागांना "भांडार माल व सुटे भाग" असे समजण्यात येते व ते वस्तूसूचीचा भाग होतात. त्यांचे वजनी सरासरी निश्चित केलेल्या तत्वानुसार किंवा निव्वळ वसूल होण्याजागे मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार मूल्यांकन केले जाते आणि जेव्हा ते दिले जाते त्यानुसार खर्च नोंदल जातो.

**ग) घसारा/ कर्जफेडीची तरतूद:**

**१) मूर्त स्थिर मत्ता :**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे म.रा.वि.म. (बहू-वर्षीय दर) नियमन २०११, दि. १ एप्रिल २०११ पासून अमलात आले. त्या अधिसूचित केलेल्या दरानुसार मत्ताच्या किमतीच्या ९० टक्यांपर्यंत घसाऱ्याची तरतूद कंपनी सरळ रेषा पद्धतीनुसार करते. घसाऱ्याची ही नवीन पद्धती दि. ०१.०४.२०१३ पासुन सुरु झालेल्या कालवधीतील लेखा वर्षापासून अमलात आली.

वर्षभरात भर घातलेल्या/विल्हेवाट लावलेल्या/निरुपयोगी ठरविलेल्या मत्तांचा घसारा याबाबत यथाप्रमाण पद्धतीनुसार तरतूद केली जाते. आणि हरीत क्षेत्र/तपकीरी क्षेत्र प्रकल्पांचे भांडवली करणाबाबतचा घसारा त्यांचे वाणिज्यिक कार्य सुरु होण्याच्या तारखेपासून नफा व तोटा पत्रकात आकारला जातो.

जेव्हा एखाद्या मत्तेचे आयुष्य आणि/किंवा कार्यक्षमता नुतनीकरण किंवा आधुनिकीकरण यामुळे वाढले असेल, तर त्याचा खर्च व त्यासोबत कर्जफेडीची तरतूद न झालेली घसाऱ्याची रक्कम याचा आकार तांत्रिक मूल्यांकनानंतर निश्चित केलेल्या सुधारित उपयुक्त आयूष्यानुसार केला जातो.

भाडेपट्टीच्या जमीनीच्या कर्जफेडीची तरतूद, सर्वसामान्यपणे तिच्या भाडेपट्टीच्या मुदतीनुसार केली जाते. मात्र जमिनीत गुंतवणूक करण्यासाठी भाडेपट्टयाने जमीनधारण केली असल्यास, ती जागा योग्य करण्याचा खर्चासाठीचा घसारा सरळ रेषा पद्धतीने प्रतीवर्षी ३.३४ टकयाने आकारला जातो.

२) ज्या मत्ता (खाली दिलेल्या - ३ यात नमूद केलेल्या मत्ता व्यतिरिक्त इतर मत्ता) कार्यान्वित झाल्यानंतर त्यांचा घसारा ७० टकयांपर्यंत आकारण्यात आला नसेल. त्यासाठी कंपनी घसाऱ्याचा दर खाली विहीत केलेल्या प्रमाणे आकारते. अशा मत्तांचा संचित घसारा ज्यावर्षी ७० टक्के पर्यंत होतो. त्या वर्षाच्या अखेरीस, ठोक मत्तांचा गट या प्रमाणे घसाऱ्याचा हिशेब केला जातो. राखीव घसारा ७० टक्के झाल्यानंतर, उर्वरित उपयुक्त आयुष्याच्या आधारे, कंपनी घसारा आकारले. म.वि.नि.आयोगाने औष्णिक व वायू आधारीत वीज निर्मिती केंद्राचे आयुष्य ३५ वर्षे असे निश्चित केले आहे.

| | |
|---|---|
| जल विद्युत, बाल्प विद्युत व वायू आधारीत वीज निर्मिती कारखाने, कुलींग टॉवर, हॅड्रालिक वकर्स, ट्रान्सफॉर्मर्स व इतर स्थापित उपकरणे पारेषण तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८ % |
| इमारती व इतर स्थापत्य बांधकामे | ३.३४ % |

३) खालील मत्तांचा घसारा सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या ९०% किंवा खाली दिलेल्या दराने आकारला जातो.

| | |
|---|---|
| फर्नीचर, जोडणी व कार्यालयातील साधने | ६.३३ % |
| वाहने | ९.५० % |
| माहिती तंत्रज्ञानाची साधने | १५.०० % |

**४) अमूर्त मत्ता :**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी करुन त्याची कार्यवाही बाहय तिसऱ्या पक्षाच्या सल्लागाराकडून करुन घेणे व त्याचे परवाने खरेदी करणे यासाठी भांडवलीकरण केलेले खर्च यांच्या कर्जफेडीची तरतूद त्यांचे अंदाजित उपयुक्त आयुष्य

दहावर्षापेक्षा जास्त नाही यानुसार केली जाते. इतर अमूर्त मत्तांच्या कर्जफेडीची तरतूद त्यांच्याकडून पुरेसे आर्थिक लाभ मिळू शकतील तेवढया मुदतीसाठी केली जाते.

**एच) वस्तू सूची :-**

भांडार साठ्यातील साहित्यामधे कोळसा गिरण्यांचा नाकारलेला माल भांडारातील पडीक वस्तू, सुटे भाग यांचे मूल्यांकन त्यांच्या किमतीपेक्षा किंवा निव्वळ वसूल होण्याजोग्या मूल्य याप्रमाणे केले जाते. खर्चामधे खरेदी खर्च (मूल्याधिष्ठित कराचा मिळू शकणारा परताण्याची निव्वळ रक्कम) आणि हे साहित्य त्यांच्या जागेवर व स्थितीत आणण्यासाठी केलेला इतर खर्च यांचा समावेश होतो. भंगारातील स्टील साहित्याला वस्तू सूचीचा भाग मानले जात नाही तसेच लेखा पुस्तकात त्याला भांडार साहित्य म्हणून मान्यता दिली जात नाही. मात्र अशा भंगार जेव्हा व जसा लिलावात विकला जाईल त्याप्रमाणे त्या उत्पन्नाची नोंद इतर उत्पन्न यात केली जाते.

आढावा घेऊन निरुपयोगी व जुनाट माल तसेच सुटेभाग निश्चित केले जातात व त्यासाठी लेखांमधे तरतूद केली जाते.

**आय) महसूल मान्यता**

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या दराच्या आधारे विक्री केलेल्या विजेचा लेखा केला जातो. त्यामधे इंधन समायोजन आकाराचा समावेश असतो. तसेच लेखाच्या मुदतीच्या अखेरीपर्यंत उपार्जित झालेल्या विनादेयक महसूलाचा, म.रा.वि.म.च्या मंजूरीच्या अधीन राहून, समावेश केला जातो. तसेच महावितरण कंपनी लि. सोबत केलेल्या वीज खरेदी करारांच्या अटीनुसार, महावितरणवर लावलेला विलंबाने केलेल्या भरण्यावर लावलेल्या अधिकाराचा समावेश महसूलात करण्यात येतो.

फ्लाय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहकांनी मान्य केलेल्या दराप्रमाणे नोंदला जातो. या करिता जमा झालेल्या रकमेची नोंद पर्यावरण व वनमंत्रालयाने दि. ०३-११-२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार फलाय ॲश वापर निधी या वेगळ्या लेखाशीर्षात केली जाते. राख वापरास देण्यासाठी केलेल्या खर्चाच्या मर्यादे इतका वापर या निधीतून केला जातो.

इतर उत्पन्न उपार्जन तत्वावर मान्य केले जाते भंगार मालाचा लेखा ज्यावेळी त्याच्या विक्रीचा करार होतो तेव्हा केला जातो. कोळसा जेव्हा कन्व्हेअर बेल्टवर भरला जातो, तेव्हा त्याचा वापर नोंदण्यात यावा असे कंपनीचे धोरण आहे. त्यामुळे कोळसा कारखान्यात नाकारलेल्या कोळसाच्या मूल्यामुळे होणारी जमा अशा कोळशा वापाराच्या मूल्यातून कमी केली जाते. परिसमापनातील नुकसानाची वसूली आणि कंत्राटदारांना दिलेल्या अग्रीमवरील व्याज यांना उत्पन्न/स्थिर मत्ते सोबतचे समायोजन याप्रमाणे ते प्रत्यक्षात होणाऱ्या वर्षात केली जाते.

**जे) गुंतवणूकी :-**

दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकींचे वर्गीकरण "चालू नसलेल्या" असे केले जाते. आणि त्यांची किंमत वजा हगामी व्यतिरिक्त होणाऱ्या घटीसाठी तरतूद यानुसार गुंतवणूकीच्या मूल्या नुसार त्यापुढे नेल्या जातात.

**के) परकीय चलनातील व्यवहार :-**

परकीय चलनातील व्यवहाराची नोंद करताचा प्रारंभिक अहवालातील चलनानुसार केली जाते. त्यासाठी परकीय चलनातील रक्कमेस अहवालाचे चलन आणि परदेशी चलन यातील व्यवहाराच्या तारखेला लागू असलेला विनिमय दर लागू करुन नोंद केली जाते.

ताळेबंदाच्या तारखेला, परकीय चलनातील बाबींची नोंदणी अखेरचा दरानुसार वापरस केली जाते. जर काही हानी किंवा प्राप्ती असेल तर त्यास त्यावर्षाच्या नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

पैसे भरल्याची तारीख व व्यवहाराची तारीख या दिवशीच्या परकीय चलनाच्या फरकामुळे किंवा पूर्वीचे रुपांतरीत मूल्यामुळे होणारी प्राप्ती किंवा हानी नफा व तोटा पत्रकात आकारली जाते.

**आय) कर्मचारी लाभ:-**

**१) अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ :**

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सेवेच्या बदलात त्यांना अपेक्षित अल्प मुदतीच्या कर्मचारी लाभाच्या विना सवलतींच्या रक्कमेला, कंपनी दायित्व म्हणून मान्यता देणे (उपर्जित खर्च).

**२) नोकरी नंतरचे लाभः**

व्याख्यांकित लाभ योजना

**उपदान व रजेचे रोखीकरण :**

उपदानासाठी आणि रजा रोखीकरण या निवृत्तीनंतरच्या उपार्जित दायित्वासाठीची तरतूद, विमा गणिती शासनाने निश्चित केलेल्या दायित्वानुसार, वर्षाच्या अखेरीस केली जाते.

**भविष्य निर्वाह निधी लाभ :**

भविष्य निर्वाहनिधीसाठी पूर्व निश्चित दराने अंशदान व त्यासोबत कर्मचाऱ्यांचे योगदान यांचा भरणा, कंपनी एका वेगळ्या विश्वस्तांकडे करते. हे विश्वस्त इतर कंपन्यांच्या गटांच्या निधीचेही व्यवस्थापन करतात. हा निधी ज्यांची परवानगी दिली आहे, अशा प्रतिभूतिमध्ये गुंतविला जातो. या निधीसाठी मुदतीमध्ये केलेल्या वाटयास खर्च म्हणून मान्यता दिली जाते व त्याची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

**एम) भाडेपट्ट्या**

वित्तीय भाडेपट्ट्या –

वित्तीय भाडेपट्टीने संपादित केलेल्या मत्तांच्या मालकीची संपूर्ण जोखीम व मोबदला यांची जबाबदारी कंपनीवर असते अशा मत्तांचे भांडवलीकरण भाडेपट्टीच्या आरंभापासूनच्या किमान मूल्याच्या आधारे किंवा किमान भाडेपट्टीच्या पैशाचा किमान भरणा यानुसार केले जाते. आणि त्याच्या समान रकमेचे दायित्व निर्माण केले जाते. प्रत्येक मुदतीकरीता थकबाकीच्या दायित्वावर स्थिर मुदतीचा व्याजदर मिळावा यासाठी भरलेल्या भाडयाचे नियत वाटप दायित्व आणि व्याज खर्च यात केले जाते. जल विद्युत निर्मितीच्या सोयीबाबत महाराष्ट्र शासनासोबत, भाडेपट्टीचा करार केलेला नाही.

प्रवर्ती भाडे :

भाड्याने घेतलेल्या ज्या मत्तांच्या जोखीमा व मोबदला ज्याने भाडयाने देणाऱ्यांकडे आहेत, त्यांचे वर्गीकरण प्रवर्ती भाडेपट्टया असे केले जाते. आणि त्यांच्या भाडेपट्टयाच्या भरणा सरळ रेषा तत्त्वानुसार खर्च म्हणून मान्य केला जातो.

**एन) कर**

**१) आयकरः**

आयकर अधिनियम १९६१ यातील तरतूदीनुसार वर्षाचे करपात्र उत्पनावर वर्षाचा चालू कर निश्चित करण्यात आलेला आहे, त्यासाठी परवानगी प्राप्त सूट, कपात/नामंजूरी इ.चा हिशेब केला आहे. आयकर अधिनियम १९६१ च्या कमल ११५ जे बी च्या एम ए टी तरतूदीनुसार चालू कराची तरतूद जेव्हा केली जाते, तेव्हा त्याच्या भरणा जमा करण्याबाबतचे लाभ कर निर्धारणाच्या नंतरच्या १० वर्षाकरता उपलब्ध असतात आणि ते जेव्हा प्रत्यक्ष वसूल केले जातील, तेव्हा त्यांना मान्यता दिली जाते.

**२) स्थगित कर :**

स्थगित कर हा एका मुदतीमधील कर पात्र उत्पन्न आणि लेखा नोंदीतील निर्माण झालेले उत्पन्न यांच्या फरकानुसार, मान्य केला जातो. एका कालावधीत झालेला फरक नंतरच्या एका किंवा जास्त कालावधीत उलट नोंद करण्यास पात्र असतो. तो लेखामानक-२२, उत्पनावरील कराचा लेखा यानुसार कराचा दर व त्यानंतर ताळेबंदापर्यंत कायदे यांना सूज्ञपणे लागू करुन निश्चित करण्याच्या अधीन असतो.

अशोषित घसारा किंवा पूढे नेलेले नोटे स्थगित कर मत्ता यांच्याबाबतीत, भविष्यातील प्रत्यक्ष देणी या मर्यादेत त्यांना मान्यता देण्यात येते. इतर स्थगित कर मत्तांच्या बाबतीच वसूलीची भविष्यात खात्री असेल तरच केवळ त्या मान्य केल्या जातात.

**ओ) पूर्व कालिन बाबी व असाधारण बाबीः**

यापूर्वीच्या वर्षातील विवरणपत्रातील चूक भूल यासाठी केलेल्या समायोजनांची "पूर्व कालिन बाबी" या अंतर्गत लेखा नोंदणी केली

जाते.

**पी) तरतूद, आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता:**

जुन्या घटनांच्या परिणामांमुळे ज्यांचे सध्या बंधन आहे, आणि त्यामुळे संसाधनांचे बहिर्गमन होणार आहे. अशा मोजमागणीतील अंदाजातील तरतूदींना मान्यता दिली जाते.

प्रत्येकी ₹ १० लखापेक्षा जास्त मूल्यांच्या प्रकरणातील आकस्मिक दायित्वे प्रकट केली जातात. वित्तीय विवरणपत्राच्या मंजूरीच्या तारखेला उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे आकस्मिक दायित्वांचे वित्तीय परिणाम प्रकट केले जातात. आकस्मिक दायित्वांना वित्तीय विवरण पत्रात मान्यता दिली जात नाही.

**क्यू) शासकीय अनुदान धोरण :**

विनिर्देशीत स्थिर मत्तांशी संबंधित शासकीय अनुदान अशा स्थिर मत्ताच्या ठोक मूल्यातून वजा केली जातात. जी शासकीय अनुदाने महसूलांशी संबंधित आहेत त्यांचा लेखा, एक पद्धतीच्या आधारे, त्यास योग्य अशा कालावधीसाठी आणि त्या ज्या खर्चाची भरपाई करण्याच्या हेतुसाठी दिल्या आहेत त्याच्याशी अनुरुप अशा पद्धतीने केला जातो.

**आर) रोकडता प्रवाह विवरण पत्र :**

लेखामानक ३-रोकडता प्रवाह विवरणपत्र यात विहित केलेल्या अप्रत्यक्ष पद्धतीनुसार रोकडता प्रवाह विवरण पत्रक तयार केलेले आहे.

**एस) प्रतिभाग मिळकत (इ.पी.एस.)**

प्रतिभाग मिळकतीचा हिशेब - करोत्तर नफा/तोटा यास वर्षभरातील शिल्लक असणाऱ्या समभागाच्या वेटेड सरासरीने भागून केला जातो.

संभवित सौम्यकरणास योग्य अशा समाभागाशी संबंधित लाभांस व्याज व खर्च व उत्पन्नाचे इतर आकार यांचे समायोजनानंतरचा नफा/तोटा यात मूळ प्रतिभाग मिळकत काढण्यास योग्य मानलेल्या समभागाच्या सरासरी वेटेड संख्येने आणि सौम्य करण्यासाठी योग्य असलेल्या सर्व समभागांचे रुपांतर केल्यानंतर जे देण्यात आले असते. अशा समभागाची वेटेड सरासरी संख्या याने भागून सौम्य/प्रतिभाग मिळकत काढली जाते.

प्रतिभाग मिळकतीच्या हिशेबासाठी ज्यांचे वाटप प्रलंबित आहे अशा शेअर ॲप्लीकेशनची रक्कम शेअर वाटप निश्चित झाले आहे असे समजण्यात येते.

**२) पूर्नरचना योजना**

महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांरण योजना २००५ (हस्तांतरण योजना) अंतर्गत कंपनीच्या मत्ता व दायित्वे यामधे दि. ०६ जून २००५ रोजीच्या शिल्लकींना समाविष्ट आहेत. या शिल्लकींना मराविमं सुत्रधारी कंपनीने मंजूरी दिली आहे. अंतीम हस्तांतरण योजना, महाराष्ट्र शासनाकडून अद्याप अधिसूचित व्हायची आहे. त्याचा कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रावर प्रभाव पडू शकेल.

हस्तांतरण योजनेचा एक भाग म्हणून निर्माण झालेल्या उत्तराधिकारी कंपन्यात पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाच्या कर्जाचे वाटप करण्यात आले. या प्रक्रीयेत काही मधल्या काळामधे काही कर्जाबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. (महापारेषण) यांनी काही कार्य केले होते. ते आता महानिर्मिती कंपनीकडे हस्तांतरीत झाले व त्यास सूत्रधारी कंपनीने मान्यता दिली आहे. याबाबत महापारेषण कंपनीला एकूण मुद्दलाची रक्कम ₹ १,६८७,९३६,३५०/- आणि व्याजाच्या परतफेडीची रक्कम ₹ १५२,०१८,५४०/- देण्यात आली. हस्तांतरण योजनेची अंतीम अधीसूचना प्रलंबित असल्याने राखीव/शेअर ॲप्लीकेशन मनीच्या प्रलंबित लेखा यावरील प्रभाव दिलेला नाही आणि त्याचे महापारेषणकडून शिल्लक प्राप्त/देय, असे समायोजन करण्यात आले आहे.

**टिपा क्र. ३)**

**भाग भांडवल :**

**१) अधिकृत भाग भांडवल**

| भागांचा वर्ग | सममूल्य | ३१ मार्च २०१४ रोजी | | ३१ मार्च २०१३ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | ₹ | भागांची संख्या | रक्कम (₹) | भागांची संख्या | रक्कम (₹) |
| समभाग | १० | २५,०००,०००,००० | २५०,०००,०००,००० | २५,०००,०००,००० | २५०,०००,०००,००० |

### २) वितरीत केलेले, घेतलेले व भरणा केलेले भांडवल (पूर्ण भरणा झालेले.)

| भागांचा वर्ग | सममूल्य | ३१ मार्च २०१४ रोजी | | ३१ मार्च २०१३ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | ₹ | भागांची संख्या | रक्कम (₹) | भागांची संख्या | रक्कम (₹) |
| समभाग | १० | ६,८०८,३७०,१६४ | ६८,०८३,७०१,६४० | ५,५३४,६४४,५६४ | ५५,३४६,४४५,६४० |

### ३) शिल्लक भागांच्या संख्येचा मेळ करणे

| भागांचा वर्ग | ३१ मार्च २०१४ रोजी समभाग | | ३१ मार्च २०१३ रोजी समभाग | |
|---|---|---|---|---|
| | भागांची संख्या | रक्कम (₹) | भागांची संख्या | रक्कम (₹) |
| वर्षारंभीची शिल्लक | ५,५३४,६४४,५६४ | ५५,३४६,४४५,६४० | ५,१४०,८४६,७०० | ५१,४०८,४६७,००० |
| कालावधीतील भर | १,२७३,७२५,६०० | १२,७३७,२५६,००० | ३९३,७९७,८६४ | ३,९३७,९७८,६४० |
| वर्षा अखेरची शिल्लक | ६,८०८,३७०,१६४ | ६८,०८३,७०१,६४० | ५,५३४,६४४,५६४ | ५५,३४६,४४५,६४० |

### ४ हक्क, पसंती, र्निबंध - लाभांश वितरण व भांडवलाची परतफेड यावरील निर्बंधासह.

(१) कंपनीकडे फक्त एकाच वर्गाचे भाग आहेत. म्हणजेच नाममात्र मूल्य ₹ १०/- असणारे समभाग

(२) कंपनीच्या प्रत्येक समभाग धारकांस प्रतीभागास एक मत देण्याचा अधिकार आहे. संचालक मंडळाने प्रस्तावित केलेला लाभांश (अंतरीम लांभाश वगळता), हा भागधारकांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीच्या अधीन आहे.

(३) असा लाभांश जेव्हा मंजूर होईल, तेव्हा प्रत्येक भाग धारकास त्याने धारण केलेल्या भागांच्या प्रमाणात लाभांश स्वीकारण्याचा हक्क राहील.

(४) कंपनीचे परिसमापन झाल्यास, कंपनीच्या सर्व धनकोंना मत्तांचे वाटप / परतफेड केल्यानंतर, समभाग धारकांना कंपनीच्या उर्वरित मत्ता प्राप्त करण्याचा हक्क राहील. भागधारकांनी धारण केलेल्या भागांच्या संख्येच्या प्रमाणात हे वाटप केले जाईल.

### (५) सूत्रधारी कंपनीने धारण केलेले प्रत्येक वर्गातील भाग

| भाग धारकाचे नाव | ३१ मार्च २०१४ रोजी | ३१ मार्च २०१३ रोजी |
|---|---|---|
| | समभाग | समभाग |
| मराविमं सूत्रधारी कंपनी लि. (संख्या) | ६,८०८,३२०,१६४ | ५,५३४,५९४,५६४ |
| मराविमं सूत्रधारी कंपनी लि. (रक्कम) | ६८,०८३,२०१,६४० | ५५,३४५,९४५,६४० |

### (६) कंपनीच्या ज्या भागधारकांकडे ५ टक्कयांपेक्षा जास्त समभाग आहेत त्यांचा तसेच सूत्रधारी कंपनीच्या भागांच्या तपशील

| भागधारकांचे नांव | ३१.०३.२०१४ रोजी | | ३१.०३.२०१३ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | समभाग | भागांची टक्केवारी | समभाग | भागांची टक्केवारी |
| मराविमं सूत्रधारी कंपनी लि. | ६,८०८,३२०,१६४ | ९९.९९ | ५,५३४,५९४,५६४ | ९९.९९ |

## टिपा क्र. २ :

(रक्कम ₹ मध्ये)

| राखीव आणि अधिक्य | ३१ मार्च २०१४ रोजी | ३१ मार्च २०१३ रोजी |
|---|---|---|
| **नफा व तोटा पत्रकाप्रमाणे अधिक्य** | | |
| वर्षारंभीची शिल्लक | १६,६०४,८७५,०५२ | ११,७२५,०८२,६९५ |
| भर - नफा व तोटा पत्रकातून स्थलांतरीत केलेला नफा | १,११०,४३२,५६५ | ४,८७९,७९२,३५७ |
| **अखेरची शिल्लक** | **१७,७१५,३०७,६१७** | **१६,६०४,८७५,०५२** |
| फ्लाय ॲश वापर निधी - वर्षारंभी | - | - |
| वर्षाभरातील भर | १४९,३४५,६९५ | ९५,३४०,८३४ |
| वर्षाभरातील वापर | (१४९,३४५,६९५) | (९५,३४०,८३४) |
| **फ्लाय ॲश वापर निधीची अखेरचा शिल्लक** | - | - |
| भांडवली अनुदान राखीव | **५०,५४७,४६६** | - |
| **एकूण राखीव अधिक्य** | **१७,७६५,८५५,०८३** | **१६,६०४,८७५,०५२** |

## टिपा क्र. ३

(रक्कम ₹ मध्ये)

| | दीर्घ मुदतीची कर्जे | | दीर्घ मुदतीच्या कर्जाची विद्यमान परिपक्वता | |
|---|---|---|---|---|
| **तपशील** | **३१.०३.२०१४ रोजी** | **३१.०३.२०१३ रोजी** | **३१.०३.२०१४ रोजी** | **३१.०३.२०१३ रोजी** |
| **प्रतिभूत कर्जे** | | | | |
| **मुदतीची कर्जे** | | | | |
| **वित्तीय संस्थाकडून घेतलेली** | | | | |
| वीज वित्त महामंडळ | १११,८७२,०३७,७७३ | ९३,७८२,२९७,७७० | ६,०५०,२२९,१४९ | ४,५९६,८०६,३१७ |
| ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ | ९७,२७४,६३४,७५१ | ८६,६४०,६३४,७७७ | ६८७,५००,००० | ४,३०९,९१६,६६७ |
| हौसिंग अर्बन डेव्हलपमेंट कार्पोरेशनकडून कर्ज | ४६,१६०,६९० | १४,७१५,८०७ | - | - |
| आय आर इ डी ए चे कर्ज | २००,२१८,००० | - | २९,५४४,००० | - |
| **बँकांकडील कर्जे** | | | | |
| मुदतीची कर्जे | १,३६४,३७९,२६७ | ३,६७८,५६२,९८७ | ३१३,३९६,८०० | ३१३,३९६,८०० |
| बँकांकडून मध्य मुदतीची कर्जे | ६,६०३,७००,००० | - | - | - |
| | **२१७,३६१,१३०,४८१** | **१८४,११६,२११,३४१** | **७,०८०,६६९,९४९** | **९,२२०,११९,७८३** |
| | | | | |
| **अप्रतिभूत कर्जे** | | | | |
| **मुदतीची कर्जे** | | | | |
| **वित्तीय संस्थाकडून घेतलेली** | | | | |
| वीज वित्त महामंडळ | १,६३१,६९५,९८१ | २,८११,०३९,९५६ | १,४७७,३८५,७१० | १,२०६,४२९,१२५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **इतराकडून** | | | | |
| केएफडब्ल्यू १५० मे.वॅ. सौर (संदर्भ टिपा क्र. ३८(एच) | ६,९५२,८६८,१९६ | १,७०३,३९९,११४ | २,९७०,१५९,८९८ | ९८१,४८४,८०० |
| जागतिक बँकेचे कर्ज | २०९,४४५,१६० | – | – | – |
| महाराष्ट्र शासन | ३१६,८४२,६४६ | ६३३,१४२,८४२ | ३१६,२५०,१९६ | ३१६,२५०,००० |
| – | **९,११०,८५१,९८३** | **५,१४७,५८१,११२** | **४,७६३,७९५,८०४** | **२,५०४,१६३,१२५** |
| **एकूण** | **२२६,४७१,९८२,४६५** | **१८९,२६३,७९३,२५३** | **११,८४४,४६५,७५२** | **११,७२४,२८३,७०८** |
| वजा – इतर चालू दायित्वांकडे स्थानांतरीत केलेले (टिपा क्र. ७) | | | (११,८४४,४६५,७५२) | (११,७२४,२८३,७०८) |
| **हस्तांतरीत** | **२२६,४७१,९८२,४६५** | **१८९,२६३,७९३,२५३** | – | – |
| अटी व शर्ती आणि प्रतिभूती यांच्या प्रकटना करिता टिपा क्र. २५(ए) जोडपत्र अ पहावे. | | | | |

## टिपा क्र. ३(ए)

(रक्कम ₹ मध्ये)

| अल्प मुदतीची कर्जे | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
|---|---|---|
| **मागणीनुसार परतफेड करावयाचे कर्ज (प्रतिभूत)** | | |
| **बँकाकडून** | | |
| रोख – पत | २६,३३९,८३९,११९ | २४,४८९,४९०,३३६ |
| | **२६,३३९,८३९,११९** | **२४,४८९,४९०,३३६** |
| **मागणीनुसार परतफेड करावयाचे कर्ज (अप्रतिभूत)** | | |
| **बँकाकडून** | | |
| बँकाकडून खेळते भांडवल | २८,४९०,८९१,२६९ | ३०,२००,८२४,२५१ |
| हंगामी कर्ज | ५०९,१०८,७३१ | ७९९,१७५,७४९ |
| बँकाकडून निश्चित प्रकल्पाची कर्जे | – | – |
| | **२९,०००,०००,०००** | **३१,०००,०००,०००** |
| **एकूण** | **५५,३३९,८३९,११९** | **५५,४८९,४९०,३३६** |
| संदर्भ – अटी व शर्ती आणि प्रतिभूती यांच्या प्रकटनाकरिता टिपा क्र. २५(बी) जोडपत्र ब पहावे. | | |

## टिपा क्र. ४

(रक्कम ₹ मध्ये)

| स्थगित कर | अखेरची शिल्लक दि. ३१.०३.२०१४ रोजीची | आरंभीची शिल्लक दि. ३१.०३.२०१३ रोजीची | कपात/ जमा वर्षभरातील |
|---|---|---|---|
| **स्थगित कर दायित्वे (अ)** | | | |
| नोंदलेला घसारा/कर्जफेडीची तरतूद आणि कर घसारा यातील फरक | २१,७८८,१५५,८९१ | १९,२७६,९३७,८६५ | २,५११,२१८,०२५ |
| **स्थगित कर मत्ता** | | | |
| आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ४३बी नुसार नामंजूर रक्कम | २,४९७,६७९,२२९ | २,५३६,७७१,९९० | (३९,०९२,७६१) |
| आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ४०(ए)(७) नुसार नामंजूर रक्कम | १,४५१,८०१,६२४ | १,४८८,५१९,३४१ | (३६,७१७,७१७) |
| पुढे नेलेली अशोषित घसारा हानी | ६,४२९,४९८,४७९ | ५,२०८,७२५,२३३ | १,२२०,७७३,२४५ |
| **एकूण** | **१०,३७८,९७९,३३२** | **९,२३४,०१६,५६४** | **१,१४४,९६२,७६८** |
| **निव्वळ स्थगित कर दायित्व (अ-ब)** | **११,४०९,१७६,५५९** | **१०,०४२,९२१,३०१** | **१,३६६,२५५,२५७** |

### टिपा क्र. ५

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर दीर्घ मुदतीची दायित्वे | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
|---|---|---|
| (१) भांडवली खर्चाचे धनको | २,९९९,३१३ | १०६,६९९,२६९ |
| (२) अनामती व संचीत रक्कमा | २१,२६०,६६४,७४२ | २३,११३,७३०,४९१ |
| (३) इतर दायित्वे | १४६,३६२,२७३ | २,७५३,७३७ |
| (४) संबंधितांसाठीची दायित्वे | ८६६,७९३,६९९ | २१५,३३४,७३२ |
| | **२२,२७६,८२०,०२७** | **२३,४३८,५१८,२२९** |

### टिपा क्र. ६

(रक्कम ₹ मध्ये)

| तरतूदी | दीर्घ मुदत | | अल्प मुदत | |
|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
| **कर्मचारी लाभ तरतूद** | | | | |
| कर्मचारी लाभांशसाठी तरतूद (संदर्भ-३८(अ)(९) | ३,४४२,३९०,०९३ | ३,६४५,६४७,३१७ | १,०३२,२६४,३१९ | ९४२,१७६,२०२ |
| रजा रोखी करणाची तरतूद (संदर्भ ३८(ए)(९) | २,८८९,४६९,०६९ | २,९४६,७५५,७४६ | ९८७,२०४,०१० | ९०७,३८०,९९९ |
| **इतर तरतूदी** | | | | |
| आयकरासाठी तरतूद | ० | ० | - | ६,३०५,७४१,६५६ |
| वजा: अग्रीम कर भरणा (स्त्रोतापाशी कपात रक्कम समाविष्ट) | ० | ० | - | ४,९४५,२३७,४७४ |
| | ० | ० | - | १,३६०,५०४,१८२ |
| संपत्ती करासाठी तरतूद | ० | ० | १४१,००९ | १२३,२०९ |
| | **६,३३१,८५९,१६२** | **६,५९२,४०३,०६३** | **२,०१९,६०९,३३८** | **३,२१०,१८४,५९२** |

### टिपा क्र. ७

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर चालू दायित्वे | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
|---|---|---|
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची चालू काळातील परिपक्तता (टिपा क्र. ३ आणि तेथील जोडपत्र) | ११,८४४,४६५,७५२ | ११,७२४,२८३,७०९ |
| कर्जावर उपर्जित झालेले पण देय नसलेले व्याज | ५,२५२,७७७,३५४ | २,७४६,०१२,३७२ |
| इतर देणी | | |
| (१) अनामत व संचीते | १२,८९६,१५७,७४६ | ९,३२३,४३७,२०० |
| (२) भांडवली मालासाठी देणी | ८,६८२,३७०,७३० | १३,७४९,१०५,६२९ |
| (३) इतर दायित्वे | १२,३९९,५५६,०७२ | ८,०१४,७८३,२२३ |
| (४) संबंधित संस्थाची दायित्वे | ५,९७६,८०३,२९३ | ६,४५६,०९१,२८२ |
| | **५७,०५२,१३०,९४७** | **५२,०१३,७१३,४१५** |

# टिपा क्र. ८

(रक्कम ₹ मध्ये)

| मालमत्ता | एकूण गट (खर्चानुसार) | | | | घसारा | | | | | निरुपयोगीसाठी तरतूद ३१.०३.२०१४ | निरुपयोगीसाठी तरतूद ३१.०३.२०१३ | निव्वळ गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०१.०४.२०१३ रोजी | भर / समयोजन | कपात / समयोजन | ३१.०३.२०१४ रोजी | ०१.०४.२०१३ रोजी | घसारा / तरतूद वर्षासाठी | पूर्वकालिन घसारा | घसारा / समयोजन | ३१.०३.२०१४ रोजी | | | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
| **मूर्त मत्ता** | | | | | | | | | | | | | |
| जमीन (विकास समाविष्ट) | | | | | | | | | | | | | |
| मुक्त | २,१७२,४५०,०१९ | ३२,२५५,०३८ | २५,९१६ | २,२०४,६७९,१४१ | - | - | | - | - | | | २,२०४,६७९,१४१ | २,१७२,४५०,०१९ |
| भाडेपट्टीची | ५५१,५५५,७६९ | | | ५५१,५५५,७६९ | ६०,०००,४४३ | १८,४२१,९६२ | | | ७८,४२२,४०५ | | | ४७३,१३३,३६४ | ४९१,५५५,३२६ |
| इमारत | | | | | | | | | | | | | |
| कारखान्याची इमारती | ९,४९६,५८२,७९४ | १९,८१५,११० | १,४८५,१९७ | ९,५१४,९१२,७०७ | ४,४७८,८६०,९३८ | २०६,०८३,४६९ | - | १७३,०६३ | ४,६८४,७७१,३४४ | ३,९६९,४४६ | ३,९६९,४४६ | ४,८२६,१७१,९१७ | ५,०१३,७५२,४१० |
| इतर | ४,६१४,४१२,२१३ | १,०१७,४४३,८८३ | (१,४८५,१९७) | ५,६३३,३४१,२९३ | १,३४६,४०८,०७३ | २५९,२७५,२०१ | २०४,९२२ | (१७३,०६०) | १,६०६,०६१,२५६ | | | ४,०२७,२८०,०३७ | ३,२६८,००४,१४० |
| जल विद्युत सयंत्र | १९,१५१,७४९,४३९ | १,३०९,४७०,६७४ | १,७९२,००० | २०,४५९,४२८,११३ | ६,०९६,२५३,०९१ | १,६२५,००५,१६५ | १३३,४७२ | ८३,१६४ | ७,७२१,३०८,५६४ | २,९९३,७१३ | २,९९३,७१३ | १२,७३५,१२५,८३६ | १३,०५२,५०२,६३५ |
| **इतर बांधकामे** | | | | | | | | | | | | | |
| रेल्वे सायडींग | ५,०१९,६३४,६७९ | २,००५,६७४,७७१ | १२३,६१६,२३९ | ६,९०१,६९३,२११ | ८७०,५३६,०१७ | २६२,५३८,३६६ | (४७,२५८) | ५८,७७३,०५८ | १,०७४,२५४,०६७ | | | ५,८२७,४३९,१४४ | ४,१४९,०९८,६६२ |
| रस्ते व इतर | ९,२९१,४९०,९६१ | ७१,०४३,२०२ | - | ९,३६२,५३४,१६३ | ३,१२७,०५५,४२४ | २८२,८२४,७३३ | ४,८२१ | १३१,८५२ | ३,४०९,७५३,१२६ | २,७७४,७०६ | २,७७४,७०६ | ५,९५०,००६,३३१ | ६,१६१,६६०,८३१ |
| कारखाना, यंत्रे व साधने | १९०,७२३,१४८,६७८ | ३३,४१८,२०९,६६० | ४९७,६८०,५२३ | २२३,६४३,६७७,८१५ | ६६,५३३,८८१,७०२ | ८,७११,४१८,७३३ | (६७,९२५,८४६) | ११०,७०५ | ७५,१७७,२६३,८८४ | ७५,३७३,११० | ७४,८६९,१४६ | १४८,३९१,०४०,८२१ | १२४,११४,३९७,८३० |
| लाईन व केबल नेटवर्क | ३,२८३,७६१,०८६ | १५३,०२७,७०३ | ५,५६४,१७९ | ३,४३१,२२४,६१० | १,२८५,०७१,३०८ | १३२,९९३,४१४ | - | ४०२,४३२ | १,४१७,६६२,२९० | ६७,८६२,३६९ | ६७,८५३,९५० | १,९४५,६९९,९५१ | १,९३०,८३५,८२८ |
| फर्निचर व जोडणी | ३५१,९६६,०५७ | २१,०२२,८५२ | ५०,९२८ | ३७२,९३७,९८१ | १४५,८३३,९३५ | १६,२३९,००१ | (१८,४३३) | (२१६,७७८) | १६२,२७१,२८१ | ३०,१८१ | ३०,१८१ | २१०,६३६,५१९ | २०६,१०१,९४१ |
| वाहने | १७२,३३५,४६३ | ३,९६५,४३१ | २,६७१,३२४ | १७३,६२९,५७० | १३४,०४०,७८६ | ५,५९६,४९४ | (२७४,६०७) | २,४०४,१९४ | १३६,९५८,४७९ | १,१४७,४७० | १,१४७,४७० | ३५,५२३,६२१ | ३७,१४७,२०७ |
| कार्यालयीन साहित्य | ३२५,०२५,९३७ | ६,८४१,८२७ | (१,६२१,४९७) | ३३३,४८९,२६१ | १४१,८१७,९७२ | २९,२५९,९२२ | ३८,०७४ | (१,५०९,६४२) | १७२,६२५,६१० | १२८,५४३ | १२८,५४३ | १६०,७३५,१०८ | १८३,०७९,४२२ |
| **कंपनीच्या मालकीची नसलेली मत्ता** | | | | | | | | | | | | | |
| कंपनीच्या मालकीची नललेली मत्ता निश्चितीचा भांडवल खर्च | ८८३,९३८,८२७ | | ८९१,४६८ | ८८३,०४७,३५९ | २०६,१११,०२७ | ४५,७००,५७८ | (८७३,४२९) | ८०,८४४ | २५०,८५७,३३२ | ४५५,६८६ | ४५५,६८६ | ६३१,७३४,३४१ | ६७७,३७२,११४ |
| वजा : भांडवल | | | | | | (३५,९१९,९८७) | | | | | | | |
| एकूण मूर्त मत्ता | २४६,०३८,०५१,९२२ | ३८,०५८,७७०,१५१ | ६३०,६७१,०८० | २८३,४६६,१५०,९९३ | ८४,४२५,८७०,७१६ | ११,५५९,४३७,०५१ | (६८,७५८,२८४) | ६०,२५९,८३२ | ९५,८९२,२०९,६३८ | १५४,७३५,२२४ | १५४,२२२,८४१ | १८७,४१९,२०६,१३१ | १६१,४५७,९५८,३६५ |
| मागील वर्षांची संख्या | १६५,०४०,०१७,५७५ | ८१,८०५,४०३,५९१ | ८०७,३६९,२४४ | २४६,०३८,०५१,९२२ | ७९,४८२,७०३,५७५ | ५,५३८,८६८,६१३ | (३७,१४९,७१४) | ५८०,१६४,६८१ | ८४,४२५,८७०,७१६ | १५४,२२२,८४१ | १११,७७३,७३० | १६१,४५७,९५८,३६५ | ८५,४४५,५४०,२७० |

| मालमत्ता | एकूण गट (खर्चानुसार) | | | | घसारा | | | | | निरुपयोगीसाठी तरतूद ३१.०३.२०१४ | निरुपयोगीसाठी तरतूद ३१.०३.२०१३ | निव्वळ गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०१.०४.२०१३ रोजी | भर / समयोजन | कपात / समयोजन | ३१.०३.२०१४ रोजी | ०१.०४.२०१३ रोजी | घसारा / तरतूद वर्षासाठी | पूर्वकालिन घसारा | घसारा / समयोजन | ३१.०३.२०१४ रोजी | | | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
| **अमूर्त मत्ता** | | | | | | | | | | | | | |
| पाणी /प्राप्तीचा हक्क | ९,९८७,९०७ | | - | ९,९८७,९०७ | ८,९२०,९७१ | १,०६६,९३६ | - | - | ९,९८७,९०७ | | | - | १,०६६,९३६ |
| | | | | | | | | | | | | | |
| सॉफ्टवेअर परवाने | ३१४,४३८,०७६ | २६,७०८,४७७ | १३,४२५,८०७ | ३२७,७२०,७४६ | ६५,९४९,८६२ | ७३,८००,९४५ | - | - | १३९,७५०,८०७ | | | १८७,९६९,९३९ | २४८,४८८,२१४ |
| **एकूण अमूर्त मत्ता** | **३२४,४२५,९८३** | **२६,७०८,४७७** | **१३,४२५,८०७** | **३३७,७०८,६५३** | **७४,८७०,८३३** | **७४,८६७,८८१** | - | - | **१४९,७३८,७१४** | - | - | **१८७,९६९,९३९** | **२४९,५५५,१५०** |
| मागील वर्षांची संख्या | ४७,४८७,९११ | २७६,९३८,०७२ | - | ३२४,४२५,९८३ | २१,६६८,३०० | ३०,८२०,३७३ | - | (२२,३८२,१६०) | ७४,८७०,८३३ | ० | | २४९,५५५,१५० | २५,८१९,६११ |

## टिपा क्र. ८(ए)

(रक्कम ₹ मध्ये)

| प्रगतीपथावरील भांडवली कामे | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
|---|---|---|
| चंद्रपूर प्रकल्प व स्थापत्य | ५४,००८,३०३,३७४ | ४४,६४६,३८०,१७३ |
| भुसावळ प्रकल्प व स्थापत्य | २,९५७,६०९,९२९ | २७,०७८,०६१,२६० |
| कोराडी प्रकल्प व स्थापत्य | १०३,२७८,९२७,५१७ | ७३,०३७,५१७,३०१ |
| खापरखेडा प्रकल्प व स्थापत्य | ७३५,०१५,२३४ | १,०१५,३५२,१०८ |
| परळी प्रकल्प व स्थापत्य | १६,६७५,१५५,६६३ | १४,१६७,३६०,६०२ |
| पारस प्रकल्प व स्थापत्य | १,१३८,४२६,४५३ | १,१०६,२४५,८०८ |
| इतर भांडवली कामे | १,७५५,८२५,८७४ | १,८५०,१५२,९६९ |
| वजा - भांडवली अग्रीम | (३,१८२,१२०,९९९) | (५,४२५,८८२,२०८) |
| **एकूण** | **१७७,३६७,१४३,०४५** | **१५७,४७५,१८८,०१३** |

## टिपा क्र. ९

(रक्कम ₹ मध्ये)

| चालू नसलेल्या गुंतवणूकी (किंमत वजा हंगामी व्यतिरिक्त अन्य घट यानुसार मूल्य) | | |
|---|---|---|
| | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
| **व्यापारी गुंतवणूकी (उद्धृत न केलेल्या)** | | |
| **समभागातील गुंतवणकी** | | |
| **उप कंपन्यामधील** | | |
| ५०,००० (मागील वर्षी ५०,०००) समभाग धुळे औ.वि.प्रकल्पातील प्रत्येकी ' १०/-चे पूर्ण भरणा केलेले | ५००,००० | ५००,००० |
| ५०,००० (मागील वर्षी ५०,०००) समभाग धोपावे कोस्टल पॉवर कंपनी लि.चे, प्रत्येकी ₹ १०/- पूर्ण भरणा केलेले | ५००,००० | ५००,००० |
| | | |
| **संयुक्त कंपन्यांमधे** | | |
| ३०,००० (मागील वर्षी ३०,०००) समभाग युसीएम कोल लि. चे प्रत्येकी रु.१०/-चे पूर्ण भरणा झालेले | ३००,००० | ३००,००० |
| २५,००,००० (मागील वर्षी २५,००,०००) समभाग लातूर पॉवर कंपनी लि.चे प्रत्येकी रु.१०/-चे, पूर्ण भरणा झालेले | २५,०००,००० | २५,०००,००० |
| ३०,००० (मागील वर्षी ३०,०००) समभाग महागूज कॉलेरी लि. चे प्रत्येकी रु.१०/- पूर्ण भरणा झालेले | ३००,००० | ३००,००० |
| **एकूण** | **२६,६००,०००** | **२६,६००,०००** |
| **उद्धृत न केलेल्या गुंतवणूकीची एकूण रक्कम** | **२६,६००,०००** | **२६,६००,०००** |

## टिपा क्र. १०

(रक्कम ₹ मध्ये)

| कर्ज व अग्रीमे | दीर्घ मुदतीची | | अल्प मुदतीची | |
|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
| भांडवली अग्रीमे | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | ३,१८२,१२०,९९९ | ५,४२५,८८२,२०८ | - | - |
| संशयास्पद | - | - | - | - |
| | ३,१८२,१२०,९९९ | ५,४२५,८८२,२०८ | - | - |
| सुरक्षा अनामती | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | ६९४,३१५ | ३०९,६४७,९०७ | १,२८०,६६६,१२६ | १,००५,२८१,००९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संशयास्पद | ३,२५९,९७६ | ३,१८३,२४३ | – | – |
| | ३,९५४,२९१ | ३१२,८३१,१५० | १,२८०,६६६,१२६ | १,००५,२८१,००९ |
| वजा-संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ३,२५९,९७६ | ३,१८३,२४३ | | |
| | ६९४,३१५ | ३०९,६४७,९०७ | १,२८०,६६६,१२६ | १,००५,२८१,००९ |
| संबधित संस्था | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | – | – |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | ३१७,१६७,११४ | ३१२,६७४,८८८ | ७६८,७२१,७२६ | ७६४,०६७,८२५ |
| संशयास्पद | २,७१२,७९८ | २,७१२,७९८ | – | – |
| | ३१९,८७९,९१२ | ३१५,३८७,६८६ | ७६८,७२१,७२६ | ७६४,०६७,८२५ |
| वजा-संशयास्पद कर्जासाठी तरतूद | २,७१२,७९८ | २,७१२,७९८ | – | |
| | ३१७,१६७,११४ | ३१२,६७४,८८८ | ७६८,७२१,७२६ | ७६४,०६७,८२५ |
| इतर | | | | |
| अग्रीमे – रोखीत किंवा वस्तूत किंवा ज्यांचे मूल्य वसूल होईल अशी | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | – | – |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | ३००,०७१,३३४ | ३०१,५९१,५८५ | ७०३,४९३,७८५ | ७२०,०२६,७७८ |
| संशयास्पद | १,७८७,७१९,७०१ | ६१२,८६५,१६८ | – | – |
| | २,०८७,७९१,०३५ | ९१४,४५६,७५३ | ७०३,४९३,७८५ | ७२०,०२६,७७८ |
| वजा-संशयास्पद कर्जाची तरतूद | १,७८७,७१९,७०१ | ६१२,८६५,१६८ | – | – |
| | ३००,०७१,३३४ | ३०१,५९१,५८५ | ७०३,४९३,७८५ | ७२०,०२६,७७८ |
| संचालन, सुव्यवस्थासाठी पुरवठा/कामे यासाठी अग्रीमे | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | – | – |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | २४,४५७,११८ | २९,०६५,५०४ | ३,३९५,२८५,५७३ | २,८०७,८८९,२७८ |
| संशयास्पद | ९,९९५,४२८ | ९,९९५,४२८ | – | – |
| | ३४,४५२,५४६ | ३९,०६०,९३२ | ३,३९५,२८५,५७३ | २,८०७,८८९,२७८ |
| वजा-संशयास्पद कर्जाची तरतूद | ९,९९५,४२८ | ९,९९५,४२८ | – | – |
| | २४,४५७,११८ | २९,०६५,५०४ | ३,३९५,२८५,५७३ | २,८०७,८८९,२७८ |
| अग्रीमे : कोळसा/इंधन पुरवठा यासाठी | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | – | – |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | ११,२१३,९७२,६८२ | १९,२०३,६१४,०३३ |
| संशयास्पद | – | – | – | – |
| | – | – | ११,२१३,९७२,६८२ | १९,२०३,६१४,०३३ |
| अग्रीमे-कर्मचाऱ्यांसाठी | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | ४४,९९० | ३६९,१५५ | १,०१८,९०९ | ९३५,९३७ |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | २०१,४७०,९८५ | १४१,५७४,५७४ | ३८०,६३०,९२२ | ३७८,३११,५७३ |
| संशयास्पद | – | – | – | – |
| | २०१,५१५,९७५ | १४१,९४३,७२९ | ३८१,६४९,८३१ | ३७९,२४७,५१० |
| संविधिक प्राधिकरणांकडून वसूली योग्य शिल्लक | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | – | – |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | ५,००४,०८२ | ४२,१५४,४१५ |
| संशयास्पद | – | – | – | – |
| | – | – | ५,००४,०८२ | ४२,१५४,४१५ |
| | – | | – | – |
| | – | | – | – |
| पूर्वी भरणा केलेले खर्च | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | – | – |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | – | – | ५५,०४३,७३५ | ४६,६७१,२४५ |
| संशयास्पद | – | – | – | – |
| | – | – | ५५,०४३,७३५ | ४६,६७१,२४५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मिळण्याजोगे दावे आणि चालू मत्ता | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | ३७,९६०,९४५ | १२,३७७,४७५ | ४,७६९,६४८,०१९ | ४,४१९,२७९,२२३ |
| संशयास्पद | ३,५४६,७०६ | ३,८०७,४०० | - | - |
| | ४१,५०७,६५१ | १६,१८४,८७५ | ४,७६९,६४८,०१९ | ४,४१९,२७९,२२३ |
| वजा-संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ३,५४६,७०६ | ३,८०७,४०० | - | - |
| | ३७,९६०,९४५ | १२,३७७,४७५ | ४,७६९,६४८,०१९ | ४,४१९,२७९,२२३ |
| **निव्वळ बेरीज** | ४,०६३,९८७,८०० | ६,५३३,१८३,२९६ | २२,५७३,४८५,५५९ | २९,३८८,२३१,३१६ |

## टिपा क्र. ११

(रक्कम ₹ मध्ये)

| वस्तूसूची | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
|---|---|---|
| **कच्चा माल** | | |
| कोळसा | ४,९४२,८४९,६६१ | ५,७४०,३३१,५२४ |
| अधिक - प्रवासातील कोळसा | २४८,७१४,७३४ | ६१६,९८८,७०९ |
| वजा-धुलाई चालकांकडील साठयाची तरतूद | - | १,१५८,४०५,९११ |
| | **५,१९१,५६४,३९५** | **५,१९८,९१४,३२२** |
| तेल | २,५२३,५४६,३८१ | २,०६५,२३२,४७९ |
| | **७,७१५,११०,७७६** | **७,२६४,१४६,८०१** |
| **भांडार माल व सुटेभाग** | ११,३७५,३०७,३९० | ११,८३०,१९१,०८४ |
| वजा-निकामी मालासाठी तरतूद | १,६८९,२९९,०३६ | १,९३५,५८७,४०९ |
| | **९,६८६,००८,३५४** | **९,८९४,६०३,६७५** |
| **निव्वळ बेरीज** | **१७,४०१,११९,१३०** | **१७,१५८,७५०,४७६** |

## टिपा क्र. १२

(रक्कम ₹ मध्ये)

| व्यापारातून प्राप्त होण्याजोग्या रकमा | दीर्घ मुदत | | अल्प मुदत | |
|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
| **नियत तारखेपासून ६ महिन्यांपेक्षा जास्त थकबाकी** | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | - | - | १०,५५४,१८४,०२७ | ८,५२२,८९६,६७८ |
| संशयास्पद | - | - | - | - |
| | - | - | **१०,५५४,१८४,०२७** | **८,५२२,८९६,६७८** |
| **इतर** | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | ० | ० |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | - | - | ७६,०८३,७७९,२१६ | ६२,८०७,१८६,९९३ |
| संशयास्पद | - | - | २,६०५,५६९ | ० |
| | - | - | ७६,०८६,३८४,७८५ | ६२,८०७,१८६,९९३ |
| **एकूण** | - | - | **८६,६४०,५६८,८१२** | **७१,३३०,०८३,६७१** |

## टिपा क्र. १३

(रक्कम ₹ मध्ये)

| रोख व रोख सममूल्य | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
|---|---|---|
| (१) बँकांमधील शिल्लक | ४३८,९९१,८५५ | १,०२२,२५०,०२६ |
| (२) हातातील रोख रक्कम | १,५२५,६४९ | १०,८३४,९५४ |
| (३) इतर | | |
| प्रवासातील वित्तप्रेषणे | - | १७५,२२७,००१ |
| | **४४०,५१७,५०४** | **१,२०८,३११,९८१** |

## टिपा क्र. १४

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर चालू मत्ता | ३१.०३.२०१४ रोजी | ३१.०३.२०१३ रोजी |
|---|---|---|
| विक्रीच्या मत्ता | ४६७,८४०,२९६ | ४६७,९७४,४५३ |
| विना देयकाचा महसूल | २,४४२,९३६,४२६ | १४,८१९,३२५,७११ |
| आयकरासाठी तरतूद | (७,०२८,७२९,४४३) | - |
| वजा: भरलेली अग्रीम कर (टी डी एस सह) | ८,५१३,१२२,४६९ | - |
| निव्वळ अग्रीम कर | १,४८४,३९३,०२६ | - |
| | **४,३९५,१६९,७४८** | **१५,२८७,३००,१६४** |

## टिपा क्र. १५

(रक्कम ₹ मध्ये)

| प्रवर्तना पासून महसूल | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|
| **प्रवर्तनाचा महसूल** | | |
| वीज विक्री पासून महसूल | १५७,५०६,७३२,७४३ | १५८,५६३,२७१,२९९ |
| ग्राहकांपासून अधिभार उत्पन्न | ७,८७३,५५७,००० | ५,६७०,१२३,००० |
| वजा-वीज शूल्क व वीज विक्रीचा कर | १४,१६४,४२० | ११,३६६,९३३ |
| वीज विक्रीचा निव्वळ महसुल | १६५,३६६,१२५,३२३ | १६४,२२२,०२७,३६६ |
| महसूल व अर्थसहाय्य | १६,००९,०८० | १६,५९३,६०० |
| **एकूण** | **१६५,३८२,१३४,४०३** | **१६४,२३८,६२०,९६६** |
| **इतर प्रवर्तनापासून महसूल** | | |
| फ्लाय ॲशची विक्री | १४९,३४५,६९५ | ९५,३४०,८३४ |
| वजा-फ्लाय ॲश निधी मधे स्थानांतरीत केलेले | (१४९,३४५,६९५) | (९५,३४०,८३४) |
| **एकूण** | - | - |
| **प्रवर्तनापासून एकूण महसूल** | **१६५,३८२,१३४,४०३** | **१६४,२३८,६२०,९६६** |

वीज विक्री पासूनच्या महसूलात प्रकरण क्र. ५४ वर्ष २०१३ चा प्रभाव (-) ₹ ४,६००,२७८,२७२ आणि वि.वर्ष २००९-१०, २०१०-११, २०११-१२ यांचा सत्यानुरुप केलेला महसूल आणि वि.वर्ष २०१२-१३चा सुधारीत हिशेबाची रक्कम ₹ ११,०६७,१३०,०००/- समाविष्ट आहे. वि.वर्ष २०१३-१४ च्या सत्यानुरुप महसुलाची नोंद म.रा.वि.नि. आयोगाने मंजूर केलेल्या वर्षी लेखा पुस्तकात करण्यात येईल.

## टिपा क्र. १६

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर उत्पन्न | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|
| व्याज उत्पन्न | ५,७५२,८९५ | ८,७३०,५२६ |
| **इतर अप्रवर्तनीय उत्पन्न** | | |
| भाडे, भाडे आकार इ. पासून उत्पन्न | ४१,०८६,३२४ | ३३,४२३,४९६ |
| नफा: मत्ता/भांडार माल/भंगार विक्रीचा | ४२६,३२३,०८८ | ७१७,९७५,९५१ |
| निविदा फॉर्मची विक्री | १९,६३२,३७० | १३,८११,७१० |
| किरकोळ शिल्लक जमा - पूनर्लिखित | ६८,४९२,०१८ | ८७,७०३,९१८ |
| इतर प्राप्ती | २७६,०९३,०५७ | ६२३,८१७,४१६ |
| परकीय चलनातील फरकामुळे प्राप्ती (निव्वळ) | - | ७०६,३८०,६६० |
| | **८३७,३७९,७५२** | **२,१९१,८४३,६७७** |

## टिपा क्र. १७

(रक्कम ₹ मध्ये)

| वापरलेल्या मालांचे मूल्य | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|
| कोळसा | ९४,६३७,२८५,५४४ | ९३,८१७,३६१,९६६ |
| वायू | ६,९०७,७१२,४४६ | ७,९१६,२८९,५०९ |
| तेल | ६,५६३,३०२,९८२ | ६,४८७,५५३,५९४ |
| **एकूण** | **१०८,१०८,३००,९७२** | **१०८,२२१,२०५,०६९** |

## टिपा क्र. १८

(रक्कम ₹ मध्ये)

| कर्मचारी लाभ खर्च | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|
| वेतन, भत्ते, बोनस इ. | ९,३५९,४९३,३३५ | ७,१५५,४९६,६२१ |
| भविष्य निर्वाह निधीचे अंशदान | ७३६,५८०,४७० | ६९०,५०८,०९७ |
| इतर निधीचे अंशदान | १४३,३३५ | ४३१,८३८ |
| कर्मचारी कल्याण खर्च | १२९,३१०,५२३ | ९८,०१६,८३० |
| इतर कर्मचारी खर्च | १०९,९८३,८०५ | १२४,५८४,१४४ |
| रजा रोखीकरण योजना | ६४९,५४५,११८ | ८७७,४३९,९५० |
| उपदान | ७५९,१९१,६१३ | ८७३,०९१,३९३ |
| योजना मत्त्यातील तूटीसाठी तरतूद | ७०,३००,००० | - |
| | **११,८१४,५४८,१९९** | **९,८१९,५६८,८७३** |
| वजा: कर्मचारी खर्चाचे भांडवलीकरण | ६५०,४२७,२४३ | ७१९,२०४,५९३ |
| | **११,१६४,१२०,९५६** | **९,१००,३६४,२८०** |

## टिपा क्र. १९

(रक्कम ₹ मध्ये)

| वित्त खर्च | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|
| **व्याज: खालील प्रमाणे** | | |
| राज्य शासनाची कर्जे | ९२,५००,००० | १२८,८६३,६१८ |
| इतर कर्जे | २९,८०१,१८२,४९१ | २३,९८९,८१३,१४८ |
| खेळत्या भाडंवलासाठी कर्जे | २,३७६,२५२,३२९ | १,६१८,९८८,७८४ |
| ग्राहकांच्या सुरक्षा अनामती | १८८,९८५ | ४,२०८ |
| **इतर कर्ज खर्च** | | |
| शासकीय हमी शूल्क / आकार | ७७,७०६,१४२ | ९६,३०२,०२८ |
| वित्त उभारणीचा खर्च | ३४,७४६,६३९ | ५१,७१०,४७७ |
| | **३२,३८२,५७६,५८६** | **२५,८८५,६८२,२६३** |
| वजा: व्याज आणि वित्तीय आकार भांडवलीकरण केलेले | १५,२७२,८५७,२५७ | १२,२७४,६१२,११८ |
| | **१७,१०९,७१९,३२९** | **१३,६११,०७०,१४५** |

## टिपा क्र. २०

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर खर्च | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|
| भाडी | १५०,६९७,९२६ | १४८,९३१,७१३ |
| भाडेपट्टी | ५,६०१,५९६,००० | ४,५८८,८००,००० |
| **दुरुस्ती व देखभाल** | | |
| कारखाने व यंत्रसामग्री | ६,३६५,१७५,११३ | ५,५८४,१०२,६७६ |
| इमारती | ६८,६११,१८० | ९७,६२०,१४६ |
| राख हाताळणीचा खर्च | ३०७,२५४,०२० | ३०१,०५४,१४२ |
| दुरुस्ती व देखभाल खर्च - इतर | ४५६,६३६,१७२ | ५४५,०५६,७६८ |
| विमा आकार | १०१,३४८,७८१ | ८५,२६५,८५८ |
| दर व कर | १४८,७०७,६४९ | १४३,४०५,१४३ |
| **इतर** | | |
| वंगणे, वापरलेला माल व केंद्रातील पुरवठा | २६९,१४६,०८० | १,४१९,०६०,५९० |
| पाणी आकार | ५०४,४३१,६९९ | ९८४,९३०,९४७ |
| कायदेशीर व व्यावसायिक करार | ८९,७२६,३८४ | ९०,८०४,२७७ |
| लेखा परिक्षकांचे मानधन (संदर्भ टिपा-२६) | ५,१२४,५९५ | ५,०३७,५४९ |
| दलाली (एजंटाना कमीशन) | ११५,६६२,५५७ | ८२,३४०,७६२ |
| इतर बँक आकार | १४८,४४८,८०४ | ७१,४५८,९८५ |
| कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तासाठी/कंपनी सामाजिक जबाबदारी योगदान | ४४,४०१,९९६ | २,९०९,२१३,६५५ |
| संशयास्पद अग्रीमांसाठी तरतूद | १९,१६४,३९७ | ६०७,३२३,६६४ |
| इतर सर्वसाधारण खर्च | १,२९४,३०६,६३८ | १,२१५,४०१,७७७ |
| विक्री केलेल्या/भंगारात काढलेल्या स्थिरमत्तांचा तोटा | ६४,८०३,२०२ | ४३७,१८३,३८० |
| जुनाट स्थिर मत्ताचा तोटा | ४७,६२४,६८१ | ९०,०४६,६३९ |
| मागील काळातील निव्वळ प्राप्ती/हानी (संदर्भ टिपा क्र. २१) | (१,५९६,४४१,५३८) | १,६३०,८९२,२५२ |
| परकीय चलन फरकामुळे हानी (निव्वळ) | १,३२२,८६५,०२९ | - |
| | **१५,५२९,२९१,३६५** | **२१,०३७,९३०,९२३** |
| वजा: भांडवलीकरण केलेले दुरुस्ती व देखभाल खर्च | १०,५९३,८५६ | १५,९२६,९५४ |
| भांडवलीकरण केलेले प्रशासकीय खर्च | ३६५,९७१,६७० | २७६,१५६,६९० |
| फ्लाय ॲश वापर निधीकडे स्थानांतरीत केलेले खर्च | १४९,३४५,६९५ | ९५,३४०,८३४ |
| | **१५,००३,३८०,१४४** | **२०,६५०,५०६,४४५** |

**टिपा क्र. २१**

(रक्कम ₹ मध्ये)

| मागील वर्षातील (जमा) / आकार (निव्वळ) | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| इतर उत्पन्न | ४७,८०१,८४५ | ९६,९९९,२४६ |
| मागील काळातील इतर जादा तरतुदी | १,४२१,४३२,३८३ | ८०९,९२८ |
| कोळसा/वायू संबंधित प्राप्ती | - | ८,९१९,०९० |
| (जादा)/अल्प - तरतूद - घसाऱ्यासाठी | ५५,३८०,१०७ | (३७,१०४,१७३) |
| ग्राहकांकडील प्राप्ती | १२३,२४५,५३० | १४३,१३१ |
| | **१,६४७,८५९,८६५** | **६९,७६७,२२२** |
| **खर्च** | | |
| इंधना संबंधीची (प्राप्ती)/हानी | २०,९२४,७३९ | १९०,८५८,७८८ |
| निव्वळ व्याज व वित्त आकार | - | १,५५०,५८२ |
| प्रवर्तन खर्च | १३,६९४,२०९ | २१,९२१,७६६ |
| कर्मचारी खर्च | ९००,१७७ | (३७,९६७,१५३) |
| मागील वर्षातील जादा देयके | ११,८४३,९०४ | १,६७४,६९२,०८३ |
| साहित्या संबधीचे खर्च | ४,०५५,२९८ | (७६,१८८,२४६) |
| | **५१,४१८,३२७** | **१,७७४,८६७,८२०** |
| | **(१,५९६,४४१,५३८)** | **१,७०५,१००,५९८** |

**टिपा क्र. २१**

**(अ) भांडवली बांधिलकी :**

भांडवल लेखानुसार कार्यान्वित होणे बाकी असलेल्या व त्यासाठी तरतूद न केलेल्या कंत्राटांची अंदाजे रक्कम ₹ ३२,५७२,२३४,६०९/- आहे. (मागील वर्षी ₹ ६७,०११,७०१,०००/-)

**टिपा क्र. २१**

**(ब) इतर महत्वाच्या बांधिलकी**

(अ) कंपनीने निर्मिती केलेल्या विजेच्या विक्रीसाठी म.रा.विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) सोबत वीज खरेदी करार केलेला आहे.

(ब) कंपनीच्या फ्लाय ॲश (राखेची) विक्री/विल्हेवाट करणे यासाठी मे. अल्ट्रा टेक सिमेंट लि. यांचे सोबत १५ वर्षे मुदतीचा म्हणजे वि.वर्ष २०२३-२४ मधे संपणारा करार केला आहे / आदेश दिला आहे.

(क) कंपनीला प्रतीवर्षी ४६.५०४ दशलक्ष एम टी एवढया कोळश्यासाठी जोडणी करण्यात आली आहे. यामुळे वितरण करणाऱ्या कोळसा कंपन्यांकडून संलग्न बाजार भावानुसार कोळसा खरेदी करण्याची बांधिलकी कंपनीवर आहे.

(ड) कंपनीने गॅस ॲथारिटी ऑफ इंडिया लि. आणि रिलायन्स लि. या कंपन्यांशी अनुक्रमे ३.५ एम एम एस सी एम डी आणि १.२ एम एम एस सी एम डी इतक्या वायूच्यासाठी खरेदी आणि वाहतूकीचे करार केले आहेत.

**टिपा क्र. २२**

**फ्लाय ॲश (राख) वापर निधी :**

फ्लाय ॲश पासून मिळणारे उत्पन्न एका वेगळया निधीत जमा करण्यात येत आहे, आणि फ्लाय ॲशचा वापर वाढविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केलेला खर्च उत्पन्नाच्या संचित रकमेतून त्याप्रमाणात कमी केला जातो, व त्यात जर वाढ झाली तर त्या

खर्चास वर्षाच्या नफा व तोटा पत्रकातून मान्यता दिली जाते असे सादर व प्रकटन यांचा वर्षाच्या नफा व तोटा पत्रकावर कोणताही परिणाम होत नाही. पर्यावरण व वनमंत्रालयाचे दि. ०३.११.२००९ रोजी वितरीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर सादरीकरण व प्रकटन केले जात आहे. यापूर्वी फ्लाय ॲशच्या विक्रीची रक्कम ₹ १४९,३४५,६९५/– (मागील वर्षी ₹ ९५,३४०,८३४/– होती) आणि त्याच्या समतूल्य खर्च वजा करण्यात आले व त्याचे प्रकटन टिपा क्र. २(ए) मधे आहे.

**टिपा क्र. २३**

**आकस्मिक दायित्वे (तरतूद व केलेली) :** (ज्यांचे प्रत्येकी मूल्य ₹ दहा लाखापेक्षा जास्त आहे)

| अ.क्र. | तपशील | २०१३-२०१४ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|
| (अ) | तिसऱ्या व्यक्तीच्या नांवे कंपनीच्या बँकर्सने दिलेली बँक गॅरंटी | १३८,९७५,००० | १३८,९७५,००० |
| (ब) | कंपनीच्या बँकर्सनी दिलेली बँक गॅरंटी / लेटर ऑफ क्रेडीट | ६८,६००,००० | ९४,९९३,५५० |
| (क) | कंपनीच्या विरोधातील, मात्र कर्जे म्हणून मान्य नसलेले दावे. | ११,७५६,८०५,३३८ | ७,२९३,२१३,९१० |
| (ड) | वाद असलेले शूल्क / कर यांच्या मागण्या | ३६,३११,०९२ | १,११४,८९३,६७६ |

**टिपा क्र. २४**

**भाग भांडवल**

**वाटप प्रलंबित असलेली शेअर ॲप्लीकेशन मनी**

**आंरभीचे समभाग भांडवल :**

पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाची पूनर्रचना करण्यासाठी तयार केलेल्या हस्तांतरण योजनेनुसार कंपनीच्या समभागासाठी ₹ २५,६३३,६३३,५३७/– एवढी रक्कम मिळाली. या योजनेनुसार कंपनीला एवढया रकमेचे समभाग म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लि. ला देणे आहे. त्याप्रमाणे ₹ २५,०००,०००,०००/– एवढया रकमेचे शेअर्स म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीला वर्ष २००८-०९ मध्ये देण्यात आले आणि ₹ ६३३,६३३,५३७/– ही रक्कम शेअर ॲप्लीकेशन मनी – वाटप प्रलंबित असलेली या अंतर्गत दाखविण्यात आली. मात्र हस्तांतरण योजनेचे अंतीमीकरणास अजून महाराष्ट्र शासनाकडून मंजूरी मिळणे बाकी आहे. तशी मंजूरी मिळाल्यावर शेअर्सच्या शिल्लक रक्कमेचे अंतीमत: वाटप केले जाईल.

**समभागाच्या अंशदानानंतर झालेली प्राप्ती.**

महाराष्ट्र शासना सोबतच्या सामंजस्यानुसार, कंपनीला महाराष्ट्र राज्यात स्थापन केल्या जाणाऱ्या नवीन वीज प्रकल्पासाठी २० टक्के समभागाचा आधार मिळणार आहे. तसेच शासनासोबतच्या या सांमजस्यानुसार शेअर्स त्याच्या सममूल्यानी दिले जाणार आहेत. अशा समभागाच्या आधाराचे 'अंशदान' म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लिमिटेड मार्फत होत आहे.

महाराष्ट्र शासन वित्तीय वर्ष २००६-०७ पासून अशा समभागाच्या आधाराचे अंशदान देत आहे. शेअर वाटपाच्या अंशदानाकरता कोणतेही वेळापत्रक व्याख्यांकित केलेले नाही. त्यामुळे कंपनी अशाप्रकारे मिळणाऱ्या रकमेचा लेखा वाटप प्रलंबित असणारा शेअर ॲप्लीकेशन मनी अशा लेखाशीर्षांतर्गत करीत आहे. कंपनी अशा रक्कमांची लेखानोंद वाटप प्रलंबित असणाऱ्या शेअर ॲप्लीकेशन मनी या लेखाशीर्षांतर्गत आरंभीची रक्कम वगळता दि. ३१ मार्च २०१३ रोजी ₹ १३,३८९,६९१,३६०/– एवढी रक्कम शिल्लक होती. या वर्षात कंपनीला ₹ १३,०४३,०३०,०००/– मिळाले व मंडळाने एकूण रक्कम ₹ १२,७३७,२५६,०००/– एवढया रकमेचे १,२७३,७२५,६०० इक्विटी शेअर्स म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीला दिले. दि. ३१ मार्च २०१४ रोजी (आरंभीचे समभाग वगळता) ₹ १३,६९५,४६५,३६०/– एवढया शिल्लकीच्या वाटपास मंडळाकडून मंजूरी मिळाल्यावर ते म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीला दिले जातील.

वाटप प्रलंबित असलेले शेअर्स देण्याकरिता कंपनीकडे पुरेसे अधिकृत भांडवल आहे.

**टिपा क्र. २५(अ)**

**कर्जाचा तपशील :** कर्जाच्या तपशीलकरिता कृपया परिशिष्ट अ (दीर्घ मुदतीची कर्जे) आणि परिशिष्ट ब (अल्प मुदतीची कर्जे) ही पहावित.

**टिपा क्र. २५(ब)**

महाराष्ट्र शासनाच्या हस्तांतरण योजनेनुसार पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ या संस्थेने घेतलेल्या कर्जांसाठी सुरक्षा म्हणून असलेल्या कंपनीच्या मत्तांवरील निर्मिलेले आकार / गहाणवट दि. ०६ जून २००५ रोजी कंपनीकडे स्थानांतरीत झाल्या असून त्यांची वैधता आणि बंधने कंपनीला यापूढेही लागू राहतील (संदर्भ: परिशिष्ट अ)

**टिपा क्र. २६) लेखापरिक्षकांचे शूल्क :**

| | २०१३-२०१४ (₹) | २०१२-२०१३ (₹) |
|---|---|---|
| लेखापरिक्षकांना, सांविधिक लेखापरिक्षणासाठी | ४,५५०,५८० | ४,५५०,५८० |
| करांच्या प्रकरणासाठी | - | - |
| इतर सेवांसाठी | - | १६,८५४ |
| खर्चाची प्रतिपूर्ती | ५७४,०१५ | ४७०,११५ |
| **एकूण** | **५,१२४,५९५** | **५,०३७,५४९** |

**टिपा क्र. २७) खर्च, विमा व मालभाडे (सी आय् एफ) आधारे आयात मालाचे मूल्य**

| | २०१३-२०१४ (₹) | २०१२-२०१३ (₹) |
|---|---|---|
| कच्चा माल | - | - |
| घटक साहित्य व सुटे भाग | ३,९८६,७४१ | ४६,५९६,८१६ |
| भांडवली माल | - | - |

**टिपा क्र. २८) आयात तसेच देशांतर्गत कच्चा माल, भांडार वस्तू, सुटे भाग व अन्य घटक साहित्य यांच्या वापराचे मूल्य आणि एकूण वापरातील त्यांची टक्केवारी यात दुरुस्ती व देखभालही समाविष्ट आहे:**

| | | २०१२-१३ | | २०११-१२ | |
|---|---|---|---|---|---|
| अ) | **कच्चा माल- कोळसा वायू, आणि तेल** | % | ₹ | % | ₹ |
| | देशातील | १०० | १०३,६६७,८६०,०५४ | १०० | १०५,०४८,७८४,६७१ |
| ब) | **भांडारमाल, सुटेभाग व घटक** | | | | |
| | आयात | - | ० | ०.४२ | ३,९५२,१३२ |
| | देशातिल | १०० | ५,४९२,३३८,६०१ | ९९.५८ | ९३३,५३५,१२६ |
| | **एकूण** | **१००** | **५,४९२,३३८,६०१** | **१००** | **९३७,४८७,२५८** |

## २९. विकलेल्या विजेची विभागणी

(रक्कम ₹ मध्ये)

| वीज प्रकल्प | २०१३-१४ मूल्य ₹ मधे | २०१२-१३ मूल्य ₹ मधे |
|---|---|---|
| जल | ७,६६७,५७५,९६९ | ६,४५६,६७६,३०६ |
| औष्णिक | १३५,४२६,७६१,०९९ | १३६,९४५,०६८,०२६ |
| वायू | ८,२९२,०९०,२९३ | ९,५१४,५८४,६४६ |
| सौर | २,८२१,२४५,४५१ | ११५,१४९,७९२ |
| **एकूण** | **१५४,२०७,६७२,८१२** | **१५३,०३१,४७८,७७०** |
| यामध्ये निवासी वसाहतींना केलेली वीज विक्री आणि इतर संकीर्ण वीज विक्री याची रक्कम ₹ ११,१७४,४६१,५९१/- (मागील वर्षी ₹ ११,१९०,५४८,५९६/- वगळली आहे. | | |

३०. **महसूल अर्थसाहय/ अनुदान :** चालू वर्षात कंपनीने सौर प्रकल्पाच्या वीज विक्रीची रक्कम ₹ २,८२१,२४५,४५१/- (मागील वर्षी ₹ ११५,१४९,७९२/-) या महसूलास मान्यता दिली होती आणि भारत सरकारकडे निर्मिती आधारीत प्रोत्साहने या स्वरुपात महसूल अर्थसाहय/अनुदानापोटी ₹ १६,००९,०८०/- (मागील वर्षी ₹ १६,५९३,६००/-) एवढया रकमेची मागणी ₹ १२/- प्रती युनीट या दराने केली आहे.

३१. कंपनीने ऊर्जा विक्रीची देयके, इंधन समायोजन आकाराची देयके, अधिभाराची देयके इ. म.रा.विद्युत वितरण कंपनी लि. कडे (महावितरणकडे) देत असते. महावितरण कडून येणाऱ्या पैशाचे प्रथम प्रवेश-प्रथम गमन (फर्स्ट इन-फर्स्ट आउट) पध्दतीने विनियोजन केले जाते. असे करतांना प्राप्त झालेला पैसा प्रथम विलंबीत प्राप्तीचे व्याजावर विनियोजित केला जातो व त्यानंतर महावितरण कडून देय असणाऱ्या मुद्दलावर विनियोजित केला जातो.

व्यापारी प्राप्यता, कर्जे व अग्रीमे यांच्या शिलकी या निश्चित होणे आणि जर काही त्यांचा मेळ करावयाचा असेल तर त्याच्या अधीन आहेत.

मंडळाच्या मते चालू/चालू नसलेल्या मत्ता, दीर्घ / अल्प मुदतीची कर्जे आणि अग्रीमे चांगली आहेत आणि जर लेखांमधे अन्य काही नमूद केले नसले तर ती त्यांच्या अंदाजित मुल्या एवढी आहेत व वसूल होण्याजोगी आहेत.

३२. अल्प मुदतीच्या कर्जे व अग्रीमे यात कोळश्याच्या पुरवठादारांना दिलेल्या अग्रीमाची रक्कम ₹ ११,०७७,७१५,१३१/- (मागील वर्षी ₹ १९,०३३,१४२,५७६/-) समाविष्ट आहे. या अग्रीमामुळे कंपनीवर कोळश्याच्या पुरवठ्याचे दायित्त्व ₹ १०,३३८,६२२,२७६/-) (मागील वर्षी ₹ १९,१४९,५३४,११८) असून त्यात चालू दायित्वे या शीर्षातर्गत व्यापारी देणी समाविष्ट आहे. या कोळसा पुरवठादारांनी पुरविलेल्या कोळशाच्या देयकांची अंतीम मंजूरी प्रलंबित असल्याने सदर अग्रीमे आणि दायित्वे यांचे समायोजन केलेले नाही.

३३. विक्रीसाठी धरलेल्या मत्ता या शीर्षांतर्गत रक्कम ₹ ४६७,८४०,२९६/- (मागील वर्षी ₹ ४६७,९७४,४५३/-) ही ज्या मत्ता प्रत्यक्ष वापरात नाहीत व ज्यांची व्यवस्थापनाने विल्हेवाट लावण्याचे ठरविले आहे अशा मत्ता आहेत. व्यवस्थापनाच्या मते, त्यांच्या विल्हेवाटीतून मिळणारे मूल्य पुस्तकातील चालू मूल्यांपेक्षा जास्त आहे त्यामुळे त्यासाठी अन्य तरतूदीची गरज नाही.

**३४. सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग अधिनियम २००६, यानुसार कंपनीने आपल्याकडील उपलब्ध माहितीच्या आधारे असे सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग निश्चित केले असून त्यानुसार आवश्यक प्रकटन खालील प्रमाणे आहे.**

(रक्कम ₹ मध्ये)

| | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|
| (अ) | कोणत्याही पुरवठादारास देणे बाकी असलेली रक्कम | |
| | मुद्दल | २९४,२३९ |
| | त्यावरील देय व्याज | ५,४२० |
| (ब) | वर्षभरातील निश्चित केलेल्या दिवसानंतर कंपनीने व्याजासह दिलेल्या रकमा | - |
| (क) | उपर्जित व्याज व देणे बाकी असलेली रक्कम | १,८३२,४०६ |
| (ड) | लघू उद्योगांना अशा तारखेनंतर त्यापुढील वर्षात सुध्दा देय असलेले व थकीत व्याज | २,०४२,१७५ |

**३५) कंपनीने केले दावे**

गहाळ झालेल्या वॅगन्स संबंधी रेल्वेकडे दाखल केलेले दावे:

(रक्कम ₹ मध्ये)

| तपशील | २०१३-१४ | २०१२-१३ |
|---|---|---|
| गहाळ वॅगन्सची संख्या | ७०३ | ५९० |
| दाव्यांची रक्कम | १०७,८१७,०३१ | ९१,५०४,६३९ |

**३६) लागू नाही**

**३७) लेखा मानकानुसार आवश्यक प्रकटने:**

**अ) कर्मचारी लाभ**

(१) अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ : अल्प मुदतीच्या कर्मचारी लाभांस म्हणजे वेतन, मत्ते, उपांत लाभ, बोनस, प्रोत्साहने, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती गट विमा योजनेची वर्गणी, रजा प्रवास सहाय्य आणि इतर लाभ जे मुदतीच्या अखेरीस बारा महिन्यांत कर्मचाऱ्यांनी दिलेल्या संबंधित सेवानंतर दिले जातात. या सर्वांची लेखा नोंद, सेवा देण्याच्या मुदतीतील म्हणून केली जाते.

(२) नोकरी नंतरचे लाभ

व्याखांकित लाभ योजना

भविष्य निर्वाह निधी

कंपनी कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे अंशदान एका व्याख्यांकित लाभ निवृत्ती योजनेत करते. या भविष्य निर्वाह निधीचे प्रशासन 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अंशदान भविष्य निर्वाह निधी विश्वस्त' (सी पी एफ ट्रस्ट) यांचेतर्फे केले जाते. या योजनेनुसार या निधीच्या लाभासाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या निर्देशित केलेल्या टक्केवारी प्रमाणे अंशदान कंपनीला करावे लागते.

कंपनी (लेखा मानके) नियमावली २००६ यात अधिसूचीत केलेल्या कर्मचारी लाभांविषयीचे लेखा मानक (ए एस) १५-सुधारीत यातील मार्गदर्शनानुसार, कंपनी मालकाने स्थापित केलेल्या भविष्य निर्वाह निधीला व्याख्यांकित लाभ

